93

म. ग्रं. सं. ठाणे

विषय इतिहास

लेखक

सन

ग्रंथालय क्रमांक

पुस्तकाचें नांव जगाचा संक्षिप्त इतिहास

इति

# BRIEF SURVEY OF HISTORY.

BY JOHN C. MARSHMAN.

PART I.

[illegible] CREATION OF WORLD TO THE DISSOLUTION OF THE
THE MACEDONIAN [illegible] AND ITS ANNEXATION TO THAT OF ROME.

Translated into Marathee

BY

HARI RUGHOONATH GADGEEL.

PRINTED BY THE "DUKSHINA PRIZE COMMITTEE."

AT THE

AMERICAN MISSION PRESS; T. GRAHAM, PRINTER

BOMBAY.

1852.

# जगाचा संक्षिप्त इतिहास.

जान् सि. मार्शमन् साहेब

यांचे इंग्रजी ग्रंथावरून,

## भाग १.

जगाचे उत्पत्तीपासून मासिडनची बादशाहत गारद झाली तोंपर्यंत.

## हरी रघुनाथ गाडगीळ यांणीं

मराठी भाषेंत केला.

तो

**दक्षिणा प्राइज कमीटी यांणीं पसंत करून**

मुंबईमध्यें

अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिला.

सन १८५२.

# प्रस्तावना.

ग्रंथकारांनीं नाना प्रकारचे ग्रंथ करून विद्येचे संपादनाविषयीं मोठी सुलभता केली आहे, ह्मणून विद्यार्थ्यांस निरनिराळे ग्रंथापासून निरनिराळ्या गोष्टींचें ज्ञान, व अनेक फायदे होतात. परंतु बारिक नजरेनें विचार करून पाहिलें असतां इतर ग्रंथापेक्षां इतिहास वाचिल्यानें अथवा शिकल्यानें विशेष ज्ञान होतें, कारण कीं त्यांत सर्व प्रकारचे विषय लिहिलेले असतात व अनेक देशांतील लोकांचा रिती व राज्यें कशीं होतीं व सांप्रत काळीं त्यांची स्थिती काय आहे हें ध्यानांत येतें; व प्राचीन काळीं कोणत्या देशाचे लोक बलवान् होते व ते कसे झाले व दुर्बल कोण होते व ते दुर्बल कशानें झाले व कोणत्या कृत्याचे काय परिणाम झाले याचा बोध होतो. आणि त्याच गोष्टींची आपल्याशीं तुळणा करून पाहिली ह्मणजे आपले सद्गुण व दुर्गुण काय आहेत हें लक्षांत येतें, व सुखी होण्यास कोणते उपाय करावे हेंही सुचतें. परंतु हिंदूलोकांमध्यें इतिहास लिहून ठेवण्याचा अथवा वाचण्याचा फारसा शिरस्ता नाहीं याजमुळें प्राचीन काळापासून आजपर्यंत ह्या देशांत व पृथ्वीच्या पृष्ठभागावरील अन्य देशांत ज्या ज्या विशेष गोष्टी झाल्या त्यांचे दाखले त्यांजपाशीं नाहींत; व त्याच कारणानें ते लोक अद्यापपर्यंत अज्ञानावस्थेंत गुंतून पडलेले आहेत, बाहेर निघण्यास त्यांस सामर्थ्य नाहीं. जरी त्या लोकांपाशीं प्राचीन काळचे इतिहासाचे ग्रंथ लिहिलेले आहेत, तथापि ते पुराणांतील कल्पित गोष्टींपासून निराळे नाहींत, व त्यांमध्यें ज्या ज्या देशांचीं नांवें लिहिलेलीं आहेत तीं नांवें फक्त पुस्तकांतच आढळतात, त्या देशांचा, ठिकाण लागत नाहीं सबब ते ग्रंथ विश्वास ठेवण्यास योग्य नाहींत.

आलीकडे इंग्रज लोकांनीं मोठे परिश्रमानें पृथ्वींतील संपूर्ण देशांतून मागील वर्त्तांताचे कागदपत्र जमा करून, त्यांजवरून इंग्रजी

# प्रस्तावना.

भाषेंत हजारों नवीन ग्रंथ लिहिले आहेत ते फार उपयोगी आ- हेत; कारण कीं त्यांत, मनःकल्पित गोष्टी गाळून टाकून ज्या ज्या गोष्टी प्रमाणांनीं खऱ्या ठरल्या, त्या लिहिल्या आहेत.

सदर्हू ग्रंथ हिंदूलोकांचे, व विशेषेंकरून महाराष्ट्र देशांतील राहाणाऱ्यांचे समजण्यांत येऊन, वर लिहिलेले सर्व फायदेही त्या लोकांस व्हावे ह्मणून मुंबई सरकारानें उदार मनेंकरून, ग्रंथ- कारांनीं लोकोपयोगी ग्रंथ केले. तर पूर्वी पेषवाइ अंमलांत शास्त्री व ज्योतिषी व वेदाध्यायी इत्यादि लोकांस दक्षणा मिळत होती, त्यांप्रमाणेंच ह्यांसही मिळेल असा ठराव करून जागोजाग जा- हिरनामे लावून, इंग्रजी ग्रंथांचे तरजुमे मराठी भाषेंत करण्यास उत्तेजन दिलें आहे.

ह्या ग्रंथांत, **वर्षें, काळ,** व **मन्वंतरे** लिहिलीं आहेत हीं हिंदू लोकांचे गणनेप्रमाणें लिहिलीं नाहींत, कारण कीं इंग्रजी बुकांत ज्या ज्या देशांचें वर्णन केलेलें आहे त्या देशाविषयीं हिंदू लोकांचे इतिहासांत कांहींच मजकूर लिहिलेला नाहीं.

हा ग्रंथ संस्कृत शब्दांनीं सर्वत्रांस समजण्यास अवघड असा न व्हावा ह्मणून ह्यांत प्राकृत, व नेहमी बोलण्यांत व लिहिण्यांत येणारे असे शब्द घालून लिहिला आहे. हा वाचून वाक्यरच- नेंत अथवा शब्दांत कांहीं चुक्या असल्यास वाचणारांनीं माफ कराव्या हीच सर्वत्रांस ग्रंथकाराची विनंती आहे.

पुणे<br>ता० १, माहे सपटेंबर १८५२. } हरी रघुनाथ गाडगीळ.

# अनुक्रमणिका.


| भाग. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | सृष्टीचे उत्पत्तीपासून जलप्रलयापर्यंत. | १ |
| २ | परिभाषा इतिहासाचे प्रमाणाविषयीं | ४ |
| ३ | काळ १;—जलप्रलयापासून ट्रोजन लढाईपर्यंत. | ८ |
| ४ | काळ २;—ट्रोजन लढाईपासून साइरस राजापर्यंत ग्रीक लोकांच्या परदेशांतील वसाहती | ३१ |
| | मिसर देश | ४७ |
| | फिनिशिया | ५१ |
| | यहुदिस्थान. | ५३ |
| | असीरिया, मिडिया, बाबिलन, व फारस | ५७ |
| | कार्थेज | ६३ |
| | रूम | ६५ |
| | सिसिली. | ६५ |
| ५ | काळ ३;—साइरस राजापासून शिकंदर बादशाहापर्यंत. | ६७ |
| | शिकंदर बादशाहा. | ९३ |
| | फारस देशाची बादशाही | १२९ |
| | कार्थेज व सिसिली | १४० |
| ६ | काळ ४;—शिकंदर बादशाहाचे अंतकाळापासून क्रिस्ताचे जन्मापर्यंत सेल्युकस याचें राज्य | १५२ |
| | मिसर देश | १६५ |
| | मासिडन व ग्रीस | १७० |
| | यहुदिस्थान | १८४ |

# जगाचा संक्षिप्त इतिहास.

## भाग १.

### सृष्टीचे उत्पत्तीपासून जलप्रलयापर्यंत.

जगाची आणि मनुष्याची उत्पत्ति—मुळचा सात्विकपणा—मनुष्यमात्र ईश्वराचे कृपेंतून उतरले—त्यास ईश्वरानें ईडंन नामें बागेंतून काढून दिलें—केन आणि एबल्—मनुष्यमात्राचे आयुष्याची मर्यादा—दुष्कर्माची वृद्धि—नोहाची नौका—जलप्रलय—या सर्व गोष्टींचें वर्णन या भागांत लिहितों.

सृष्टीचे आरंभीं ईश्वरानें आकाश आणि पृथ्वी हीं उत्पन्न केलीं, आणि पृथ्वीच्या रजःकणांपासून मनुष्यदेह उत्पन्न करून त्यास आत्मा आणि बुद्धि हीं दिलीं यासाठीं कीं त्याणें आपल्या उत्पन्नकर्त्या ईश्वराची सेवा करून आनंदानें सुखोपभोगांत दिवस घालवावे. त्या आदि पुरुषाचें "आदम" असें नांव होतें. त्याच पुरुषापासून ईश्वरानें एक स्त्री उत्पन्न केली तिला "ईव" अशी संज्ञा होती. नंतर त्या उभयतांचें वास्तव्य व उपभोग यांचे साठीं ईश्वरानें ईडंन नामें एक बाग नेमून दिला त्यांत तीं उभयतां कांहीं काळपर्यंत सात्विकपणानें वागून सुखावस्थेंत राहिलीं. परंतु पुढें त्यांणीं ईश्वराची आज्ञा मो-

डिली यामुळें ईश्वराची त्यांवर अवकृपा झाली. तेव्हांपासून तीं स्वतां आणि त्यांची संतति अशीं, दुःखरूप अवस्थेंत व दारिद्र्यांत पडलीं. या प्रकारें जगांत पापाचा प्रवेश झाला आणि त्यांचा धार्मिकपणा नष्ट झाला. मनुष्यमात्राचा पहिला काळ पवित्र होता, ह्मणजे निष्कपटपणाचा होता, याविषयीं सर्व राष्ट्रांमध्यें परंपरागत कांहीं दंतकथा चालू आहेत. हिंदु लोक त्या पहिल्या काळास **सत्ययुग** असें ह्मणतात. आणि ग्रीक लोक यांस तें **सुवर्णयुग** ह्मणून माहीत आहे.

ख्रिस्ती धर्मपुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, **आदम** आणि **ईव** (आदि पुरुष व आदि माया) यांणीं ईश्वराची आज्ञा उलंघिली यास्तव त्याणें त्यांस **ईडन** नामक बागेंतून काढून देऊन अशी शिक्षा ठरविली कीं, त्यांणीं कपाळास घाम येई तोंपर्यंत हातांनीं मेहनत करून आपले आयुष्याचे दिवस काढावे. ती शिक्षा आजपर्यंत त्यांची पुत्रपौत्रादि संतति भोगीत आहे; त्या प्रथमच्या स्त्रीपुरूषांपासून दोन पुत्र **केन** आणि **एबल्** या नांवाचे उत्पन्न झाले, पैकीं **केन** हा गर्विष्ट व ईश्वरद्रोही होता आणि **एबल्** हा लीन आणि ईश्वरभक्त होता. एका समयीं त्या उभयतांनीं ईश्वरास बलिदानें दिलीं तेव्हां त्यांतून ईश्वरानें **एबल्** याचें घेतलें आणि **केन** याचें टाकून दिलें, यामुळें **केन** यास अति क्रोध येऊन त्याणें त्या क्षणीं उठून आपले बंधूस ठार मारून टाकिलें. याप्रमाणें पृथ्वी प्रथमतः मनुष्याचे रुधिरानें मनुष्यमात्राचे पूर्वजांचे प्रथम उत्पन्न झालेले पुरुषाचेच हातून भ्रष्ट झाली. पुढें **आदम** आणि **ईव** यांस अणखी संतति होऊन मनुष्यांची वृद्धि होऊं लागली. ती

वृद्धि फार लवकर व्हावी ह्मणून ईश्वरानें प्रथम मनुष्यमात्राचे आयुष्याची मर्यादा हजार वर्षांची केली होती परंतु उत्तरोत्तर कमी होऊन सांप्रत काळीं सत्तर वर्षांची झाली आहे. जशी जशी मनुष्यांची वृद्धि होत चालली तसेतसे अधर्म व अन्याय वाढले. शेंकडों वर्षेंपर्यंत ईश्वरानें ह्या दुराचारी प्राण्यांचे दोषांचें सहन केलें; परंतु शेवटीं त्यास क्रोध येऊन त्याणें असा निश्चय केला कीं, ही पतित जात पृथ्वींतून नाहींशी करून एक पुरुष **नोहा** या नांवाचा व त्याचें कुटुंब इतकें मात्र पुनः प्रजा उत्पन्न करण्याकारितां राखून ठेवावें. **नोहा** हा सत्यधर्मी व ईश्वराचा निष्कपटी भक्त होता, ह्मणून ईश्वरानें त्यास भलेपणाचे आठवणीकरितां निवडून काढून एक नौका तयार करण्यास आज्ञा दिली, ती तयार होण्यास १२० वर्षें लागलीं.

नौका तयार होतांच ईश्वरानें त्यास अशी आज्ञा दिली कीं, त्वां आपली स्त्री, व तीन पुत्र, व तीन सुना, आणि हरएक प्राणिमात्राचे जातीचा जोडा याप्रमाणें वरोबर घेऊन नावेंत वसावें. त्याप्रमाणें सर्व नावेंत जाऊन वसल्यावर थोर समुद्राचे झरे फुटले, व चाळीस दिवस असा सतत पाऊस पडला कीं, थोर पर्वतही पाण्यांत बुडाले, आणि सर्वत्र प्राणिमात्राचा नाश झाला. नंतर ईश्वरी इच्छेंकरून पाऊस वंद होऊन पाणी उतरलें, आणि **नोहा** आपलें कुटुंब व सर्व प्राणी यांसह वाहेर येऊन ईश्वरानें त्यास जलप्रलयापासून वांचविलें ह्मणून त्याचा स्तव करून त्याचे नांवानें त्याणें वलिप्रदान केलें.

जलप्रलय झाल्याचें वर्तमान स्थापित करावयास आज्ञा-

पाशीं प्रथम प्रमाण धर्मपुस्तक, दुसरें सर्व राष्ट्रांच्या दंतकथा, व तिसरें भूगोलाचे हरएक भागांत हल्लीं निःसंशय खुणा दृष्टीस पडतात त्या, अशीं तीन आहेत. हा जलप्रलय सृष्ट्युत्पत्ति झाल्यावर सोळाशें छपन्न वर्षांनीं झाला.

---

# भाग २.

## परिभाषा.

इतिहासाचीं तत्वें—दंतकथा, थडगीं, शिक्के, व लिहिलेले वृत्तांत, इतिहासाची सांत काळांत वाटणी—हरएक काळाचा निरनिराळा वृत्तांत. या सर्व गोष्टींचें वर्णन या दुसऱ्या भागांत लिहितों.

जलप्रलय झाल्यावर ईश्वरानें जी सृष्टि पुनः उत्पन्न केली तिजविषयींचा इतिहास आरंभून, मनुष्यजातीच्या पृथक् पृथक् कुळांनीं निरनिराळे देशांत जाऊन वस्त्या केल्या, व त्या वृद्धिंगत झाल्या, याविषयीं आह्मी पुढें सांगूं; परंतु त्याचे पूर्वीं थोडा प्रस्ताव लिहिणें ठीक दिसतें.

आह्मास मागील गोष्टींची माहितगारी होण्यास धर्मपुस्तक खेरीजकरून तीन प्रमाणें आहेत, त्यांचा तपशील. परंपरागत दंतकथा, थडगीं, लिहिलेले किंवा छापलेले कागद पत्र.

सदरहू प्रमाणांवरून आह्मी इतिहास सांगणार. कोणत्याहि लोकांचा इतिहास दंतकथेवरून प्रथम चालू होतो, ह्मणून प्रथमतः दंतकथेचे आधारावरून सांगतों. जसें **हिंदुस्थानांत** वेदांचीं पुस्तकें आहेत त्यांत जें कांहीं ऐकिलें होतें तेंच लिहिलें आहे, ह्मणून वेदास श्रुति असें

व ज्या शिक्यावर पराक्रमी मनुष्यांचे चेहरे, व नांवें, व वर्षें, लिहिलेलीं होतीं त्या शिक्यांचे योगानें आह्मी मित्या कायम करून लिहिलेले इतिहासांतील चुक्याही नीट करितों. परंतु मागील गोष्टींस खरा आधार पाहातां अक्षरांची प्रवृत्ति झाल्यावर जे इतिहास जमा केले आहेत त्यांत सांपडतो. हे इतिहास छापण्याची युक्ति निघाल्यावर अधिक शुद्ध झाले.

जलप्रलय झाल्यावरील मनुष्यमात्राचा इतिहास पुरतेपणें समजण्याकरितां इतिहासाचे सात काळ नेमून प्रत्येक काळचा वृत्तांत निरनिराळा सांगण्याचा ग्रंथकारांनीं पाठ घातला आहे, त्यास अनुसरून आह्मी ख्रिस्ताचे पूर्वी १२०० वर्षें **ट्रोजन** लढाई झाली त्या सुमारास पहिल्या काळाचा शेवट ठरवितों. याचें पहिलें कारण असें आहे कीं, त्या काळाचे इतिहासांत ती लढाई ही एक विशेष गोष्ट झाली आहे, दुसरें कारण असें कीं, त्या लढाईमुळें **युरोप** खंडांतील राहाणारे लोक ह्यांनीं आठवण राहाण्याजोगी पहिली स्वारी **एशिया** खंडावर केली, त्या काळांत प्रलयापासून त्या युद्धापर्यंत १२०० वर्षांच्या खबरी आहेत, व त्या काळचा इतिहास सर्व काळाच्या इतिहासांमध्यें फारच संशययुक्त आहे. दुसरा काळ ६०० वर्षांचा **ट्रोजन** लढाईपासून **साइरस** राजाचे कारकिर्दीपर्यंत आहे; त्या राजानें ख्रिस्ताचे पूर्वी ५०० वर्षें **एशिया** खंडाचे पश्चिम भागांत प्रथमतः एक विस्तीर्ण राज्य स्थापित केलें. तिसरा काळ २३० वर्षांचा, **साइरस** राजापासून **शिकंदर** बादशाहापर्यंत आहे; त्या बादशाहानें **फारसदेशाचें** राज्य नष्ट करून **युरोप** खंडाचा

वरिष्ठपणा प्रथम **एशिया** खंडावर स्थापिला, तो आजपर्यंत तसाच चालत आला आहे. चौथा काळ ३३० वर्षांचा **शिकंदर बादशाहाचे** अमलापासून ख्रिस्ताचे जन्मापर्यंत आहे; ह्या काळांत जगाचें पश्चिम भागचें राज्य रूमवाले करीत होते. पांचवा काळ ४०० वर्षांचा आहे. त्यांत ख्रिस्ताचे जन्मापासून **रूमची** बादशाही गारद होई तोंपर्यंत झालेला इतिहास लिहिला आहे. त्या काळांत ख्रिस्ति धर्म मनुष्यमात्रास जाहीर झाला, व हल्लींचे **युरोपियन** लोकांचे लोकसत्तात्मक राज्यांचीं चिन्हें दिसूं लागलीं, आणि त्या काळाच्या अंतीं इतिहासाचे ज्या भागास सर्व लोक प्राचीन इतिहास असें ह्मणतात तो समाप्त झाला. साहावा काळ हा विपरीत काळ होय. कारण कीं त्यांत **ग्रीक** लोक व **रूमवाले** यांणीं लोकांस सुधारण्याविषयीं ज्या विद्या व कळा प्रवृत्तींत आणिल्या होत्या त्या अडाणी लोकांचे हल्ल्यामुळें मागें पडून ढोंग आणि अज्ञान यांचा **युरोप** खंडांत प्रसर झाला. तो काळ **रूमवाले** यांची बादशाही गारद झाल्यापासून **कोलंबस** नामक मनुष्याचे वेळेपर्यंत आहे. ज्याणें इसवी सन १४९२ यांत नवें जग ह्मणजे **अमेरिका** महाद्वीप प्रगट करून **युरोपियन** लोकांचा जोर वाढविला. सातवा काळ ह्मणजे शेवटचा काळ, **अमेरिका** ह्मणजे नवें जग, हें प्रगट झाल्यापासून सांप्रतकाळापर्यंत आहे. जसा पहिले काळांत मनुष्याचे अज्ञान अवस्थेविषयीं इतिहास लिहिलेला आहे त्याप्रमाणेंच शेवटचे काळांत मनुष्यमात्राचें ज्ञान व शाहाणपणा हीं वृद्धिंगत झालीं याविषयींचा वृत्तांत आहे.

# भाग २.

## इसाचे पूर्वी २३४४ वे वर्षापासून ११८४ पर्यंत.

### काळ १.

### जलप्रलयापासून ट्रोजन लढाईपर्यंत.

नौका विश्रांति पावली—नोहा—बेबलचा बुरूज—निमराड—निनवी—बेलस—भाषांची अदलाबदल—असीरियाचें राज्य—सिमिरमिस—तिची हिंदुस्थानावरील स्वारी—तिचा पराभव—बाबिलन—मिसर देश—हरमिस—अक्षरांची मूलोत्पत्ति—धर्मसंबंधी नेम—यहूदी लोकांची मूलोत्पत्ति—ग्रीस देशाची प्रथम वसाहत—मिसर देशाची—मुळची सुधारणा—इजरे लाइट्स ह्मणजे यहूदी लोक, हे मिसर देश सोडून गेले—सिसास्ट्रिस्—सिक्राप्स—क्याडिमस—डेनाअस—ग्रीक लोकांचा देव पुराणें—आर्गोनाटिक स्वारी—क्रीटबेट—माइनास—हरक्यूलिज—थिसिअस—या सर्वाविषयींचें वर्णन पुढें लिहितों.

(प्रथम भागाचे अंतीं आह्मी लिहिलें आहे कीं, ईश्वरानें **नोहा** याजकडून नौका तयार करवून तींत तो व त्याचें कुटुंब इत्यादिकांस बसवून जलप्रलयाचे भयापासून मुक्त केलें) ती नौका **अरेराट** नामक पर्वतावर राहिली; तो पर्वत कोणी भूगोलवेत्ते **आर्मिनिया** देशांत आहे असें ह्मणतात. परंतु बहुतकरून ती **ब्याक्ट्रिया देश**, जो देश हिंदुस्थानाचे वायव्य दिशेस आहे, त्याचे कोणी एके भागांत राहिली होती असें वाटतें. याचें कारण एक असें आहे कीं, **ब्याक्ट्रिया** देश हा **युरोप**, **एशिया**, आणि **आफ्रिका**, ह्या तिन्ही खंडांचे मध्यभागीं आहे. दुसरें कारण असें आहे कीं, धर्मपुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, प्रथमतः मानवी कुलानें पूर्वेकडून येऊन **बाबिलन** देशचे मैदानापर्यंत प्रवास केला, **आर्मिनिया** देश

हा बाबिलनाच्या उत्तरेस आहे, तेव्हां त्याच देशांत राहिली होती असें ह्मणवत नाहीं.

नौकेस ठरावयास जागा मिळतांच **नोहा** आपले कुटुंबासहित ईश्वरआज्ञेनें त्यांतून बाहेर उतरून आला व जे प्राणीमात्र त्यांत आश्रय पावले होते तेही सर्व निघून आले. आणि जलप्रलय झाल्यामुळें जमीन फारच सुपीक होऊन वनस्पती मोठे जोरानें वाढूं लागल्या. तेव्हां त्यांत रान लौकर माजून त्या रानांत जिकडेतिकडे क्रूर जनावरें राहूं लागलीं. परंतु निर्बळ जो मनुष्यसमुदाय तो तोंपर्यंत एकेच भागांत राहिला होता त्याचे संततीची उत्तरोत्तर वृद्धि होऊं लागली. तेव्हां त्यांस आनंदानें एकत्र राहाणें अवघड पडूं लागल्यामुळें त्यांतून एक टोळी सुमारें ५,००० मनुष्यांची फुटून आपलें पितृस्थान सोडून नवें स्थान सोधावयास निघाली. ती पश्चिम दिशेस हळू हळू जात असतां शेवटीं **शिनार** ह्मणजे **बाबिलनचें** मैदान येथें दाखल झाली. त्या टोळीबरोबर कुळाधिपती ह्मणजे **नोहा** हा गेला नव्हता परंतु तो नौकेचे समीप राहात होता आणि त्याची संतति हिंदुस्थान, व चीन, व त्याचे आसपासचे देश, ह्यांत पसरलेली होती असें दिसतें. इकडे जे प्रवासी लोक **बाबिलनच्या** मैदानाकडे गेले होते ते त्या मैदानांत पोहोंचल्यावर सर्वांचे मतें तेथेंच राहावें असें ठरून त्यांणीं इमारतीचें सामान मिळवून एक शहर, व आकाशापर्यंत उंच असा एक बुरूज, बांधावयाचा आरंभ केला. परंतु त्यांचा बेत सिद्धीस गेला नाहीं. कां कीं ईश्वरी इच्छेकरून त्यांची भाषा पूर्वीं एकसारिखी होती ती निरनिराळी होऊन

मजुर लोकांस एकमेकांचें बोलणें समजेनासें झालें. यास्तव त्यांस तें काम सोडून देणें प्राप्त होऊन ते तेथून निघून देशोदेशीं जाऊन निरनिराळे जागीं राहिले. तेणेंकरून पश्चिम देशचीं पुढें होणारीं जीं मांडलिक व सार्वभौम राज्यें यांचे पाये पडले.

तथापि कांहीं मंडळी **बाबिलन** शहरांतच राहिली होती तींत **निमराड** नामें एक मोठा शूर पुरुष होता तो बहुतकरून तोच असेल कीं जो प्रथमतः त्या मंडळीचे लोकांस **शिनारचे** मैदानांत आणून त्यांचा आपण सरदार झाला. त्याविषयीं धर्मपुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, तो ईश्वराचे समोर मोठा बलाढ्य पारधी होता. याचा अर्थ असा होतो कीं तो आपले सोबत्यांस आसपासचे रानांतील क्रूर जनावरें मारावयास घेऊन गेला होता. कां कीं त्यांचा संहार केल्याखेरीज मनुष्यमात्राचे वस्तीची हद्द वाढणें अशक्य होतें. यास्तव त्याणें त्याचा निःपात करून प्रथमतः **बाबिलन** शहर वसवून पुढें अणखी शहरें वसविलीं. **बाबिलनचें** राज्य सुरू होण्याचा समय २२१३ वर्षें इसाचे पूर्वीं आहे. त्या राजानें १४८ वर्षें राज्य केलें. आणि तो खिस्ताचे पूर्वीं वीसशें पासष्टावे वर्षीं मृत्यु पावला असें अनुमान होतें. त्याचे मागून **बेलस** नामें राजा झाला, तो त्याचा जवळचा नातलग होता असें दिसत नाहीं. कारण कीं त्या काळीं असी चाल होती कीं, वारस यासच गादीवर बसवावें असें नव्हतें सर्वांहून जो बळिष्ट किंवा थोर असेल त्यास राज्याधिकार देत असत. हा राजा स्वभावानें शांत होता व विद्याभ्यास फारच करीत असे असें दिसतें. कारण कीं

त्याणें ६० वर्षे राज्य केलें परंतु आपलें आयुष्याचे सर्व दिवस जर्मानीची लागवड करण्यांत व जी ज्योतिषविद्या त्याणेंच योजिली होती ती प्रवृत्त करण्यांत घालविले. ती विद्या **कालडिया** देशचे लोक **बाबिलन** शहरांत राहात होते त्यांणीं शिकून लोकांचें कल्याणार्थ पाठशाळा घातल्या. त्यांची कीर्ति शेंकडों वर्षेंपर्यंत अशी चालली होती कीं, तशी कोणतेही शाळेची नव्हती.

बहुतकरून **निमराड** याचेच वेळेस **अशर** या नांवाचे मनुष्यानें प्रवाशी लोकांची एक टोळी **बेबल** येथून बरोबर घेऊन **टाइग्रीज** नदीचे पार उतरून **असीरियाचें** राज्य आणि त्याची राजधानी **नीनवी** यांचा पाया घातला. नंतर कांहीं दिवस त्यांत राज्य करून तो ज्या वेळेस **निमराड** याचा अंतकाळ झाला त्याच वेळेचे सुमारास मृत्यु पावला. त्याचे मागून **नाइनस** नामें राजा झाला, त्यास शूरत्व व ईर्ष्या फार होती व ज्या लढाया त्या काळचे इतिहासांत लिहिलेल्या आहेत त्या सर्व त्याणेंच आरंभिल्या होत्या, कारण कीं प्रथमतः त्यास आपलें राज्य वाढविण्याची इच्छा प्राप्त होऊन त्याणें **निमराड** याचे राज्यावर चढाई करून त्यांत आपला अम्मल बसविला. नंतर जीं मांडलिक राज्यें **बाबिलन** देशाचे पूर्वेस होतीं तींहीं त्याचे हाताखालीं आलीं. याप्रमाणें **असीरियाचें** राज्य प्रथम **नाइनस** याणें आपले पराक्रमानें संपादिलें. तथापि त्याची तृप्तता न होऊन त्याणें **ब्याक्ट्रिया** (ज्या देशांत जलप्रलय झाल्यावर प्रथमतः मनुष्यमात्रांची वसाहत झाली तो) घेण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु त्याचा वारंवार पराभवच होत गेला, तथापि शेवटीं

त्याणें आपले सेनापतीची स्त्री **सिमिरमिस**, हिला कुमकेस घेऊन तिचे योगानें तो देश सर केला. नंतर कांहीं दिवसांनीं आपण तिशीं विवाह केला. पुढें त्या राजाचा अंतकाळ झाल्यावर ती राणी गादीवर बसली, आणि तिणें आपले राज्याची राजधानी **बाबिलन** शहर करून त्यांत मोठमोठाल्या शोभिवंत इमारती बांधिल्या आणि त्यासभोंवतालीं मोठा तट बांधून तें मजबूत केलें. नंतर जो बेत तिचे भ्रतारानें मुलुखच्या संपादनाविषयीं केला होता त्यास अनुसरून आपणास **इंडस** ह्मणजे **अटक नदी** हिचे पश्चिमेस कोणीही शत्रु राहिला नाहीं असें पाहून ती लढाऊ फौज जमा करून ती नदी उतरून **हिंदू** लोकांवर हल्ला करण्यास गेली. तिचे फौजेची संख्या ग्रंथकारांनीं जी वर्णिली आहे तिजवर लक्ष दिलें असतां खरें वाटणार नाहीं, परंतु त्यांचे लेखापासून इतकाच बोध होतो कीं, त्या काळीं तशी मोठी दुसरी कोणतीही स्वारी झाली नव्हती. तथापि त्या लढाईंत तिचा पराभव होऊन ती पळून स्वदेशास गेली. कांहीं ग्रंथकार असें वर्णन करितात कीं, त्या लढाईंत ती मारली गेली. आणि दुसऱ्यांचें मत असें आहे कीं, लढाईंत तिचा पराभव होऊन परत गेल्यावर तिला तिचे पुत्रानें पदच्युत केलें. याजवरून बहुधा असें वाटतें कीं, जी लढाई देव दैत्यामध्यें झाली असें **हिंदु** लोकांचे पुस्तकांत वर्णिलें आहे ती कदाचित हीच लढाई असावी. आह्मी पूर्वीं अशी कल्पना केली आहे कीं, मानवी कुळाचा एक भाग जोंपर्यंत **ब्याकट्रिया** देशांत राहिला आणि त्याची वस्ती उत्तरोत्तर पूर्वेस वाढत गेली तोंपर्यंत त्याच कुळाचा

दुसरा भाग **बाबिलन** देशांत जाऊन आबाद झाला. याप्रमाणें **अटकनदीचीं** मध्यें मर्यादा करून मानवी कुळाच्या मुख्य दोन जाती एकमेकींपासून वेगळाल्या होऊन त्यांमध्यें वर लिहिलेल्या स्वारीमुळें प्रथमतः हीच लढाई झाली. अणखी ह्या कल्पनेवर हेंही योग्य दिसतें कीं हिंदु लोकांचे तर्फेनें ज्या पुरुषांनीं लढाई केली त्यांस ते देव ह्मणत असतील; कां कीं त्यांणीं जय मिळविला; आणि ज्या लोकांनीं त्यांजबरोबर लढाई केली ते त्यांस दैत्य ह्मणत असतील; कां कीं त्यांणीं लढाईंत रक्ताचे पूर वाहविले होते.

**सिमिरमिस** मृत्यु पावल्यावर अथवा पदच्युत झाल्यावर तिचा पुत्र **निनिअस** हा गादीवर बसला. त्याच्या जन्मवृत्तांताचा व त्याचे मागून तीस राजे झाले त्यांच्या राज्याचा इतिहास फार संशययुक्त आहे. (यास्तव लिहितां येत नाहीं) शेवटीं त्या गादीवर **सार्डेना पेलस** नामें राजा झाला, तो मोठा विषयासक्त होता; त्यास शत्रूशीं युद्धाचा प्रसंग पडला तेव्हां शत्रूचे सन्मुख जाण्यास आपणास सामर्थ्य नाहीं असें समजून त्याणें एक उंच चिता रचून तींत आपलें कुटुंब व दौलत यांसहवर्त्तमान आपणास जाळून घेतलें. त्याजबरोबर **असीरियाचें** राज्यही नष्ट झालें याविषयींचा वृत्तांत दुसरे काळांत लिहिला जाईल.

आतां हा विषय कांहीं काळपर्यंत एकीकडे ठेवून आह्मी भाषेची घालमेल झाली त्या वेळचा इतिहास सांगतों. **बेबेलचा बुरूज** तयार होत असतां लोक एकमेकांचें बोलणें समजतनासे झाले यामुळें ते ती जागा सो-

डून **बाबिलन** देशचे पश्चिमेस पृथक् पृथक् स्थानांत राहावयास गेले. त्यांत **मिजराम** नामें एक मनुष्य होता तो मनुष्यांची एक टोळी आपल्या बरोबर घेऊन **मिसर** देशास जावयास निघाला, तो **निमराड** याणें **बाबिलन** शहरांत आपलें राज्य स्थापिल्यावर तो पंधरा वर्षांनीं त्या देशास पोहोंचला असें वाटतें. तेथें तो देश त्यास चांगला सजळ आढळल्यावरून त्याणें त्यांत त्या लोकांची वसाहत करून आपण त्यांचा राजा झाला. पुढें कांहीं दिवसांनीं तेथील लोक त्यास **आशिरिज** या नांवाचा देव मानून पुजूं लागले. तो मृत्यु पावल्यावर त्याचे सात पुत्रांनीं त्या राज्याचे सात विभाग केले आणि पृथक् पृथक् विभागाचीं ते राज्यें करूं लागले. त्या सर्वांत **पाथ्रजिम** उर्फ **थाइअथ** ह्मणून मोठा नामांकित राजा होता तो आपले बापाचा फडणवीस होता असें प्रसिद्ध आहे. त्याणें ज्योतिषशास्त्राचा फार अभ्यास केला व मोठे एकाग्रतेनें मेहनत करून सर्व प्रकारच्या विद्या, कळा, वाढविल्या. आणि भाषेची सुधारणा केली. आणि कायदे स्थापून धर्माविषयीं कांहीं नेम चालू केले, त्यांचा प्रसर उत्तरोत्तर मिसर देशांत होऊं लागला, व जी लिपि प्रथमतः त्या देशांत चालत होती तीही त्याणेंच योजिली होती असें ह्मटलें आहे. सारांश हो इतका ज्ञानी व परोपकारी होता, कीं हरएक विद्या व कळा त्याणें आपल्याच बुद्धीनें उत्पन्न करून त्यांचा प्रसार केला. परंतु ही गोष्ट त्यास बद्धक झाली, कारण कीं त्यां नांवाचे मनुष्य दरएक काळांत होतच गेले, यामुळें त्यांतून तो मनुष्य कोणता याविषयीं ग्रंथकारांस संशय येऊन त्याचे नांवाची फार-

शीं प्रशंसा झाली नाहीं. **ग्रीक** लोक त्यास **हरमिज** ह्मणत होते व सांप्रत काळचे लोकांमध्यें तो **हरमिसट्रीस मेजिस्टस** या नांवानें फार प्रसिद्ध आहे.

**बाबिलन** देशांतून जे जे लोक बाहेर गेले होते त्यांणीं सुमारें ह्याच वेळेस अणखी देश वसविले. कांहीं लोक **केनान** देशांत व कांहीं **आर्बस्थानांत** व कांहीं **फारस** देशांत व कांहीं **एशिया मैनर** देशांत जाऊन राहिले, परंतु जे लोक **बाबिलन** देशाचे पूर्वेस गेले होते त्यांविषयीं आह्मापाशीं कांहीं दाखला नाहीं.

अक्षरांचे उत्पत्तीविषयीं ज्या कल्पना लोक करितात त्यांचा अंत नाहीं. **हिंदू** लोक असें वर्णन करितात कीं, देवनागरी ह्मणजे बाळबोध लिपि ही **अटकनदीचे** पूर्वेस **चीन** देशची लिपि खेरीज करून इतर सर्व लिपींस आधार आहे व ती ईश्वरापासून त्या राष्ट्रास प्राप्त झाली आहे. यास्तव त्या लिपीचे गुप्त उत्पत्तीविषयीं सविस्तर वृत्तांत समजत नाहीं, सबब आह्मी तो देश सोडून **अटकनदीचे** पश्चिम दिशेकडील देशच्या लिपीविषयीं लिहितों. आह्मास असें वाटतें कीं, **बाबिलन** देशांत **निमराड** याचें मागून **बेल्स** नामें राजा झाला, त्याणें ज्योतिषसंबंधीं गणित प्रथमतः उत्पन्न केलें. याविषयींचे लेख तेथील दप्तरांत लिहून ठेविलेले होते ते शेंकडों वर्षांनंतर **शिकंदर** बादशाहा याणें त्या शहरांत अम्मल केला तेव्हां लोकांनीं त्यास दाखविले. त्याविषयीं जरी लोकांचीं मतें निराळीं आहेत तरी पूर्वीं जीं अक्षरें चालू होतीं त्यांचे माहितगारीवरून आह्मी सहज अनुमान करितों कीं त्या

लिपीची योजना प्रथमतः **बाबिलन** शहरांतच झाली होती. अणखी अशीही कल्पना करितां येते कीं, तीच लिपि **आर्बस्थान, फारस** देश, **हिब्रू, फिनिशिया,** इत्यादि देशांत चालत होती व त्या लिपीचीं अक्षरें **हिब्रू** होतीं किंवा **हिब्रू** लिपीचे अक्षरासारिखींच होतीं व तीं अक्षरें उजवे हाताकडून डावे हाताकडे लिहीत असत. ती लिपि प्रथमतः **फिनिशिया** देशांतून **यवन** देशांत पसरून तेथें तिची कांहीं अदलाबदल झाली. नंतर तेथून **इटली** देशांत जाऊन तेथेंही तींत अणखी कांहीं अदलाबदल झाली, नंतर तेथून जसजसा **रोमन** लोकांचा अम्मल **युरो**पखंडांत वाढत गेला, तसतशी तीही सर्व **युरोपांत** फैलत गेली. याप्रमाणें आह्मी बहुधा खरे कल्पनेवरून, जी लिपि आतां **युरोप**खंडांतील हुकूम संपूर्ण जगांत पोंचविते, ती **बाबिलन** शहर ह्मणजे ज्याचे अव्वल स्थानाविषयीं सध्यां वाद आहे, त्यांत जी योजिली होती तीच आहे, असें ह्मणतों. तथापि आह्मास हेंही दर्शविणें योग्य आहे कीं जीं अक्षरें **मिसर** देशांत व इतर देशांत चालत होतीं तीं संकेतात्मक होतीं, परंतु ती लिपि कशी उत्पन्न झाली व तिचा प्रसर कसा झाला हें सांगावयास आह्मापाशीं कांहीं दाखला नाहीं.

सृष्टीचे आरंभीं कोणता धर्म चालत होता याविषयीं आह्मापाशीं साफ लेख नाहींत, परंतु असें दिसतें कीं, मनुष्यांचा पहिला सात्विकपणा नष्ट झाल्यावर लौकरच ईश्वरोद्देशानें यज्ञयागादि कर्में व बलिप्रदानें चालू झालीं तीं प्रथमतः कुळांत श्रेष्ठ असेल त्याणें अर्पावीं, असें ठरलें; नंतर जातीमध्यें श्रेष्ठ असेल त्याणें द्यावीं असा पाठ पडला;

शेवटीं थोर पदवीस मनुष्य ह्मणजे ज्याचे कुळांत धर्माधिकाराचा हक्क वंशपरंपरेनें चालत असेल त्याणें द्यावीं, अशी वहिवाट पडली. यावरून असें दिसतें कीं, ह्याच वेळेपासून ब्राह्मण जातीची उत्पत्ति आहे व ती जात सर्व युगांत व सर्व राष्ट्रांमध्यें प्रसिद्ध आहे. जलप्रलय झाल्यावर कांहीं दिवसपर्यंत सगुण व निर्गुण ईश्वराची भक्ति चालू होती, परंतु दंतकथेपासून प्राप्त झालेलें धर्मज्ञान दिवसानुदिवस कमी होऊन लोक ईश्वरभजनाविषयीं मनास वाटल्या तशा कल्पना चालवूं लागले त्यामुळें ते उत्तरोत्तर अगदीं मूर्तिपूजक झाले. **हिंदुस्थानांत** मूर्तीची पूजा कोणते युगापासून चालू झाली याचा शोध आह्मास लागत नाहीं; जीं देवतांचीं नावें सांप्रतकाळीं त्या देशांत प्रसिद्ध आहेत तीं तेथील सिद्ध पुरुषांनीं वेदांत उत्पन्न केल्यावर फार दिवसपर्यंत त्या देशांतील योद्धे किंवा सिद्ध पुरुष यांचे वेळेस अगदींच माहित नव्हतीं. तथापि **सिंधुनदी** ह्मणजे **अटकनदी** इचे पश्चिमेकडील देशांमध्यें खऱ्या धर्माचा लोप कधीं झाला याविषयींचा वृत्तांत त्यापेक्षां साफ लिहिलेला आहे. **बाबिलन शहर**चे लोकांनीं ज्योतिषविद्या उत्पन्न केल्यावर प्रथमतः तेच लोक मूर्तिपूजक झाले. त्यांणीं स्वर्गवासी लोक ह्मणजे ग्रह नक्षत्रादिक यांचे गतींची गणना केल्यावरून त्यांमध्यें ईश्वरी तेज आहे असें त्यांस भासून ते त्यांस ईश्वराप्रमाणें मानूं लागले. तेव्हांपासून सूर्य चंद्र व तारे यांस देव मानून त्यांची पूजा करूं लागले, या प्रकारें मूर्तिपूजा चालू झाली. त्यानंतर योद्धे व सिद्धपुरुष व राजे यांची पूजा निघाली. मनुष्यास देवतेसमान मानूं लागल्या-

चा दाखला जुन्या पुस्तकांत पाहिला असतां पूर्वी **बेलस** या नांवाचे मनुष्यानें **चाल्डिया** देशांत ज्योतिष उत्पन्न केलें त्याचा आहे. त्याचे नांवानें लोकांनीं एक थडगें बांधून ते त्यास **बेल** या नांवाचा देव ह्मणून पुजूं लागले. त्यानंतर पंच तत्वें व पर्वत व नद्या यांची पूजा चालू झाली. शेवटीं नाना प्रकारचे दुर्गुणासही देवतेप्रमाणें मानूं लागले. याप्रमाणें खऱ्या ब्रह्मज्ञानाचा लोप झाल्यानें ईश्वरी पूजनाचें अगत्य कमी होऊन मनुष्यें उत्तरोत्तर इतके ढोंगांत शिरलीं कीं त्यांस पुजेचे कामास अयोग्य असा कोणताही पदार्थ राहिला नाहीं.

मनुष्यास देवतेप्रमाणें मानूं लागल्यावर थोडकेच दिवसांनीं ईश्वरानें **आब्राहीम** या नांवाचा मनुष्य **बाबिलोनिया** देशांत राहात होता त्यास बोलावून नेऊन असें सांगितलें कीं माझें खरें ब्रह्मज्ञान तूं व तुझे पुत्र पौत्रादिक यांजपाशीं राहील. (त्याप्रमाणें झालें) पुढें **आब्राहीम** याणें **चाल्डिया** देशांत नवे धर्म उत्पन्न झाले होते त्यांशीं द्रोह केल्यावरून लोकांनीं त्यास देशांतून काढून दिलें. तेव्हां ईश्वरानें त्यास **केनान** देशास जावयास सांगितलें, व तो देश त्याचे पुत्र पौत्रादिकांस बक्षीस देऊन त्यास असें वचन दिलें कीं, तुझ्या कुळांत कांहीं दिवसांनीं **मेशिअस** या नांवाचा एक अवतारी पुरुष उत्पन्न होऊन आपलाच देह बळी देऊन पापी लोकांचा उद्धार करील. पुढें **आब्राहीम** यापासून एक पुत्र **ऐज़ाक** नामें उत्पन्न झाला व त्यापासून **जेकब** नामें झाला व **जेकबाचे** बारा मुलांपासून **यहुदी** लोकांच्या बारा जाती उत्पन्न झाल्या. **जेकब** हा एके वर्षी दुष्काळ पडला असतां आपल्या

कुटुंबासहित (केनानचे देशाहून निघून) **मिसर** देशास गेला. तेथें त्याचा पुत्र **युसुफ** त्या देशचा मुख्य प्रधान झाला होता, त्याणें त्यास **गोशन** देशांत ठेविलें. हिकडे आसपासचे देशांतील लोक दिवसानुदिवस ज्याजती मूर्तिपूजक झाले, परंतु साक्षात् ईश्वराचें आराधन विशेषें करून **यहुदी** लोकांचेच घराण्यांत राहिलें.

**बाबिलन** शहरांतून लोक बाहेर निघून गेले होते, त्यांपैकीं कांहीं लोकांनीं **एशिया** खंडाचे पश्चिम सीमेचा जो समुद्र आहे त्याचे कांठीं जाऊन जाहाजांत बसून त्या समुद्राचे पार उतरून तेथें **ग्रीस** नामें देश आहे त्यांत अम्मल केला. त्यांपैकीं कांहीं लोक फेरा घेऊन खुषकीनें **थ्रेस** देशामधून त्या देशास गेले असें अनुमान होतें. तेथें रान फारच वाढलें होतें, तें त्यांणीं कापून काढून जमीन साफ केली. त्या देशाचा दक्षिणभाग ज्या लोकांनीं प्रथम वसविला, त्यांस "**पेलासजी**" अशी संज्ञा पडली. व ज्यांणीं उत्तर भाग वसविला त्यांस **हिलेनिस** असें ह्मणत असत. **पेलासजी** यांचें प्रथम स्थान सुमारें ज्या वेळेस **आब्राहीम** उत्पन्न झाला त्याच वेळेस **इनाकस** या नांवाचे पुरुषानें **अरगास** येथें स्थापिलें. त्यावरून सर्व **ग्रीक** लोकांमध्यें **अरगास** हें शहर प्राचीन असें ह्मणवितें. पुढें कांहीं दिवसांनीं **हिलेनिस** लोक **पेलासजी** यांजवर चढाई करून त्यांस त्यांचे मुलखांतून काढून देऊन संपूर्ण देशाची वहिवाट आपलेच नांवानें करूं लागले.

**हिलेनिस** लोकांची त्या देशांत वस्ती कायम झाल्यावर त्यांच्या चार जाती झाल्या, त्यांस **डोरिक**, **आई ओनिक**, **इओलियन्**, आणि **अटिक**, अशीं नांवें झालीं. ह्या

चार जातींनीं पुढील राज्यक्रांतींमध्यें आपापले जातीचे भेद कायम ठेविले होते. शेवटीं त्याही लोकांचा अम्मल परदेशांतून सुधारलेले लोक त्या देशास आले होते त्यांचे हातून नष्ट झाला. त्या लोकांचा इतिहास आह्मी पुढे सांगूं.

आतां **ग्रीस** देशाचा इतिहास कांहीं काळपर्यंत महकुब ठेवून आह्मी **मिसर** देशाचा इतिहास आरंभितों तो फार संशययुक्त आहे, तथापि आह्मी खरे प्रमाणावरून सावीत कारितों कीं हाच पहिला देश, व मुळीं ह्याच देशांत विद्या व कळा यांचा उत्कर्ष होऊन लोक होषयार झाले. आणि ज्या ज्या गोष्टींनीं मनुष्यमात्राचें उपजीवन होतें व भूषण वाढतें त्या सर्व गोष्टी **मिसर** देशचे लोकांनीं उत्पन्न करून अडाणी लोकांस शिकविल्या. ह्या देशांत कांहीं स्वतःसिद्ध फायद्याचीं लक्षणें होतीं तेणेंकरून त्या लोकांचा शहाणपणा लवकरच वाढला. **आफ्रिका** खंडांत हाच एक देश असा होता कीं जेथें **नाइल** नामें एक मोठी नदी आहे तींत जाहाजें दूरवर चालत असत व त्या नदीस गंगेप्रमाणें दरसाल पूर येऊन हिंवाळ्यांत जागोजाग पाणी शेष राहात असे तेणेंकरून जमिनींची आबादानी होई, व दुसरें, **आफ्रिका** खंडांतून **एशिया** खंडांत अथवा **एशियेंतून आफ्रिका** खंडांत खुषकीनें जाणें झालें तर केवळ ह्याच देशांतून रस्ता होता, व तेथील लोकही मोठमोठाले व्यापार करीत होते, त्याजमुळें त्यांचें माहात्म्य चोहोंकडे फार वाढलें होतें. तेथील वस्ती दक्षिणेकडून उत्तरेकडेस वाढत गेली व तेथील **प्रीस्त** ह्मणजे धर्माधिकारी हेही हिंदुस्थानांतील

**ब्राह्मण**सारिखी एक पृथक् व प्रतिष्ठित जात होती. तेच लोकांस एक देशांतून दुसऱ्या देशांत घेऊन जात असत. त्या देशचा उत्तरभाग त्या देशचे इतर भागांपेक्षां अधिक पिकाऊ आहे. कारण कीं त्यांतून **नाइल** नदी वाहून समद्रास जाऊन मिळतें.

**मिज़राम** याणें त्या देशाची वसाहत केल्यापासून क्रिस्ताचे पूर्वीं १६०० वर्षेपर्यंत त्यांत पंचवीस राजे झाले असें वाटतें, सुमारें ह्याच वेळेस **आरबस्थानांतून विडोईन** नांवाच्या **आरब** लोकांची फौज येऊन त्याच्या उत्तरेकडून फलद्रूप देशावर पडून त्यांणीं गांवें व खेडीं जाळून राहणाऱ्यांस मारून संपूर्ण मुलुक उजाड केला. परंतु मुख्यत्वेंकरून **इजराइल** याची संतति ह्मणजे **यहुदीलोक** हे **गोशन** देश हा **मिसर** देशचा ईशान्येकडचा एक तुकडा आहे त्यांत राहात होते, त्यांस फारच इजा दिली. तेव्हां ईश्वरास दया येऊन त्याणें **मुसा** या नांवाचा पुरुष उत्पन्न करून त्यास सांगितलें कीं, **यहुदी** लोकांस एथून काढून **कनाअन** देशांत त्यांसाठीं स्थान नेमून ठेविलें आहे त्यांत नेऊन पोंचवावें. त्याप्रमाणें **मुसा** याचे सोबतीनें व ईश्वराचे आश्रयानें सुमारें साहालक्ष ६०००० **यहुदी** लोक आपल्या बायका मुलांसुद्धां निघून बाहेर पळून गेले त्यांचा पाठलाग **फिरोआ** नामें राजानें केला, परंतु ईश्वराचे इच्छेंकरून त्याची फौज **लाल** समुद्रांत बुडून नाश पावली. परंतु **यहूदीलोक** त्या समुद्रांतून उतरून पार गेले. ते रस्ता चालत असतां एक पर्वत **मौंट शिनाई** या नांवाचा **एशिया आफ्रिका** व **युरोप** ह्या तिन्ही खंडांचे मध्यभागीं आहे, त्या-

चे पायथ्यास जाऊन पोहोंचले. तेथें वारा फार सुटला होता व विजा कडकडत होत्या व पाऊसही पडत होता, अशा समयीं ईश्वरानें प्रसन्न होऊन **हिब्रू** लोकांचे पुढील व्यवस्थेविषयीं आपली इच्छा **मुसा** यास प्रगट करून मनुष्यमात्राचे कल्यांणार्थ एक कायदा दिला. त्यांत दाहा आज्ञा लिहिलेल्या होत्या. **यहूदी** लोकांनीं पुढें ईश्वराची आज्ञा मोडिली, यास्तव त्यांस अशी शिक्षा झाली कीं ४० वर्षेपर्यंत वनवास करावा लागला. पुढें **मूसा** मृत्यु पावल्यावर त्या लोकांमध्यें **जाशूआ** नामें मोठा चतुर योद्धा होता त्याणें त्यांस **कनाअन** देशांत नेऊन तेथें मोठमोठाल्या लढाया करून त्यांत आपला अम्मल बसविला. क्रिस्ती धर्म पुस्तकांत ज्या देशाचें नांव **कनाअन** असें लिहिलें आहे, तो प्राचीनकाळीं **फिनिशिया** देशाचा एक भाग असून जगांत मोठा सुधारलेला मुळीच होता, व त्याची वसाहत प्राचीनकाळीं **हेम** याचे संततीपैकीं जे लोक **बाबिलनचे** मैदानांतून बाहेर नवें स्थान पाहावयास गेले होते त्यांणीं केली होती. तो देश भूमध्यसमुद्राचे पूर्वेचे कांठावर आहे, व त्याचे दक्षिणेस **मिसर** देश आहे. **मिसर** देशांत ज्या ज्या विद्या उत्पन्न झाल्या त्या त्या **फिनिशिया** देशांत त्वरित प्रवृत्त होऊन तेथें पुऱ्या झाल्या. तेथील राहाणारे लोक मोठा व्यापार व सावकाऱ्या करीत होते, यामुळें त्यांस कागद पत्र लिहावे लागत, ह्मणून त्यांणीं परिश्रम करून लिहिण्याचे विद्येची सुधारणा केली; व समुद्राचें कांठावर त्यांचा अम्मल फार दूरपर्यंत व्हावा ह्मणून ते तरीचा व्यापार करूं लागले. यामुळें त्यांचे दवलतीची व शाहाणपणाची वृद्धि

झाली, व त्यांचीं मनेंही थोर मोहिमानीं दृढ झालीं. सदरहू कारणावरून **फिनिशिआ** देशचा शाहाणपणा जसा वाढला होता तसा पृथ्वीवरील इतर कोणतेही राष्ट्राचा वाढला नव्हता, व त्यांतील राजधानी **टायर** शहर यास **समुद्राची राणी** अशी संज्ञा प्राप्त झाली होती.

**आरब** लोक **मिसर** देशांत जाऊन तेथील राहाणारे लोकांवर फारच जुलूम करूं लागले होते, परंतु **मिसर** देशचे दक्षिण विभागांतील **थीब्स** शहरचे राजानें त्यांस मुलकांतून काढून दिलें. नंतर थोडकेच दिवसांनीं **मिसर** देशांत **शिसास्ट्रिस** या नांवाचा एक मोठा प्रतापी राजा उत्पन्न झाला, तसा पूर्वीं कधींही झाला नव्हता. ज्या ज्या गोष्टी त्याजविषयीं इतिहासकर्त्यांनीं लिहिल्या आहेत त्या विश्वास ठेवण्याजोग्या नाहींत, परंतु इतकें खरें आहे कीं, ह्यामागें **मिसर** देशांत जे जे राजे झाले त्या सर्वांपेक्षां त्याचें राज्य थोर होतें. त्याणें त्या काळीं जगांत जे जे मुलुख प्रसिद्ध होते त्यांत तरीनें व खुषकीनें जाऊन आपला अम्मल केला. आणि आठवण राहाण्याजोग्या मोठमोठ्या इमारती बांधून आपल्या जन्मभूमींतील राष्ट्रांचें नांव उजेडास आणिलें. तें तो मृत्यु पावल्यावर फार दिवसपर्यंत चाललें होतें. त्या देशांत **आरब** लोक येऊन जुलूम करूं लागले असतां शहरांतील थोर थोर लोक होते ते तो देश सोडून बरोबर अणखी बहुत लोक घेऊन बाहेर ज्या ज्या देशांत वस्तीची पातळाई होती त्यांत जाऊन राहिले. तेणेंकरून जो शाहाणपणा **मिसर** देशांत होता तो अडाणी लोकांचे मुलुकांत पसरला व लोकांस तरबियत देण्याचे उपाय असे

जोरानें वाढले कीं कांहीं दिवसांनीं **मिसर** देशांतील क-
ळा व विद्या मागें पडल्या.

ह्या प्रवासी लोकांपैकीं **सिक्राप्स** या नांवाचा मनुष्य
हा सर्वांचे अगोदर निघून गेला होता तो आपले सोब-
त्यांसहित **ग्रीस** देशांत येऊन **आटिका** शहरांत राहिला.
नंतर तेथील अडाणी लोकांमध्यें **मिसर** देशचें ज्ञान प्र-
वृत्त करून नांगर कसा चालवावा हें त्यांस शिकविलें,
व कायदे स्थापून जो लौकिक **अटिका** शहरचे लोकांनीं
पुढें मिळविला त्याचा पाया घातला.

**सिक्राप्स** याचे मागून सुमारें ६३ वर्षांनीं **क्याड्मस**
या नांवाचा मनुष्य **मिसर** देशाहून दुसरी एक टोळी प्र-
वासी लोकांची बरोबर घेऊन **अटिका** शहराजवळ **थी-
ब्स** नामें शहर आहे तेथें येऊन पोहोंचला. त्याचा बा-
प ज्या वेळेस **सिक्राप्स** हा **मिसर** देशांतून निघून गेला
त्याच वेळेस निघाला होता. परंतु तो **फिनिशिया** दे-
शांत राहिला होता यामुळें **क्याड्मस** यास **मिसर** देश-
चें ज्ञान असून अणखी त्याचे पुरवणीकरितां **फिनिशि-
या** देशांतीलही ज्ञान प्राप्त झालें. त्याणें प्रथमतः **बो-
षिया** देशास येऊन तेथील राहाणाऱ्यांचा पराभव करू-
न **थीब्ज** शहराचा पाया घातला. तें शहर वाढतां
वाढतां कांहीं दिवसांनीं त्या प्रांतांत सर्वांहून मोठें झालें.
याशिवाय **क्याड्मस** याणें **फिनिशिया** देशांतील लिपि
**ग्रीस** देशांत चालू करून त्या अक्षरांचा डौल उत्तरोत्तर
**ग्रीस** देशचे डौलाशीं मिळविला. नंतर कांहीं दिव-
सांनीं लोक ती लिपि डावे हाताकडून उजवे हाताकडे
लिहूं लागले. पुढें **ग्रीस** देशचे कवी व इतिहासकर्ते

व दैवज्ञानी लोक यांणीं जे ग्रंथ केले तेही त्याच लिपींत लिहिलेले होते व जरी त्यांचे मागून दुसरे नवे नवे ग्रंथ झाले तरी अद्यापपर्यंत त्या देशांत वाक्यरचनेविषयीं ते ग्रंथ उत्कृष्ट नमुने आहेत.

सुमारें ह्याच वेळेस **डेनाअस** नामें एक पुरुष **मिसर** देशांतून निघून **आरगास** शहरांत येऊन राहिला, आणि त्याणें तेथील राज्यकारभार नियमित केला. ह्यावरून बहुदा असें दिसतें कीं, त्याच वेळेस किंवा पाठीमागून कांहीं दिवसांनीं **ग्रीस** देशांतील इतर राज्यामध्यें राज्य-कारभार नेमानें होऊं लागले. याप्रमाणें जे सरदारलोक **मिसर** देशांतून **ग्रीस** देशांत पळून आले होते, त्यांचें उपदेशानें **ग्रीस** देशांतील अडाणी लोक अज्ञान अवस्थें-तून मुक्त होऊन त्यांणीं सुमारें २०० वर्षांचे अवकाशांत **सिक्राप्स** याणें त्या सुधारलेले देशाचे पुढील थोरपणावि-षयीं बंदोबस्त केला. ह्याच संधीस **ग्रीस** देशांत **ऑम-फिक्शनचिक्चेरी** ह्मणजे संपूर्ण राष्ट्राची सभा, हिची स्थापना झाली. ती ज्या मनुष्यानें केली त्याचें नांव **थरमापिलि** नामें घाटी येथें लिहिलेलें आहे. त्या मनु-ष्यानें **ग्रीस** देशांतील सर्व राज्यांतील वकील बोलावून राष्ट्राची तारीफ केली तेणेंकरून सर्वांचा एकोपा झाला.

कांहीं ग्रंथकार असा तर्क बांधितात कीं, ज्या काळीं **मिसर** देशांतून थोर थोर लोक निघून परदेशांत राहा-वयास गेले, त्याच काळीं **ग्रीक** लोकांचीं देवपुराणें उत्पन्न झालीं व **जुपिटर** नामें **ब्रह्मा** ह्मणजे त्यांचे देव-तांचा उत्पन्नकर्त्ता, ह्याचाही त्याच काळीं उदय झाला. तो पूर्वी **क्रीट** देशाचा राजा होता व ज्या विद्या त्याणें

संपादिल्या होत्या त्या ज्या युगांत तो उत्पन्न झाला त्या युगीं दुर्लभ होत्या. तो **ग्रीस** देशांत प्रवास करीत असतां तेथील अर्धवट सुधारलेले अडाणी लोक त्यास प्रथमतः योत्ध्यासमान मानून पुढें कांहीं दिवसांनीं देवतेप्रमाणें भजूं लागले. हा तर्क खरा असो किंवा खोटा असो, परंतु यांत अगदीं संशय नाहीं, कीं **ग्रीक** लोकांच्या देवतार्चनांत सर्व मनुष्येंच होतीं. त्यांत कांहीं अधिकार व शाहाणपणा व शूरत्व असून तीं परोपकारींही होतीं. यामुळें सर्व लोक त्यांस मान देत असत. पुढें काळगतीनें त्यांचे पूर्व वृत्तांतांचा लोप झाला तरी कवींनीं त्यांस देवतांचे पदवीस चढविलें.

**ग्रीस** देशांत धर्मसंबंधीं गुह्य गोष्टी केवळ **ब्राह्मण** जातीचेच स्वाधीन असत, व त्या **ब्राह्मणांचे** कांहीं हक्क सरकारांत असून त्यांस जमीनीही जाहागीरी होत्या. त्यास प्रमाण क्रिस्तीधर्म पुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, **मिसर** देशचे **ब्राह्मणांचे** जमीनीवर कर नव्हते व हा नेम हिंदुस्थानांतही चालत होता. जर **कालडियन** देशचे चालू कागद पत्र आमचे हातास आले असते तर बहुतकरून तसेच नेम तेथेंही चालू होते असें आह्मास दिसून येतें. सदरहु देशांत लिपीचें ज्ञान बहुतकरून **ब्राह्मण** लोकांमध्येंच होतें, ह्मणून राज्यामध्यें त्यांचें आधिपत्य फार वाढून ते मनास येतील तशीं पुराणें योजून अविद्वान लोकांस हीं ईश्वरानेंच केलेलीं आहेत असें सांगून फसवीत होते, व धर्मकृत्यें ग्रहांचे गतीवरून चालत होतीं व त्या गति समजण्याची विद्या केवळ **ब्राह्मणच** जाणत होते यामुळें त्यांचा इतर लोकां-

वर दाब राहात होता. त्याविषयीं अणखीही एक मोठें प्रमाण आहे कीं, **हिंदुस्थान**, **मिसर**, **ग्रीस**, आणि **चालडिया** ह्या देशांतील धर्मशास्त्रें तेथील धर्माधिकारी जे **ब्राह्मण** त्यांणींच योजिलीं होतीं, व त्यांचा मुख्य हेतू हाच होता कीं, धर्म गुप्त ठेवून इतर लोकांस कधीं कधीं उघड करून सांगत जावें ह्मणजे आपलें आधिपत्य त्यांजवर राहील.

ह्या सर्व गोष्टींमुळें इतर लोकांमध्यें ढोंग व अज्ञानपणा वाढून **ब्राह्मण** लोक त्यांजवर मनास वाटेल तसा हुकूम चालवीत होते.

**मिसर** देशचे लोकांची वसाहत **ग्रीस** देशांत झाल्यावर कांहीं दिवसांनीं तो देश अज्ञानावस्थेपासून मुक्त झाला. त्या वेळेपासून **ट्रोजन** लढाईपर्यंत विशेष वारदादी झाल्या त्यांचा वृत्तांत फार संशययुक्त आहे. तथापि त्या काळचे शुद्ध केलेले इतिहासांत एक स्वारी प्रसिद्ध आहे, तिला **"आरगोनाटिक स्वारी"** असें ह्मणतात.

**थेसली** देशांतील राहाणारे लोक हे प्राचीन काळापासून जाहाजांचीं कामें करीत होते यामुळें समुद्रांतील जोखिमेचीं कामें करण्यास ते समर्थ होते. एके समयीं **जेसन** या नांवाचे मनुष्यास कांहीं कारणावरून अगत्य पडून त्याणें एक जाहाज बहुत रुपये खर्च करून तयार केलें. त्यासारिखें पूर्वीं कोणींही केलें नव्हतें. त्या जाहाजांत तो मोठे मोहिमेचे उमेदीनें बसून तें हाकारून **युक्साइन** समुद्रास गेला आणि तेथें नाना प्रकारचीं जोखिमेचीं कामें करून त्यांत यश मिळवून त्याणें व त्याचे

सोबत्यांनीं मिळून **कोलचिस** देशचे राजाची **मेडिया** नामें कन्या बळात्कारानें काढून आणिली. ते माघारे येत असतां जे देश पूर्वीं फारकरून कोणास माहीत नव्हते ते त्यांणीं पाहून तेथें मोठमोठालीं दुर्घट कामें केलीं. ही स्वारी त्या काळीं सर्वांहून मोठी व शौर्याची होती, तिचें कवींनीं वर्णन करून अलंकारार्थ त्यांत अशा खोट्या गोष्टी मिळविल्या आहेत कीं, खरें वर्त्तमान खोटे वृत्तांतापासून वेगळें करूं असा आह्मास अगदीं भरवसा नाहीं. **जेसन** व त्याचे सोबती हे कोणी देवतांचे संबंधी आहेत असें लोकांनीं ठरवून त्यांचीं नांवें **ग्रीस** देशांतील योद्ध्यांचे पटांत लिहिलीं. यावरून आह्मास असें वाटतें कीं, **अमेरिका** ह्मणजे नवें जग याचे प्रसिद्धीचें वर्णन करण्यास ईश्वरानें **ग्रीस** देशचे कवींस नेमलें असतें तर आह्मीही कोलंबस आणि त्याचे सोबती यांस **जेसना**प्रमाणेंच मानितों.

**आरगोनाटिक** स्वारी झाल्यावर थोडकेच दिवसांनीं **बिओशिया** देशांतील **थिब्स** नामें शहर हें **ग्रीस** देशांतील सर्व शहरांहून अधिक लौकिकास आलें. कांहीं कारणावरून सात शहरचे रजवाडे यांणीं एकदिल होऊन त्या शहरचे लोकांशीं लढाई केली. त्याचा परिणाम विशेषसा झाला नाहीं, परंतु एके सामान्य गोष्टीसाठीं इतके रजवाड्यांमध्यें एकोपा झाला हें त्यांचें पुढील ऊर्जितकाळाचें चिन्ह दिसतें.

**क्रीट** नामें बेट व त्यांतील **माइनास** नामें कीर्तिमान राजा ज्याणें **ग्रीस** देशांत प्रथम कायदे करण्याची रीति उत्पन्न केली त्यांचा वृत्तांत ह्या इतिहासाचे काळांत

लिहिणें जरूर आहे. **क्रीट** बेट हें **ग्रीस** देशापासून थोडें दूर आहे व त्याचे आसपास **मिसर** व **फिनिशिया** हे दोन्ही देश आहेत. ह्या दोन्ही देशचे लोक प्राचीन काळीं इतर राष्ट्रांचे अगोदरच सुधारलेले होते, व त्याच दोन्ही देशांपासून **क्रीट** बेटाचीही सुधारणा झाली. परंतु **माइनास** उत्पन्न होई तोंपर्यंत त्या बेटाची फारशी कीर्ति वाढली नव्हती. त्या राजानें आपले पराक्रमानें किंवा वंशावलीचे अनुक्रमानें राज्याधिकार मिळवून आपले प्रजेची सुधारणा करून **ग्रीस** देशाचें कल्याण करण्यास उद्योग केला. त्या काळीं **ग्रीस** देशचे समुद्रांत लुटारू फार उपद्रव करीत होते. यास्तव त्याणें जाहाजांचा एक समुदाय तयार करून त्यांस नाहींसें करून टाकिलें. त्याचे राज्यांतील लोक अर्धवट शाहाणे होते, ते कायदा किंवा कळाकौशल्यें जाणत नव्हते, ह्मणून त्याणें त्यांचे मनांत ज्ञान संपादन करण्याविषयीं आस्था उत्पन्न करून एक कायद्याचें पुस्तक तयार केलें. त्यास जसे सांप्रत हिंदु लोक मनूचे शास्त्रास मानितात त्याप्रमाणेंच **ग्रीस** देशचे पुढील काळचे लोक मानीत होते. याशिवाय त्याणें राज्यकारभार करण्याची जी रीति त्या बेटांत स्थापिली होती ती ह्या सुधारणा कायम करण्यास फारच लागू पडली. सदरहू कायदे व **क्रीट** बेट यांजवर लक्ष देऊन **यवन** ह्मणजे **ग्रीक** लोक हे नेहेमीं आश्चर्य करीत असत. तो राजा मृत्यु पावल्यावर कवींनीं त्यास **बृहस्पती**चा पुत्र ठरवून त्यास यमलोकाचे न्यायाधिशीचे पदवीस पोहोंचवून त्याचे आयुष्याचा वृत्तांत फार विभूषित केला.

**माइनास** राजाचे मागून **ग्रीस** देशांतील योद्धे उत्पन्न झाले. त्या देशांत कांहीं कायदे वहिवाटींत नव्हते, व कांहीं पुरे व्हावयाचे होते, यामुळें तेथील शूर पुरुषांस परिश्रम करण्यास सवड सांपडली. आणि त्याच कारणानें त्या देशचे वडे लोकांचे मनांत मोठमोठाले जोखिमेचे कामाविषयीं हौस उत्पन्न होऊन तीं कामें त्यांणीं स्वदेशीयांचे कल्याणार्थ कबूल केलीं. परंतु फारकरून लौकिक संपादन करण्याकरितां आंगावर घेतलीं होतीं. त्यानंतर त्यांचे करामतीविषयीं **भाट** लोक गीतें गाऊं लागले, तेणेंकरून त्यांचें शौर्य वृद्धिगत झालें. त्या सर्वांमध्यें **हरक्यूलिज** नामें मोठा नामांकित योद्धा होता, त्याचे करामतीचा वृत्तांत लिहिला आहे तो खरा मानून त्याचें वर्णन करूं लागलों तर ह्या संक्षेपयुक्त ग्रंथांत जागा पुरणार नाहीं, सबब लिहितां येत नाहीं. त्याचे मागून **थिसिअस** या नांवाचा एक योद्धा उत्पन्न झाला, त्याणें **क्रीट** देशांत प्रवास करून **माइनास** याचे कायदे शिकून ते त्याणें आपले **आटिका** देशांतील राज्यामध्यें चालू केले, तेणेंकरून कांहीं वर्षांनीं त्या शहराचें माहात्म्य वाढलें. ह्या पुरुषाचे युद्धाविषयीं कवींपाशीं ग्रंथ लिहिलेलेच आहेत, परंतु तो राजा मोठा परोपकारी होता, यास्तव त्याचें नांव या ठिकाणीं दर्शविणें योग्य आहे. त्याचे मागून जे योद्धे झाले त्यांचें सामर्थ्य व शाहाणपण विचित्र होतें तें त्यांणी निरनिराळे पद्धतीनें **ग्रीक** लोकांचे सुखदुखार्थ खर्च केले. ह्या योद्ध्यापासून दुर्घट कामांचा हौसला वडेलोकांमध्यें आपोआप पसरला, तेणेंकरून राष्ट्रांच्या हिंमती वाढल्या. त्या अशा

कीं, जसे जसे लोक सुधरत गेले तशी तशी आपसांमधी-ल फूट नाहींशी होत गेली, व राष्ट्राचा धर्म व राज्यनीति व मसलत एक झाल्यानें सर्वांमध्यें एकोपा होऊन ज्या दुर्घट कामांत संपूर्ण **हिलेनिस्टिक** जातीचे लोक सामील होतील तें काम पतकरावयास **ग्रीक** लोक सिद्ध झाले. सदरहू गोष्टींचा मुद्दा **ट्राय** शहरचे लढाईंत आपोआप दृष्टीस पडला. त्या लढाईचा वृत्तांत आह्मी इतिहासाचे पुढील काळांत सांगूं.

---

# भाग ४.

## क्रिस्ताचे पूर्वी ११८४ वर्षांपासून ५६० वर्षांपर्यंत. काळ दुसरा.

## ट्रोजन लढाईपासून साइरस राजाचे कारकीर्दीपर्यंत.

एशिया मैनर—ट्राय—ट्रोजन लोकांची लढाई—डोरिअन लोकांची स्वारी—ऑलिंपिया येथील तमाशे—लोकसत्तात्मक राज्याची स्थापना—स्पार्टा—लाइकरगस—आथेन्स्—सोलन्—या सर्वांविषयीं वृत्तांत पुढें लिहितों.

इतिहासाचे दुसरे काळांत आह्मी **इजिप्ट** ह्मणजे **मिसरदेश** व **जुडिआ** ह्मणजे **यहूदिस्थान** व **असीरिया** व **बाबिलन्** यांचा इतिहास हीं राज्यें **साइरस** राजाचे राज्यांत मिळत तोंपर्यंतचा लिहून **ग्रीस** देशांतील लोकसत्तात्मक राज्याची सुधारणा होऊन त्यांचा अधिकार वृद्धिंगत झाला व **फारस** देशांत **साइरस** राजानें राज्य

स्थापिलें यांविषयीं वर्णन करूं आणि **रूम कार्थेज्य सिसिली** आणि **स्पेन** या सर्व राज्यांचे मुळोदयाविषयींचा वृत्तांत मागाहून सांगूं.

**एशियामैनर** देश ह्मणजे **एशिया** खंडाचे पश्चिमभागाचा एक तुकडा हा **ग्रीस** देशचे समोर आहे व त्याची वसाहत ज्या पुरूषांनीं केली त्यांची व **ग्रीक** लोकांची उत्पत्ति एकच पुरूषापासून आहे असें दिसतें. तो देश पृथ्वीच्या पृष्ठभागावर सर्वांहून सुंदर आहे व त्यांत ज्या शहराची वसाहत प्रथम झाली त्यास **ट्राय** असें ह्मणतात. त्याचा पाया **डारडेनस्** राजानें **इडा** नामें टेंकडावर घालून कांहीं दिवसांनीं त्याचे भोंवतालीं तट बांधिला. तो इतका मजबूत होता कीं, त्यास लोक ईश्वरीकृत्य असें ह्मणत असत. त्या राजाचे मागून पांच राजे होऊन साहावा राजा **प्रायम** नामें गादीवर बसला. त्याचा पुत्र **पारिस**, हा जाहाजांत बसून दुसरे लोकांचे जाहाजांची लूट करावी ह्मणून **ग्रीस** देशांत गेला असतां त्याणें **स्फार्टा** देशचा राजा **मिनिलेअस** याची भेट घेतली, तेव्हां त्या राजानें **पारिस** यास मेजवानी केली, परंतु त्योणें त्याचा कांहींच उपकार न मानून त्या राजाची **हिलिन** नामक राणी हिला तेथून काढून घेतली व अणखी कांहीं दवलतही घेऊन तो स्वदेशास परत आला. इकडे असें वर्तमान झालें कीं, **मिनलेअस** राजास ह्या गोष्टीची खबर लागल्यावर तो व त्याचा भाऊ **आगेमेमनन** यांणीं **प्रायम** यास त्या अनुचित कर्माबद्दल शिक्षा करावी ह्मणून स्वदेशीय लोकांचे मनांत ईर्षा उत्पन्न केली. ते लोक युद्ध करावयास सिद्ध झाल्यावर **अगे**-

**मेनन** याणें एक लाख फौज व **ग्रीस** देशांतील सर्व योद्धे यांसह जाहजांत बसून **एशियामैनर** देशास जाऊन **ट्राय** शहरास वेढा घातला. तेथें दाहा वर्षें लढाई चालून शेवटीं तें शहर **ग्रीक** लोकांनीं घेतलें. याविषयीं जरी ग्रंथकार असें वर्णन करितात, कीं **ग्रीक** लोक त्या देशांत राहूं लागत तोंपर्यंत तें हस्तगत झालें नव्हतें, तथापि हें खचित आहे, कीं दाहा वर्षांनीं तें शहर युक्तीनें खाली होऊन **ट्रोजन** लोकांचा अधिकार अगदीं नष्ट झाला. नंतर ते विजयी लोक मोठ्या धुमधामीनें **ग्रीस** देशास परत आले, परंतु मागें जबरदस्त लोक त्यांच्या गाद्या बळकाऊन बसले होते असें त्यांणीं पाहिलें. यामुळें त्यांस लोक सामोरे यावयाचे ते न येतां असें झालें कीं, त्यांस आपलीं वतनें सोडून दूर देशांत आश्रयाचीं स्थानें पाहावीं लागलीं. याप्रमाणें त्यांणीं जें दुःख **ट्रोजन** लोकांस लढाईंत दिलें होतें तें, ते लोक स्वदेशास परत आल्यावर त्यांस प्राप्त झालें. **ट्राय** शहराची लढाई क्रिस्ताचे पूर्वीं ११८४ वे वर्षीं झाली. याविषयीं **होमर** नामें कवीनें वर्णन केलें आहे. तो कवी त्या काळचेच कवींमध्यें श्रेष्ठ होता असें नाहीं, परंतु त्याचे मागून **ग्रीस** देशांत जे जे कवी झाले त्यांत त्याचे साम्यतेचा कोणीही झाला नाहीं.

**ट्राय** शहर नष्ट झाल्यावर ऐशीं वर्षांनीं **हिरेक्लाइडा** ह्मणजे **हरक्यूलिज** नामक योद्ध्याचे वंशजांची स्वारी झाली. ते लोक पूर्वीं बहुत दिवसांपासून आपले स्वदेशांतून काढून दिलेले होते ते **डोरिस** देशचे शूर पाहाडी लोकांमध्यें पाहुण्यासारिखे कांहीं वर्षेंपर्यंत राहिले होते. शेवटीं असें झालें कीं, त्या कुळांतील मुख्य पुरुषानें

त्या पर्वतावरील राजाचे कन्येशीं विवाह केला, तेणेंकरून त्याचा अधिकार वाढून त्याणें आपले पूर्वजांचा मुलुख पुन्हा घेण्याचा निश्चय केला. ह्या कामासाठीं पूर्वी त्याचे वंशांतील लोकांनीं बहुत परिश्रम केला होता, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. या वेळीं सर्व **हिरेक्लाइडा** लोक यांणीं आपले फौजेनिशीं बाहेर निघून **पिलोपोनिसस** ह्मणजे **ग्रीस** देशचा दक्षिणभाग याजवर चढाई करून **एकेया** आणि **आरकेडिया** हे दोन मुलुख खेरीज करून बाकीचा सर्व मुलुख सर केला. या स्वारीस "**डोरियन लोकांची स्वारी**" असें ह्मणतात. त्या स्वारीमुळें **पिलोपोनिसस** देशांत राज्याची अगदीं घालमेल होऊन **हिरेक्लाइडा** लोकांनीं मुळचे राजे व त्यांचे प्रजेपैकीं बहुत लोक यांस काढून दिलें, आणि मुलुख आपसांत वांटून घेऊन बाकीचे प्रजेस दासपदवीस मिळविलें. ही गोष्ट त्या काळीं फार वाईट झाली होती, तथापि परिणामीं तिजपासून फार चांगलें फळ झालें. तें असें कीं, **पिलोपोनिसिअन्** लोकांस **हिरेक्लाइडा** लोकांनीं त्यांचे जन्मभूमिकेंतून काढून दिलें असतां जे मुलुख **ट्रोजन** लढाईमध्यें ह्यांचे पाहाण्यांत आले होते त्यांतून फिरतां फिरतां शेवटीं **एशियामैनर** देशांत त्यांणीं जागोजाग वस्त्या केल्या. त्यांचीं पुढें शहरें होऊन तीं मोठे महत्वास आलीं.

इकडे **पिलोपोनिसस** देशांतील लोक दिवसानुदिवस अज्ञानी अवस्थेंत पडूं लागले असतां जे लोक त्यांणीं आपले गुलाम केले होते ते वारंवार बंडें करूं लागले, त्यामुळें त्या सरदारांचा अधिकार कमी होऊन ते आपसांत लढाया करूं लागले. तेणेंकरून संपूर्ण **पिलोपोनिसस**

देशांत फूट व दुःखोत्पत्ति उत्पन्न झाली. ह्या प्रसंगीं **ग्रीस** देशचे नैर्ऋत्य दिशेस **इलिस** नामें सुभ्याचा **इफाइटस** नामें राजा याणें **पिलोपोनिसस** देशांतील बखेडे मोडून तेथें स्वस्थता करावी, असा निश्चय करून **डेल्फी** शहरांतील देवरुशीण साध्वी स्त्री, जिचा चमत्कार संपूर्ण **ग्रीक** लोक मानीत असत, तिला हा ईश्वरीक्षोभ कोणत्या रीतीनें शांत होईल असें विचारण्यास एका मनुष्यास पाठविलें. तिणें सांगितलें कीं, **ओलिम्पिया** येथील तमाशे पुन्हा चालू करावे आणि आपसांतील बखेडे नाहींसे करून सर्व राष्ट्रानें एकत्र होऊन तो तमाशा करण्यास उद्युक्त व्हावें ह्मणजे शांतता होईल. त्याप्रमाणें त्या राजानें तत्काळ लढाया महकुब करण्यास सर्व राजांस खबर देऊन राजेरजवाडे व थोर थोर लोक यांची **ओलिम्पिया** येथें सभा करून तेथें राष्ट्राचें हित होण्यासारिखा तमाशा करविला. त्याचा परिणाम असा झाला कीं, सर्व राष्ट्रांमध्यें लागलाच एकोपा होऊन त्याचा शाहाणपणा व कळा कौशल्यें यांची वृद्धि झाली, व हें तमाशाचें स्थान कांहीं प्रकरणीं संपूर्ण **ग्रीस** देशाची राजधानी होऊन तेथें चार चार वर्षांनीं सर्व राजेरजवाडे व वडेलोक यांची सभा होऊन त्यांत राष्ट्राचे हिताविषयीं वादविवाद व तहनामे असे होऊं लागले. याप्रमाणें लढणारे राजांचे मनांतील वैमनस्य नाहींसें होऊन त्यांमध्यें मैत्रीचा व्यवहार होऊं लागला.

**ग्रीस** देशचे इतिहासांत दुसरी विशेष गोष्ट हीच आहे कीं, त्या देशांतील राजांचा अधिकार दिवसानुदिवस कमी होऊन शेवटीं राज्याचा बंदोबस्त लोकांचे स्वा-

धीन झाला. ह्या काळचा इतिहास पुरता बराबर लिहिलेला नाहीं ह्मणून हरएक राज्यांत ही उलटा पालट कधीं झाली त्या मित्त्या कायम करण्यास आह्मापाशीं कांहीं साधन नाहीं. परंतु असें वाटतें कीं ही वारदाद क्रिस्ताचे पूर्वी ११०० वर्षांपासून ९०० वर्षेपर्यंत ह्मणजे या मधल्या दोनशें वर्षांमध्यें झाली असावी. राज्याधिकार लोकाधीन झाल्यामुळें **ग्रीक** लोकांचे मनांत स्वतंत्रपणाविषयीं मोठी आस्था उत्पन्न होऊन त्यांणीं मोठमोठालीं शूरत्वाचीं कामें केलीं. **ग्रीस** देशांत त्या काळीं लाहान लाहान राज्यें बहुत झालीं होतीं. हरएक शहर जवळचे शहरापासून स्वतंत्र झालें होतें. परंतु ही राज्यव्यवस्था बहुत दिवस चालावयाजोगी नव्हती. यद्यपि कांहीं दिवसांनीं **बिओशिया** देशांत **थिब्स** शहर व **अटिका** देशांत **आथेन्स** व **लाकोनिया** देशांत **स्पार्टा** शहर याप्रमाणें हरएक देशांत एकएक शहर महत्वास येत गेलें, तथापि स्वतंत्रपणाविषयीं लोकांचे मनांतील आस्था कधीं नाहींशी झाली नव्हती. आह्मी जसजसा त्या **ग्रीस** देशाचा इतिहास पुढें पुढें पाहात जातों तसतशी आह्मास खबर लागते कीं, प्रथमतः **ग्रीसदेशाचे** लोकसत्तासक्र राज्याधिकारांत **स्पार्टा** व **आथेन्स** या दोन्हीं शहरांचें आधिपत्य वाढून सर्व सरकारी कामें त्यांतच होऊं लागलीं. त्याकरितां त्यांतील विशेष वर्त्तमान लिहिणें आह्मास जरूर आहे.

**स्पार्टा** देशचे राज्यकारभारांत अशी व्यवस्था झाली होती कीं, त्यांतील लोक राजांची आज्ञा मान्य करीतनासे झाले व राजास राज्य चालविण्यास सामर्थ्य राहिलें

नव्हतें. अशा प्रसंगीं **लाइकरगस** ह्मणून राजाचे वंशांतील शाहाणा व शूर व प्रामाणिक असा मनुष्य होता त्याजवर सर्वांची दृष्टि गेली. यास्तव त्याचे स्वदेशीय लोकांनीं त्यास बोलावून आणून राज्याचा बंदोबस्त करण्यास अधिकार दिला (आणि आपण त्याचे हाताखालीं वागूं लागले) हा मनुष्य **क्रीट** नामें बेटांत प्रवास करीत असतां **माइनास** राजाचे मुलखांतली राज्य चालविण्याची विद्या त्यास माहीत झाली होती, यास्तव त्याणें स्वदेशीय लोकांचें बोलणें तत्काळ मान्य करून राज्याचा बंदोबस्त करण्यास कमर बांधली. त्याविषयीं जे कायदे त्याणें केले त्यांची गणना प्राचीन काळचे आठवण राहावयाजोगे चमत्कारिक ग्रंथांत केलेली आहे. त्याचा सविस्तर वृत्तांत लिहावयास आह्मास ह्या संक्षिप्त इतिहासांत सवड नाहीं, परंतु इतकेंच दर्शवितों कीं, त्याचे कायद्याचा मुद्दा हाच होता कीं सर्वांची अवस्था एकसारिखी असावी. (ह्मणजे कोणी कोणावर जुलुम करूं नये.) व कोणी विषयासक्त न होतां राज्याचें हित करीत असावें. याशिवाय त्याणें राष्ट्राची इतकी अब्रू वाढविली होती कीं तशी कोणी दुसरे कायदे करणाराचे हातून सगळ्या जन्मांत वाढली नसेल. सदरहू कायद्यांचे योगानें **स्पार्टन** लोकांनीं बहुत गुणांचें संपादन केलें व इतकी कीर्ति मिळविली कीं, त्यांस आसपासचे राज्यांतील लोक मान देऊन त्यांची दहशत बाळगूं लागले, व राज्यकारभारांत जी मजबुती त्याणें केली होती ती त्या लोकांनीं बाहेरील मुलुख हस्तगत केल्यानें दृष्टोत्पत्तीस आली.

**मिसेनिया** नामें एक मुलुख त्या मुलखाचे बरोबरीनेंच

लांब व रुंद असून त्यापेक्षां अधिक सुपीक होता, तो त्या देशचे समोरचे कांठावर होता, तथापि पाठीमागून त्याची व ह्याची हद्द मिळालेली होती. सबब त्याच देशचे लोकांशीं प्रथमतः लढाई करण्याचा विचार झाला, आणि दोन रक्तस्रावी लढाया होऊन **स्पार्टन** लोकांनीं तो देश जिंकून आपले राज्यास मिळविला, व जरी त्यांतील लोकांचे व **स्पार्टन** लोकांचे पूर्वज एकच होते तरी त्या गोष्टीचा त्यांनीं कांहीं विचार न करितां त्यांस गुलाम करून ठेविलें. इतकेंही झालें तरी **मिसिनियाचे** लोक कधींही जेरीस आले नाहींत, व जरी तो मुलुख सर केल्यामुळें **स्पार्टन** लोक जोरावर होऊन **ग्रीक** लोकांमध्यें कुलआकत्यारीचे कामांची उमेद बाळगूं लागले, तरी **मिसिनियाचे** लोक त्याच मुलखांत व त्याच कुळांत बंडवाले लोक जमा करून **स्पार्टन** लोकांशी लढाई चालवून त्यांचे मनांत नेहेमीं काळजी उत्पन्न करीत असत. ह्या दोन लढायांपैकीं पहिली लढाई क्रिस्ताचे पूर्वीं ७२२ वे वर्षी व दुसरी ६६८ वे वर्षी याप्रमाणें समाप्त झाल्या.

ह्या काळीं **आथेन्स** शहरांत ज्या ज्या गोष्टी झाल्या त्यांचा वृत्तांत विशेषसा लिहावयाजोगा नाहीं. कारण कीं क्रिस्ताचे पूर्वीं १३०० वर्षांपासून १०६४ वर्षांपावेतों २३३ वर्षें त्यांत राजे यांणींच राज्य केलें. पुढें ३१६ वर्षेपर्यंत मुख्य प्रधानांनीं राज्य केलें. सदरहू प्रधान **कोड्रियन** राजाचे वंशांतून लोकांनीं पसंत करून त्यांस **आर्कन्स** असा किताब देऊन त्यांचे हातून राज्य चालविलें होतें परंतु लोक जसजसे अज्ञानावस्थेंतून निघून शाहाणे होत चालले तसतसा जन्मभर एका मनुष्यास

गादीवर बसवून त्याचे हातून कारभार चालवावा याविषयीं त्यांचे मनांत त्रास उत्पन्न होऊं लागला. शेवटीं त्यांणीं तो कायदा रद्द करून एका मनुष्याचे हातून दाहा दाहा वर्षे राज्यकारभार चालवावा असा कायदा ठरविला. पुढें ७० वर्षेंपर्यंत लोकसत्तात्मक राज्याविषयीं उमेद वाढून आरकन्स ह्मणजे राज्यकारभारी यांची ते प्रतिवर्षीं बदली करूं लागले. पुढें ह्याही बंदोबस्तांत कांहीं व्यत्यय येऊन दर वर्षास नऊ अम्मलदारांची नेमणुक होऊं लागली. तेणेंकरून राज्याधिकार दिवसानुदिवस वडे लोकांचे हातीं जाऊन ते राज्यांतील सर्व कामांचे मक्ते करूं लागले. यामुळें धर्मसंबंधींही अधिकार त्यांचेच हातांत जाऊन ते लोक रयतेवर जुलुम करूं लागले. अशा अंधाधुंदीचा बंदोबस्त करण्याकरितां लोकांनीं क्रिस्ताचे पूर्वीं साहाशें बाविसावे वर्षीं ड्रेको या नांवाचे मनुष्यास नवे कायदे करण्याकरितां अधिकार दिला, परंतु त्याणें कायदे केले ते कठीण होते ह्मणून लोकांस नापसंत होऊन बहुत दिवस चालले नाहींत. पुढें कांहीं दिवसांनीं वडेलोकांच्या दोन फळ्या होऊन उभयतांमध्यें असा द्वेष उत्पन्न झाला कीं, त्यांणीं एकमेकांवर पडून जीव घेतले. शेवटीं देवस्थानेंही भ्रष्ट केलीं. याप्रमाणें राज्यांत अंधाधुंदी झाली व धनी चाकर व सावकार व कर्जदार हे एकमेकांशीं उघड लढाया करूं लागले. असें झालें तेव्हां क्रिस्ताचे पूर्वीं ५९४ वे वर्षीं लोकांनीं सोलन नामें मनुष्यास राष्ट्राचे हितार्थ कायदे करण्याकरितां बोलावून आणिलें. तो मनुष्य मोठा विद्वान व दरबारी कामांत सर्वांहून शाहाणा होता.

त्याणें राज्यांतील बखेडे मोडून कर्जदारांस मुक्त करण्याक-रितां रुपयांचें व्याजही कमी केलें. त्यानंतर त्याणें थोर लोकांचे कांहीं अधिकार कमी करण्याकरितां शहरां-तील लोकांच्या दवलती पाहून त्याप्रमाणें त्यांच्या चार प्रती केल्या. पैकीं वडेलोकांस मोठमोठालीं अधिका-राचीं कामें दिलीं. परंतु गरीब लोकांतून चारशें लोक निवडून त्यांची एक सभा स्थापून असें ठरविलें कीं त्यां-तील लोक दरवर्षास बदलत जावे. ह्या सभेच्या यो-गानें गरीब लोकांचा थोर लोकांवर दाब राहून त्यांस राज्यकारभारांत सामील केल्यामुळें ते हळू हळू नवीन अधिकार संपादूं लागले. शेवटीं त्याणें वडेलोक व ग-रीब लोक यांपासून शपथा घेऊन असा करार करून घेतला कीं आपल्या कायद्यांत दाहा वर्षेंपर्यंत त्यांणीं कांहीं अदलाबदल करूं नये.

इतकेही चांगले कायदे होते तथापि लोकांमध्यें वि-रोध मोडून स्वस्थता झाली नाहीं. कारण कीं, आपसां-तील निरनिराळ्या फळ्यांचा पक्षपात मोडला नव्हता. शेवटीं थोर लोकांमध्यें फूट पडून गरीब लोकांनीं आपले तर्फेनें **पिजिसट्रेटस** या नांवाचे मनुष्यास राज्याधिकार दिला.

त्याणें दुसरे कोणास राज्यकारभारांत न घेतां आप-लेच मतानें असें क्रूरपणानें राज्य चालविलें कीं त्यास सर्व लोक जुलुमी कारभारी असें ह्मणूं लागले. तथापि हें खरें आहे कीं, तो त्या काळीं सर्व राष्ट्रांमध्यें शाहाणा व सुधारलेला मनुष्य होता. त्याणें **सोलन** याणें केलेले कायदे बळानें पुन्हा चालू करून विद्या व कळा शिक-

ण्याविषयीं लोकांचे मनांत अशी इच्छा उत्पन्न केली, की वी लोकांचे मनांत ठसून पुढील काळीं **आथेन्स** शहराचा मोठा लौकिक झाला. त्यास दोष लावावयाजोगी इतकीच गोष्ट होती कीं, त्याणें राज्यकारभार जबरदस्तीनें मिळविला. पुढें तो मृत्यु पावल्यावर त्याचे दोन पुत्र **हिपार्कस** व **हिपिअस** यांस राज्याधिकार प्राप्त होऊन ते आपले बापाच्या चालीप्रमाणेंच कारभार करूं लागले. परंतु त्यांतून वडील पुत्र **हिपार्कस** हा आपसांतील एके लढाईमध्यें मारला गेला, आणि त्याचा धाकटा भाऊ **हिपिअस** यास मुलखांतून काढून दिल्यावर तो **एशिया** खंडांत फारस देशचे सुभेदाराकडे गेला. नंतर वडेलोकांमध्यें पुन्हा कलह होऊन पहिलेप्रमाणें निरनिराळ्या फळ्या झाल्या आणि गरीब लोकांनीं त्यांचे पंच होऊन आपलें माहात्म्य वाढविलें. देशांतून **हिपिअस** यास काढून दिल्यावर चार वर्षांनीं **क्लिस्थिनस** या नांवाचे मनुष्यानें गरीब लोकांशीं आपला ऋणानुबंध चांगला असावा ह्मणून जी राज्यव्यवस्था पूर्वी **सोलन** याणें केली होती तीच कायम करून गरीब लोकांचे अधिकार वाढवून त्यांस वडेलोकांपासून जय मिळविण्यास रस्ता करून दिला. हिकडे वडेलोकांनीं आपले मदतीकरितां **स्पार्टा** देशचे लोकांस बोलावून आणिलें. त्यांणीं कांहीं दिवस यश संपादिलें, परंतु येणेंकरून असें झालें कीं, त्यांचे शत्रु ह्मणजे गरीब लोक, यांणीं **पारशी** लोकांपाशीं हुकुम मागावयास वकील पाठविले, परंतु त्यांचा त्या दरबारांत यथास्थितपणें सत्कार झाला नाहीं. ह्मणून त्यांचे मनांत वाकडें येऊन ते माघारे आले.

इकडे बडेलोकांमध्यें असा मजकूर झाला कीं, **स्पार्टन** लोकांनीं बडेलोकांस पुस्तपन्हा देण्याविषयीं पुन्हा प्रयत्न केला, परंतु त्या कामांत त्यांस यश न मिळून शेवटीं संपूर्ण राज्यकारभार गरीबलोकांचेच हातीं आला. याप्रमाणें **ग्रीस** देशांतील दोन्ही मुख्य लोकसत्तात्मक राज्याची स्थिति होती. परंतु **आथेन्स** शहरचे लोकांनीं प्रथमतः आपलेकडूनच **पारशी** लोक यांची आगळीक करून आपले लहानशा राज्यावर त्या प्रतापी राष्ट्राचें परचक्र आणिलें. तेणेंकरून त्यांचा फार नाश झाला. ह्या दोन्ही राज्यांशिवाय **ग्रीस** देशांतील इतर लाहान लाहान लोकसत्तात्मक राज्यें यांचा वृत्तांत ह्या संक्षिप्त इतिहासांत लिहावयाजोगा नाहीं, यास्तव उगाच फुगवून लिहितां येत नाहीं.

## ग्रीक लोकांनीं परदेशांत जाऊन नव्या वस्त्या केल्या त्याविषयीं.

प्राचीन काळीं ग्रीक लोकांप्रमाणें अधिक आस्थेनें दुसरे कोणतेही देशचे लोकांनीं परदेशांत जाऊन वस्त्या केल्या नव्हत्या. त्यांचे व्यापार उत्तरोत्तर वृद्धिंगत झाले यामुळें ते लोक परदेशांत नव्या वसाहती करूं लागले परंतु मुख्य कारण असें होतें कीं, त्या देशांतील लोकांमध्यें द्वेष पडून ते आपसांत लढाया करूं लागले, तेव्हां जे अशक्त होते, ह्मणजे ज्या लोकांचा लढाईंत पराभव झाला होता, ते तेथून निघून परदेशांत राहावयास निघाले. अणखी त्या देशांत वस्तीची दाटीही फार झाली

होती, यांमुळे बहुत लोक बाहेर निघून गेले. सारांश परदेशांत जाऊन नवा मुलुख वसविण्याविषयीं **ग्रीक** लोकांमध्यें असा हौसला वाढला होता कीं, क्षुल्लक कारणावरून देखील लोक परदेशास जाऊन नवी वसाहत करीत असत.

परदेशांतील ह्या सर्व वस्त्यांमध्यें पहिली वस्ती **एशियामैनर** देशांत झाली होती, तो देश **ग्रीस** देशाचे समोरचे कांठावर आहे. **ट्रोजन** लढाईच्या प्रसंगीं **ग्रीक** लोकांस त्या सुंदर देशाची माहीतगारी झाली होती. मग जेव्हां त्यांचे मुलखांत राज्यक्रांति झाली तेव्हां ते लोक आपले जन्मभूमिकेंतून निघून त्या देशांत वस्ती करायास गेले. दुसरे, **हिरेक्लाइडा** लोकांनीं **पिलोपोनिसस** देशावर चढाई करून तेथील राजांचा पराभव करून त्या मुलखांतून बहुत **ईओलियन** लोकांस काढून दिलें. तेव्हां ते राजे तत्काळ आपल्या प्रजांसहित जाहाजांत बसून नवें स्थान पाहावयास निघाले. ते **एशियामैनर** देशचे हद्दीवर पोंचल्यावर **ट्रोजन** लोकांचे राज्यांपैकीं जो भाग राहिला होता तो त्यांणीं नष्ट करून त्यांत व आसपासचे बेटांत आपला अम्मल केला. नंतर ऐशीं वर्षांनीं **आथेन्स** शहरांतील राजाची सत्ता नाहींशी होऊन लोकसत्तात्मक राज्याधिकार झाल्यावर त्या शहरांतील लोकांनीं **आइओनियन्** लोकांस तेथून काढून दिलें. तेव्हां त्यांणीं **एशियामैनर** देशास जाऊन आपले जातभाई ह्मणजे **पिलोपोनिजियन** अर्थात् **इओलियन** लोक यांचे दक्षिणेकडचे मुलखाची वसाहत करून त्यांत बारा शहरें बांधिलीं. तीं एकमेकांपासून स्वतंत्र

होतीं. तथापि ते एकच दरबार करून राष्ट्राचे नांवानें कारभार करीत होते. सदरहू बारा शहरांपैकीं **मिले-टस** हें त्या काळीं जगांत दुसरे प्रतीचें व्यापाराचें शहर झालें, आणि त्यांतील व्यापाऱ्यांनीं काळ्या समुद्रापर्यंत व्यापार चालवून त्या समुद्राचे कांठावर सुमारें १०० गांव वसविले. याशिवाय ते लोक खुषकीनें **एशिया** खंडाचे मध्यभागींही माल नेत होते. सारांश ते इतके जबर व्यापारी झाले होते, कीं त्यांपेक्षां **टायर** शहरचे लोकांचा मात्र व्यापार जास्ती होता. अणखी एक त्या देशांत दुसरे प्रतीचें व्यापारी शहर होतें त्यास **फोशिया** असें ह्मणत असत. त्यांतील राहाणारे यांचा पश्चिम दिशेस इतका व्यापार वाढला होता कीं, जितका वर लिहिलेले शहरचे लोकांचा उत्तरेस व पूर्वेस वाढला होता, व ह्या शहरांतील खलाशी लोक **जिब्राल्टर** नामक खाडीपर्यंत जात होते व त्यांणीं **इटली** व **गाल** ह्या दोनी देशांत कांहीं नवे गांवही वसविले होते. त्यांपैकीं **मार्सेलिज** या नांवाचा गांव प्रसिद्ध आहे. तो **फ्रान्स** देशचे दक्षिण भागाचे टोंकावर आहे. त्याचा पाया **फोशियन** लोकांनीं दोन हजार वर्षांपूर्वी घातला होता व हल्लीं पृथ्वीमध्यें तो गांव व्यापाराविषयीं सर्वांहून थोर आहे.

याशिवाय नवी वसाहत करणारे लोकांचा तिसरा समुदाय जो **एशियामैनर** देशास गेला त्यास "**डोरियन**" लोक असें ह्मणतात. त्यांणीं तेथें जाऊन **आईओनियन** लोकांनीं मुलुख वसविला होता त्याचे दक्षिण भागांत अम्मल केला ह्या अमलाखालीं **कास** व **ऱ्होड्स**

या नांवें दोन बेटें लागत होतीं. याप्रमाणें समुद्राचे कांठावर होषयार व मोठमोठालीं जोखिमेचीं कामें करणारे **ग्रीक** लोक यांणीं अनुक्रमानें वस्त्या केल्यावर ते लोक आपसांतील फूट व बखेडे यांपासून मुक्त होऊन त्यांणीं लोकांस सुधारण्याची विद्या पुरी केली व मोठा व्यापार चालू करून एक मोठा जाहाजांचा कारखाना उत्पन्न केला, व त्याच वेळेस त्या रमणीय देशांत ज्योतिषादि विद्या व कळा व कविता यांचा उदय केला. **होमर** ह्मणून कवि श्रेष्ठ होता. ज्याणें कविता करण्याचे नेम नवे केले, तो त्या देशांत राहत होता, व त्याच देशांत **आलशीअस** व **सेफो** या नांवाचे दोन मनुष्य राहात होते त्यांणीं ती विद्या प्रज्वलित केली. सदरहू नवे मुलुख वसविणारांचे मनांत जशी विद्या शिकण्याविषयीं इच्छा उत्पन्न झाली होती, तशी त्यांचे जन्मभूमिकेंतील लोकांचे मनांत उत्पन्न होऊन जे लोक **ग्रीस** देशांतून काढून दिले होते तेच पुढें होऊन त्यांणीं त्या मुलुखाची सुधारणा केली.

पुढें **मिलेटस्** शहरांतून कांहीं लोकांनीं बाहेर जाऊन **प्रापोंटिस** व काळा समुद्र यांचे कांठावर कांहीं नवे गांव वसविले त्यांत **रूस** देशाचे दक्षिणभागापासून ताहद **मोठे बुखारिआ**पर्यंत जो देश तेथचा माल येऊन मोठा व्यापार होऊं लागला. हे गांव बहुतकरून क्रिस्ताचे पूर्वी ८०० वर्षांपासून ६०० वर्षांपर्यंत जीं दोनशें वर्षें त्या दोनशें वर्षांमध्यें वसवलेले असतील असें वाटतें.

**कारिंथ** आणि **आरगास** ह्या नांवांच्या देशांतून कांहीं लोकांनीं जाऊन **मासिडोन** व **थ्रेस** या देशांचे सर-

हद्दीवर कांहीं गांव वसविले होते. क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें ७५० वर्षांपासून ६५० वर्षांपर्यंत **ग्रीस** देशांतून कांहीं अणखी लोक बाहेर निघून गेले. त्यांणीं **इटली** देशाचे दक्षिणभागांत कांहीं नव्या वसाहती केल्या त्याचा थोडकेच अवकाशानें इतका उत्कर्ष झाला कीं, त्या देशास **थोरला ग्रीसदेश** असें नांव पडलें. ह्या नव्या वसविलेले देशांत **टारेन्टम, क्रोटन,** आणि **साइबेरिज** ह्या शहरांचे पाये पडून तीं थोडकेच दिवसांत महत्वास आलीं. **साईबेरिज** आणि **क्रोटन** या शहरांतील लोकांमध्यें लढाई झाली त्या वेळेस **साईबेरीज** शहरचे लोकांनीं रणभूमींत ३००००० फौज आणिली होती. परंतु **पाइथागोरस** नामें प्राचीन काळचा पहिले प्रतीचा पंडित पुरुष ह्या शहरांत राहात होता यामुळें तें शहर फारच प्रसिद्ध झालें. सुमारें ह्याच वेळेस **कारिंथ** देशचे दुसरे लोकांनीं **सिसिली** बेटांत नव्या वस्त्या केल्या, व **साइरेक्यूज** नामें प्राचीन काळचें जें मोठें प्रसिद्ध शहर त्याचीही वसाहत त्याच बेटांत समुद्राचे कांठावर झाली. सारांश **ग्रीक** लोकांचे मनांत परदेशांत नवे गांव वसविण्याविषयीं इतकी उत्कंठा वाढली होती कीं त्यांणीं **स्पेन** देशचे दूर दूर भागांत व **आफ्रिका** खंडांतील **सिरिन** नामक मुलखांत जाऊन तेथें नवे गांव वसविले, व **ट्रोजन** लढाई झाल्यानंतर लागलेच त्यांणीं **ग्रीस** देशांत राजांचें आधिपत्य नाहींसें करून राज्यकारभार आपलेच हातांत घेतला यामुळें त्यांस स्वतंत्र राहाण्याची इच्छा प्राप्त झाली व ते मोठमोठालीं जोखिमेचीं कामें करावयाची हिंमत बाळगूं लागले. इकडे नवे मुलुख त्यांणीं समु-

द्राचे कांठीं वसविले होते, त्यांतील लोक नवे राज्यांचा पाया घालूं लागले. याप्रमाणें **ग्रीक** लोकांमध्यें आपसांत एकोपा व बाहेर मोठा दवदबा होता. अशा समयीं त्यांणीं **फारस** देशचे लोकांशीं लढाई केली.

आतां ह्या देशचा इतिहास कांहीं काळपर्यंत एकीकडे ठेवून आह्मी पृथ्वीवरील इतर राष्ट्रांचा इतिहास ह्या काळपर्यंत झाला आहे तो सांगण्यास प्रवृत्त होतों.

## मिसर देशाविषयीं.

**ट्रोजन** लढाई झाली त्याकाळीं **मिसर** देशांत थोरला **सिसास्ट्रिस** याचे वंशांतील कोणीएक राजा राज्य करीत होता व ह्याच वंशांतील राजांनीं क्रिस्ताचे पूर्वी १५०० वर्षांपासून ९०० वर्षेंपर्यंत त्या देशांत राज्य केलें आणि त्याच काळांत **पिरिमिड** नांवाच्या मोठमोठाल्या त्रिकोनाकृति इमारती व थोर थोर थडगीं बांधलीं. वीं बांधून २५०० वर्षें झालीं तरीं अझून तशींच कायम राहिलीं आहेत व त्यांचे योगानें प्रवासी लोकांस तो देश सांप्रत काळीं फार रमणीय दिसतो. सदरहू ६०० वर्षांमध्यें **मिसर** देशचा मोठा उत्कर्ष होऊन लोक शास्त्राप्रमाणें वागूं लागले. ते असे कीं, जातीचा भेद फारच वाढला व **ब्राह्मण** लोकांनीं सरकारांतील अधिकाराचीं कामें आपसांत वाटून घेऊन राजांस धर्मकृत्यांनीं बांधून टाकिलें धर्मसंबंधीं ज्या गुप्त गोष्टी होत्या त्या त्यांणीं इतर लोकांस न समजूं देतां तशाच गुप्त राखाव्या ह्मणून धर्माचीं पुस्तकें **हैरोग्लिफिक** नामक सांकेतिक लिपी-

मध्यें लिहिलीं होतीं. तीं केवळ त्या लोकांसच वाचतां येत होतीं. या सर्व गोष्टींवरून आह्मी अनुमान करितों कीं, **हिंदुस्थानांत हिंदू** जातीचे राजे राज्य करीत असतां जशी त्या देशांची रीति स्थिति होती तशीच ह्या ६०० वर्षांमध्यें **मिसर** देशाचीहि झाली होती.

क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें ९०० वर्षें **सेबाको** या नांवाचा एक शूर पुरुष हब्ष ह्मणजे **इथिओपिया** या देशांतून येऊन त्याणें **मिसर** देशांत अम्मल केला. पुढें तो मृत्यु पावल्यावर कोणी **सिथास** नामें एक **मिसरदेशी ब्राह्मण** आपणच गादीवर बसला, नंतर लौकरच त्या राज्यांतील एकोपा नाहींसा होऊन त्याचे बारा विभाग झाले, आणि त्यांत बारा मांडलिक राजे राज्य करूं लागले तेव्हां लोकांनीं भविष्य केल्याप्रमाणें त्यांमध्यें लढाया होऊन त्यांपैकीं **सामेटिकस** या नांवाचा राजा यास सर्वांनीं देशाबाहेर काढून दिलें. त्याणें परदेशांत **ग्रीकांची** फौज चाकरीस ठेवून तिचे कुमकेनें क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें ६५० वे वर्षी सर्व देश जिंकून घेतला. आणि त्या फौजेचे उदरपोषणार्थ **मिसर** देशांत कांहीं मुलुख लावून देऊन त्याजकडे आपले खुद्द पाहाऱ्याचें काम सांगितलें. ह्यापूर्वीं परदेशची फौज **मिसर** देशांत कधींही येऊं पावली नव्हती, परंतु हल्लीं जबरदस्तीनें आल्यामुळें सर्व राष्ट्राचे मुळच्या चालींत असें अंतर पडलें कीं, **ब्राह्मण** लोकांचा वरिष्टपणा नाहींसा झाला, व **क्षत्रिय** लोकांची अनास्था होऊं लागल्यामुळें त्यांपैकीं बहुत लोक कंटाळून हब्ष देशास निघून गेले, व राजांचे मनांत जाहाजें तयार करण्याची उमेद उत्पन्न होऊन ते एशिया खंडांतील प्रतापी राजां-

शीं लढाई करण्यास उद्युक्त झाले. आणि ह्याच संधीस **सामेटिकस** याचा अंतकाळ होऊन त्याचा पुत्र **निको** नामें राज्यावर बसला. आणि त्याचे बापाचे हुकुमानें जाहाजें बनूं लागलीं होतीं तीं तयार करवून तो **युफ्रेटिज** नदीपर्यंत मुलुख जिंकित गेला. परंतु **सिर्सेसियम** येथील लढाईंत त्याचा पराभव होऊन त्यास परत यावें लागलें. तो **मिसर** देशास आल्यावर त्याणें एक चर खोदवून त्याचे योगानें **भूमध्यसमुद्र** व **लाल** समुद्र यांचा संगम करावा ह्मणून प्रयत्न केला, परंतु तोहि सिद्धीस गेला नाहीं. अणखी त्याणें खलाशी लोकांची वाहेदारी करून नवीं जाहाजें त्याणें तयार करविलीं होतीं. तीं त्यांजबरोबर देऊन **आफ्रिका** खंडाचे सभोंवतीं फिरवून आणविलीं. असें शूरत्वाचें काम त्यापूर्वी कोणत्याहि राजानें किंवा कोणतेही देशचे लोकांनीं केलें नव्हतें. (तो राजा मृत्यु पावल्यावर त्याचा पुत्र गादीवर बसला, परंतु त्याचे राज्यांत विशेषशी गोष्ट झाली नाहीं.) त्यानंतर **मिसर** देशचे गादीवर **निकोचा** नातू **अफ्रिज** नामें राजा झाला. त्याणें **एशिया** खंडांत कांहीं मुलुख जिंकण्याचा बेत करून समुद्राचे कांठावरील **सिडन** नामें शहर यास वेढा घातला, आणि **टिरिअन** लोक ह्मणजे त्या काळीं ज्या लोकांचा समुद्रांत नौकाकर्मांत सर्वांहून मोठा अधिकार होता, त्यांचाहि पराभव केला. नंतर त्याणें **आफ्रिका** खंडांत **सिरिन** नामक यवन लोकांचा नवा वसविलेला गांव त्याजवर स्वारी केली, परंतु त्याचा पराभव झाला. तेव्हां जो शंभर वर्षांपासून त्यांचे पूर्वजांनीं मुलुख सर करण्याविषयींचा इरादा बाळगिला

होता त्याचा लोकांस त्रास येऊन त्यांणीं **ग्रीक** लोकांचे मदतीनें त्यास पदच्युत करून मारून टाकिलें. त्याजबरोबर **सामेटिकस** राजा याचें राज्य व घराणें नष्ट झालें.

नंतर **अमेसिज** या नांवाचा मनुष्य हलके कुळांतील परंतु असा पराक्रमी होता कीं ज्याणें वर सांगितलेले राज्यक्रांतीची आंतून उभारणी केली होती. त्यास तो राज्याधिकार प्राप्त होऊन त्याणें जे सुधारलेले **ग्रीक** लोक त्या देशांत स्थायीक झाले होते त्यांचे अनुसंधानानें वागून **मिसर** देश ऊर्जितदशेस आणिला. परंतु जशी वीज चमकून लागलीच अदृश्य होते त्याप्रमाणेंच त्याणें हें काम केलें होतें. कारण कीं तो **फारस** देशाचा **साइरस** नामें राजा याशीं युद्ध करीत असतां त्यांत **पारशी** लोक यांचा जय होऊन त्यांणीं त्यास शिक्षा करण्याचा निश्चय केला. परंतु **साइरस** आणि **आमेसिज** हे राजे लवकरच मृत्यु पावले. पुढें **साइरस** याचा पुत्र **कंबाईसिज** हा मोठी लढाऊ फौज बरोबर घेऊन **आमेसिज** याचा पुत्र **सामेटिकस** याशीं युद्ध करण्यास गेला. तो **मिसर** देशांत **पेल्युशियम** नामें एक शहर आहे त्याजवळ पोहोंचल्यावर तेथें **सामेटिकसही** आपल्या फौजेनिशीं आला. आणि उभयतां राष्ट्रांमध्यें एक लढाई झाली तींत **फारशी** लोकांचा जय होऊन त्यांणीं **मिसर** देशांत अम्मल बसवून तो देश आपले बादशाहींत दाखल केला. ही गोष्ट क्रिस्ताचे पूर्वी ५२५ वे वर्षी झाली. याप्रमाणें जगांत सर्वांहून प्राचीन राज्य **मिसर** देशचें होतें तें नष्ट होऊन पुढें सुमारें २०० वर्षेपर्यंत तो देश **फारस** देशचे बादशाहीचा एक सुभा होऊन राहिला.

## फिनिशिया देशाविषयीं.

**फिनिशिया** देश **भूमध्य**समुद्राचे कांठावर आहे. हा देश लहानच परंतु त्यांतील लोकांनीं प्राचीन काळीं व्यापाराचे योगानें मोठा अधिकार मिळविला होता. तो सर्व देश एकाच राजाचे अमलांत होता असें नाहीं; त्यांत कितीएक नगरें होतीं तितकीं निरनिराळीं राज्यें होतीं. तीं अशीं कीं दरएक नगराचा एक एक राजा व एकेक राज्याचे अमलाखालीं कांहीं मुलुख याप्रमाणें होतीं. तथापि ते सर्व राजे एक्याच जुटानें मिळून राहिले होते. त्या सर्वांमध्यें **टायर** शहर हें मोठें नामांकित होतें. त्यांतील राजांची एक मोठी वंशावलि आह्मापाशीं लिहिलेली आहे, परंतु तींत नांवाशिवाय अणखी विशेष कांहीं नाहीं. क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें १००० वर्षें ह्मणजे अकराव्या शतकांत तेथें **हैराम** नामें एक राजा झाला, त्याणें एकदां **यहुदिस्थानचा डेविड** नामें राजा यास कुमक दिली होती, यामुळें त्याची विशेष प्रसिद्धि झाली तें **टायर** शहर क्रिस्ताचे पूर्वीं ५८६ वे वर्षीं **नेब्यूक्याड्नेजर** नामें **बाबिलन** देशाचा राजा याणें लुटून जमीनदोस्त केलें. तेव्हां लोकांनीं दुसरे ठिकाणीं नवें शहर वसविलें.

**फिनिशिया** देशचे लोक **लेवंट** समुद्रांत एकटेच व्यापार करीत होते व **ग्रीक** लोकांचा अधिकार समुद्रांत वाढावयाचे पूर्वीं **भूमध्य**समुद्रामध्यें या लोकांप्रमाणें जाहाजाचें काम कोणीही जाणत नव्हते. **मिसर** देशचे लोकांस **हिंदु** लोकांप्रमाणें जाहाजांचें काम करावयाचा तिरस्कार होता व माहितीही नव्हती, यामुळें ते **फिनिशि-**

या देशचे लोकांस हमेशा आपलीं जाहाजें चालविण्या- करितां चाकरीस ठेवीत असत. **फिनिशिया** देशचे लोकांचा व्यापार त्या काळीं फार दूरपर्यंत चालत होता. जरी बहुत लोक असें ह्मणतात कीं, ते आपले जाहाजांत बसून हिंदुस्थानापर्यंत जात होते, तरी बहुतकरून हेंच खरें आहे कीं, **आरब** लोक हिंदुस्थानचा माल खरेदी करून आपल्या बंदरांत आणून ठेवीत. नंतर **फिनिशि- याचे** लोक त्यांपासून विकत घेऊन **भूमध्यसमुद्राचे** कां- ठावरील देशांतून विकीत असत. त्यांचा आंतील व्या- पार खुषकीनें **पालमाइराचे** रस्त्यानें **एशिया** खंडाचे पश्चिमभागांत अनेक ठिकाणीं फारच चालू होता. ते लोक आपले जाहाजांत बसून **जिब्राल्टर** नामक सामुद्र- धुनींतून केवळ **स्पेन** देशाचे बंदरासच जात असत असें नाहीं. **इंग्रज** लोकांचे देशचे बंदरासही मुख्यत्वेंकरून कथील विकत घेण्याकरितां जात होते. याशिवाय त्यां- चे घरीं जिनस तयार करण्याचे मोठमोठाले कारखाने होते, ते फार प्रसिद्ध होते. त्यांमध्यें विशेषेंकरून तांबडा रंग तयार होत असे त्याची ख्याति फार होती. त्या लोकांनीं **स्पेन** देशांत व **शिसिली** बेटांत व **आफ्रिका** खंडांत नवे गांव वसविले होते, परंतु त्यांपैकीं **कार्थेज** शहर खेरीज करून अणखी कोणताही गांव प्रसिद्धीस आला नाहीं. ह्या **कार्थेज** शहरचे लोकांनीं पुढें कांहीं दिवसांनीं **रूमवाल्यांशीं** बादशाहीसाठीं लढाया केल्या त्यांचा वृत्तांत पुढें सांगूं. **फिनिशियन** लोक **ग्रीक** लोकांसारिखे नव्हते. त्यांचे मनांत कोणांस भागीदार न करितां आपण एकट्यानेंच व्यापार करावा असें होतें.

व जे मुलुख व शहरें त्यांस माहीत होतीं त्यांची खबर दुसऱ्यास कळविणें किंवा इतर देशचे लोकांस व्यापाराचे मसलतींत घेणें हें त्यांस अगदीं आवडत नव्हतें. यामुळें **फिनिशिया** देशचे इतिहासाचें एकही पुस्तक आमचे हातीं आलें नाहीं, व जे वृत्तांत **टायर** शहरांतील व्यापाराचे थोरपणाविषयीं आह्मी लिहिले आहेत, ते इतर देशचे इतिहासापासून आह्मास प्राप्त झाले आहेत.

## यहुदिस्थानाविषयीं.

**यहुदीलोक** क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें १४५० वे वर्षांपासून **केनन** देशांत वस्ती करूं लागले, आणि पुढें ३५० वर्षेंपर्यंत ते साक्षात् ईश्वराचेच हाताखालीं राहून ईश्वरानें जे मनुष्य त्यांचें राज्य चालविण्याकरितां उत्पन्न केले होते त्यांचे अनुसंधानानें वागत गेले. परंतु दरम्यान ते लोक मूर्त्तिपूजक झाले. यामुळें त्यांचे राज्यावर आसपासचे राष्ट्रांनीं वारंवार हल्ले केले. तथापि ईश्वराचे कृपेनें ते त्यांपासून मुक्त होऊन पुनः स्वतंत्रपणाने वागूं लागले. शेवटीं ईश्वराच्या आज्ञेंत राहणें त्यांस नापसंत वाटून आपणही इतर राष्ट्राप्रमाणेंच असावें या हेतूनें त्यांणीं ईश्वरापाशीं एक राजा मागितला, तेव्हां त्या लोकांचा **साम्युअल** नामें त्या काळचा पैगंबर होता त्याणें क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें ११०० वर्षें **साल** या नांवाचे मनुष्यास राज्याभिषेक करून राज्याधिकार त्याचे स्वाधीन केला. परंतु त्याजवर परचक्रें येऊं लागलीं तेव्हां तो शत्रूंशीं युद्धें करूं लागला. शेवटीं एके लढाईंत त्याचा एक

पुत्र खेरीज करून बाकीचे सर्व पुत्रांसह तो नाश पावला. **सालाचें** राज्य होण्याचे पूर्वीं **यहुदीलोक** मुख्यत्वेंकरून शेतभाताचा धंदा करीत होते, यामुळें त्यांपाशीं दवलत नव्हती. सारांश ते इतके गरीब होते कीं राजास राहावयास वाडा नव्हता व देशांत राजधानीही नव्हती. परंतु दिवसानुदिवस त्या लोकांस मातवर होण्याची इच्छा प्राप्त होऊं लागली. **साल** याचे मागून **डेव्हिड** नामें राजा झाला, त्यास ईश्वरानें आपली प्रजा ह्मणजे **यहुदीलोक** यांचें राज्य चालविण्यास निवडून काढिलें होतें. परंतु बारा जातीपैकीं एक जात मात्र त्यास राजा असें मानून त्याच्या अधिकाराखालीं राहिली. बाकीच्या अकरा जाती **साल** याचेच घराण्याचा पक्ष धरून राहिल्या होत्या. त्या पुढें सात वर्षांनीं **साल** याचा पुत्र मृत्यु पावल्यावर **डेव्हिड** याचे स्वाधीन झाल्या. नंतर त्याणें **जेब्युसाइट्स** यापासून **वैतुल मुकद्दस** ह्मणजे **जरूसलेम** जिंकून घेऊन ती आपले राज्याची राजधानी केली, व आपले सर्व शत्रूंस जिंकून **यहुदीलोकांचें** इतकें ऐश्वर्य वाढविलें, कीं तसें पूर्वीं त्यांणीं कधींही संपादिलें नव्हतें, व पुढेंही त्यांस कधीं प्राप्त झालें नाहीं. त्याचे राज्याची हद्द दक्षिणोत्तर **फिनिशिया** देशापासून **लाल** समुद्रापर्यंत व पूर्वपश्चिम **भूमध्य**समुद्रापासून **युफ्रेटीज** नदीपर्यंत, याप्रमाणें होती. याशिवाय त्याणें **इडोमाइट्स** यांस जिंकून **इजिअनजेबर** नामें बंदर व पूर्वेकडील व्यापाराचा माल उतरावयाची **इलात** नामें पेंठ या दोन्ही जाग्यांत आपला अम्मल केला. परंतु तो जन्मभर लढाईंतच गुंतलेला होता यामुळें त्यास त्या जाग्यांचा

उपभोग घेण्यास अगदीं फुरसत मिळाली नाहीं. त्याचे मागून त्याचा पुत्र **सिलेमान** नामें राजा झाला. तो मोठा शांत स्वभावाचा असून इतर लोकांपेक्षां विशेष चतुर व ज्ञानी होता, त्याणें खऱ्या ईश्वराची आराधना करण्याकरितां एक मोठें शोभायमान देऊळ बांधिलें, तसें पूर्वी जगांत कोणीही बांधिलें नव्हतें, व **बैतुल मुकद्दस** शहरांत थोर थोर इमारती बांधून तें इतकें रमणीय केलें कीं त्याबराबर एकही शहर सुंदर नव्हतें. त्याणें **टिरिअन** लोकांचे सर्कतीनें व्यापार करून त्यांजकडून पूर्वदिशेस आपलीं जाहाजें चालविलीं होतीं असें वाटतें. अणखी त्याणें वाळूचे मैदानांत खुषकीचे व्यापाराचा माल उतरण्याकरितां **पालमाइरा** नामें एक शहर बांधून त्यांत अशीं सुंदर कामें केलीं होतीं कीं, तीं जरी सांप्रतकाळीं पडित झालीं आहेत तथापि प्रवासी लोकांस अद्यापि आश्चर्यदायक होतात.

तो राजा आपल्या उतारवयांत विषयासक्त झाला आणि त्याणें स्त्रियांचे सांगण्यावरून खऱ्या ईश्वराची भक्ति सोडून देऊन ईश्वराराधनाविषयीं इतर देशाच्या चाली घेतल्या. आणि स्त्रियांचें आधिपत्य वाढल्यामुळें त्याचे राज्यांतील बंदोबस्त नाहींसा होऊन कामदार लोक रयतेपासून ज्यास्ती कर घेऊं लागले, व तीस दुःख देऊं लागले. तो मृत्यु पावल्यावर त्याच्या गादीवर **रिहोबोएम** नामें राजा झाला. परंतु त्याचे राज्यांत **यहुदी** लोकांचे दौलतीस अपाय आला. तो असा कीं, त्या लोकांच्या बारा जातींपैकीं दाहा जातींनीं त्या राजास कर कमी करण्याविषयीं विनंती केली. ती त्याणें नाकबूल

केल्यावरून ते लोक त्याशीं बदलून पडले, आणि त्यांणीं निराळें राज्य स्थापून **जीरोबोएम** नामें मनुष्यास राज्याधिकार दिला. याप्रमाणें **यहुदी** लोकांचीं दोन निरनिराळीं राज्यें क्रिस्ताचे पूर्वी ९७५ वे वर्षी झालीं. पैकीं दाहा जातींचे राज्यास **इजराइल** यांचें राज्य आणि दोन जातींचे राज्यांस **जुडियाचें** राज्य याप्रमाणें ह्मणूं लागले. पुढें **इजराइल** यांचे राज्यांत दोनशें त्रेपन्न वर्षांत एकुणीस राजे पृथक् पृथक् कुळाचे झाले ते सर्व दुर्गुणी होते असें वाटतें. कारण कीं त्यांपैकीं कोणत्याही राजाचे सद्गुणाविषयीं इतिहासांत वर्णन केलेलें नाहीं. शेवटीं **सालमिनिजर** नामें **असीरिया** देशचा राजा याणें तो मुलुख जिंकून त्यांतील सर्व राहाणारे लोकांस कैद करून एका दूर देशांत नेऊन ठेविलें. तो देश कोणता याविषयीं वहुतांनीं फारच शोध केला, परंतु अद्यापपर्यंत ठिकाण लागला नाहीं. तथापि बहुतकरून हीच खरी कल्पना दिसते कीं त्यांस **आफगानिस्थानांत** ठेविलें होतें.

**जुडियाचें** राज्य त्याचे प्रतिपक्षी राज्यापेक्षां १३४ वर्षें ज्यास्ती ठरलें, व त्यांत वीस राजे झाले. ते सर्व **डेविड** याचेच घराण्यांतील होते. त्यांणीं ३८७ वर्षे राज्य केलें व आसपासचे राज्यांशीं नेहेमीं लढाया चालविल्या होत्या; व जरी वेळेनुसार त्यांचा पराभवही झाला तरी त्यापासून ते सांवरत होते. शेवटीं असें झालें कीं, **एशियाखंडाचे** मध्यभागीं मोठालीं राज्यें उत्पन्न झालीं, त्यांपैकीं **वाबिलनची** वादशाही उत्पन्न होऊन तिचा **नेब्युक्याडनेजर** नामें बादशाहा याणें तें **जुडि**-

**याचें** लहानसें राज्य जिंकून तो आपल्या बादशाहीचा एक सुभा केला.

सदरहू राज्यांचा उदय कसा झाला व त्यांची घालमेल कोणे रितीनें झाली ह्याविषयींचें वर्णन. करितों त्याकडे वाचणाऱ्यांचें लक्ष्य लागेल, परंतु आह्मीं मुळींच सांगून ठेवितों कीं, आतां आह्मास धर्मपुस्तकांचा आधार नाहीं त्यापक्षीं सर्वांनीं असें जाणावें कीं जो इतिहासाचा भाग आह्मी आतां सांगूं त्याप्रमाणें संशययुक्त कोणताही दुसरा भाग नाहीं व दुसरे कोणतेहि भागाबद्दल इतका वादविवाद झाला नाहीं.

## असीरिआ, मिडिया, बाबिलन, आणि फारस यांविषयीं.

इतिहासकर्ते असें वर्णन करितात कीं, **असीरियाचे** राज्याचा पाया फार प्राचीन काळीं पडला होता त्याप्रमाणें आह्मीही पूर्वींच दर्शविलें आहे. तें राज्य क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें २००० वर्षें **माईनस** याणें आपले पराक्रमानें संपादून उदयास आणिलें. तें त्या दिवसांपासून **सार्डेनापेलस** याचे राज्यापर्यंत यथास्थितपणें चाललें होतें. परंतु क्रिस्ताचे पूर्वीं सुमारें ७४२ वर्षें त्या राज्याचो समाप्ति होऊन तें त्याजबराबर नष्ट झालें असें वाटतें. ह्या वृत्तांताविषयीं लोकांमध्यें वादविवाद होऊन जें कांहीं सांगावयास योग्य ठरलें तें सर्व कल्पनेनेंच योजिलेलें आहे, यास्तव आह्मी वाचणारांस त्यांत न गुंतवितां अनुमान करावयाजोगीं जीं सबळ प्रमाणें आहेत, त्यांचे आधारानें सांग-

तों कीं, तेंच **असीरियाचें** राज्य किंवा कोणतेंही एक **असीरियाचें** राज्य **सार्डेनापेलस** राजाचे वेळेस नष्ट झालें; कारण कीं त्या राजानें **एशिया** खंडांतील राजां- प्रमाणें नेहमीं जनानखान्यांत राहून विलास भोगून आयु- ष्याचे दिवस घालविले, व दरबारास त्याचें येणें कदाचि- त् होत असे. त्यास इतिहासांत, "प्राचीन काळचा विलासी राजा" असें ह्मटलेलें आहे: याचा अर्थ त्याचे पंडितानें सांगितला होता कीं, त्याणें खावें प्यावें आणि चैन करावी हा आहे. ज्या राज्याचा धनी असा राजा असतो तें लौकरच कोणी जबरदस्त वजीर किंवा सर- दार याचे हातीं जातें. त्याप्रमाणेंच **असीरियाचे** राज्यांत **मेडिया** देशचा सुभेदार **आर्बेसिस** नामें होता त्यास आपला धनी नादान पाहून त्याचें राज्य बळकाविण्याची इच्छा प्राप्त झाली, तेव्हां त्याणें मोठी हिंमत धरून त्या राज्यांत जे सरदार **सार्डेनापेलस** राजावर जे नाखुष झाले होते त्यांस व विशेषेंकरून **बिलासस** नामें एक होषयार मनुष्य **बाबिलन** देशचा राहाणारा होता, त्यास आपले मसलतींत घेऊन आपले धन्यास पदच्युत करण्याचा निश्चय केला. तेव्हां **सार्डेनापेलस** राजानें आपणास लोकांनीं नामर्द न ह्मणावें ह्मणून अशी मेहनत केली कीं त्यानें वारंवार **आ- र्बेसिस** याचा पराभव केला, परंतु **बिलासस** याणें **बा- बिलन** देशांतून मदतीस फौज आणून त्या राजाचा युक्तीनें रात्रीस पराभव केला. तेव्हां तो राजा तत्काळ तेथून निघून **निनवी** नामक लढाऊ शहरांत आश्रय धरून रा- हिला. त्या शहरासही **आर्बेसिस** याणें वेढा घातला परंतु दोन वर्षेंपर्यंत त्याचें कांहीं चाललें नाहीं. त्या

काळीं लोकांत परंपरागत असें भविष्य होतें कीं, **टाइग्रीस** नदी त्या शहरास शत्रुरूप होई तोंपर्यंत तें कधींही कोणाच्यानें घेववणार नाहीं, व हें भविष्य खरें असें सर्व लोक समजत होते ह्मणून **सार्डेनापेलस** राजा त्याजवर भरंवसा ठेवून दरवाजे बंद करून त्या शहरांत स्वस्थ राहिला होता, परंतु वेढा पडल्यापासून दोन वर्षांनीं **टाइग्रीस** नदीस पूर येऊन त्या शहरचे एका महल्यांत पाणी शिरून त्याचा मजबूद तट थोडासा कोसळून पडला, तेणेंकरून शत्रूंस आंत जावयास रस्ता झाला. जेव्हां **सार्डेनापेलस** राजाची पुरी खातरी झाली कीं आपलें राज्य बुडावयाचा समय येऊन पोहोंचला. तेव्हां त्याणें आपलें सर्व द्रव्य व बायका व खोजे यांस घेऊन राजमाहालाचीं द्वारें बंद करून त्यास आग लावून आंत जाळून घेतलें. त्याबरोबर **असीरियाचें** राज्यही नष्ट झालें.

नंतर **आर्बेसिस** याणें **बिलासस** यास **बाबिलनचा** सुभा देऊन **मेडिया** देश व त्याचे आसपासचे सुभे आपण घेतले. ह्या काळापर्यंतचा इतिहास ठीकच आहे, परंतु यापुढें त्यांत घालमेल झालेली आहे. धर्मपुस्तकांत असें लिहिलें आहे कीं, सुमारें ह्याचवेळेस **फल** नामें **असीरिया** देशचा राजा यानें **यहुदीस्थानावर** चढाई केली. याविषयीं कांहीं ग्रंथकार असें ठरवितात कीं, **सार्डेनापेलस** याचें राज्य नष्ट झाल्यावर त्यापासून **बाबिलन**, **मिडिया**, आणि **असीरिया**, अशीं तीन राज्यें उत्पन्न झालीं; व दुसरे ग्रंथकार असें ठरवितात कीं, **टाइग्रीज** व **युफ्रेटीज** या नद्यांचे आसपासचे मुलुखांचें साधारण नांव **असीरिया** असें होतें, व **फल** हें **बिलासस** राजाचेंच दुसरें

नांव होतें. सदरहू वादाचा निवाडा करावयास आह्मा-पाशीं मुळचा प्रमाणलेख नाहीं व ह्या वादांत कांहीं फायदा आहे असेंही नाहीं. जरी **असीरियाचें** निराळें राज्य उत्पन्न झालें असलें तरी तें आठ वर्षांपेक्षां ज्यास्ती ठरलें नाहीं. जें नवें राज्य **बाबिलन** देशांत उत्पन्न झालें होतें तें त्या काळीं सार्वभौमपणा पावलें होतें. कारण कीं **नेब्युक्याड्नेजर** याणें बहुत दूरपर्यंत मुलुख जिंकून कांहीं काळपर्यंत **एशिया** खंडाचे पश्चिम भागांत **बाबिलनचें** राज्य सर्व राज्यांमध्यें मुख्य केलें होतें यामुळें त्यास धर्मपुस्तकांत "**कुबेर**" अशी संज्ञा लिहिलेली आहे. त्याणें जुडियाचें राज्य सर करून क्रिस्ताचे पूर्वी ५८६ वर्षे **टायर** शहर जें त्या काळीं एक मोठें व्यापाराचें स्थान, त्यांत अम्मल करून, नंतर **मिसर** देशही हस्तगत केला. तेव्हां त्यास गर्व प्राप्त होऊन त्याणें सोन्याची एक मूर्त्ति साठ हात उंचीची **डुरा** नामक मैदानांत उभी करविली, तिची आराधना आपले प्रजांकडून करवूं लागला. पुढें तो मृत्यु पावल्यावर त्याचे वारसास **बाबिलनची** बादशाही व द्रव्याचा मोठा भांडारखाना प्राप्त होऊन तो **एशियाखं-डांतील** राजांप्रमाणें विलास भोगूं लागला. तेव्हां त्याचे शेजारचे जबरदस्त राजांनीं त्याजवर चढून येऊन त्याचा पराभव केला.

**नेब्युक्याड्नेजर** याचे घराण्यांतील राज्यास उतरता पाया लागला त्या वेळेस ईश्वरानें **फारस** देश ह्मणजे योद्ध्यांची खाण असा जो पाहाडी मुलुख, याचे मध्यभागीं **साइरस** नामें एक प्रतापी पुरुष उत्पन्न केला, त्यानें **एशियाखंडाचे** पश्चिमभागांतील मोडकळीस आलेलीं

राज्यें नष्ट करून त्यांपासून आपलें एक सार्वभौम राज्य स्थापिलें तसें राज्य जगांत पूर्वी कधींही झालें नसेल. तो **साइरस** स्वदेशाचे डोंगरांत जन्मापासून कष्ट करूनच राहिला होता, परंतु ईश्वरानें त्यास उत्तम गुण व सर्व राजलक्षणें दिलीं होतीं त्यामुळें तो मोठा प्रतापी झाला, व **मिडिया** देशाचे राज्यावर त्याचा वारसा पोहोंचत होता, त्यामुळें त्यास तें राज्य प्राप्त झालें. त्या वेळेस **एशियाखं**डाचे पश्चिमभागांतील राजे हतवीर्य झाल्यामुळें त्यांचा मुलुख उमेदवार राजाकरितां तयारच होता, यास्तव **साइरस** याणें प्रथम **मिडिया** देशांत आपला अधिकार स्थापून नंतर **असीरियाचे** राज्यावर चढाई केली, परंतु तो मुलुख जिंकण्याचे पूर्वी त्यास एक शत्रु **लिडिया** देशचा **क्रीसस** नामें राजा उत्पन्न झाला होता त्याचें राज्य **ट्राय** देशचे पूर्वेस होतें त्या देशाचा प्राचीन इतिहास निर्मूळ आहे. तो राजा **साइरस** राजाचे उदयाच्या पूर्वी वंशपरंपरेचे हक्कानें **लिडिया** देशचा राजा झाला होता त्याणें एक आपली मोठी बादशाहत स्थापण्याचा इरादा करून प्रथम **एशियामैनर** देशांतील **ग्रीक** लोकांचीं नवीं वसविलेलीं शहरें जिंकून मग पश्चिमेस **हालिस** नामक नदीपर्यंत मुलुख काबीज केला होता. त्याचे राज्यांतील राहाणारे लोक मोठे मेहनती होते, व त्याचे बरोबरीचा त्या काळीं कोणताही राजा धनाढ्य नव्हता, परंतु धनापेक्षां त्यास विद्येचा मोठा अभिमान होता. यामुळें त्याचे सभेंत **ग्रीस** देशचे मोठमोठाले बुद्धिमान व विद्वान पंडित लोक वसत होते व तो राजा त्यांस एक उदार पोशिंदा व चैनी सोबती सांपडला होता. याशिवाय तो **डेल्फी**

नामक देवस्थानचे पुजाऱ्यास इतकें द्रव्य देत असे कीं, त्याचा कांहीं सुमार नसे. कारण कीं त्याणें जो **ग्रीक** लोकांचा स्वतंत्रपणा नष्ट करण्याचा इरादा केला होता तो त्या पुजाऱ्यांचेच सामर्थ्यानें पूर्ण होईल असा त्यास भरंवसा होता. परंतु **साइरस** याचा प्रताप फारच लौकर वाढूं लागला, यामुळें त्या राजास आपलेंच संरक्षण करण्याची चिंता प्राप्त होऊन, त्याणें **साइरस** राजास जबरदस्त होऊं देऊं नये या हेतूनें, **असीरिया** देशचे राजास कुमक दिली. हें समजून **साइरस** राजा तात्काल त्याशीं लढाई करण्याचा संकेत करून लढाऊ फौज घेऊन **लिडिया** देशावर चढून गेला. तेव्हां तेथें एक लढाई होऊन **साइरस** याचा जय झाला. नंतर त्याणें तें राज्य अगदीं नष्ट करून संपूर्ण **एशियामैनर** देश आपले राज्यांत मिळविला. नंतर थोरले **बाबिलन** शहरावर चढून त्यास वेढा घातला परंतु तें शहर हस्तगत करावयास त्यास फारच आयास पडले. तथापि त्याणें तें शहर युक्तीनें घेऊन **बाबिलन**चें राज्य अगदीं नाहींसें करून टाकिलें. याप्रमाणें त्याणें आपले पराक्रमानें एक विस्तीर्ण राज्य संपादून त्यांत आपला पुर्तेपणें अम्मल बसवून त्याची दुरुस्ती करण्याचा निश्चय केला. तो राजा जितका युद्धाचे कामांत शूर होता, तितका राजकीय कामांत चतुर होता, व त्याचे मनांत आपले प्रजेस सुख होण्याविषयीं मोठी फिकिर राहात होती, ह्मणून जे लोक त्याचे हाताखालीं नुकतेच आले होते त्यांस आपला हतवीर्य राजा जाऊन आपणांस शाहाणा व शूर राजा प्राप्त झाला ह्मणून मोठा आनंद झाला होता. त्या राजानें कांहीं दिवस राज्य करून क्रिस्ताचे पूर्वीं ५३० वे वर्षीं देह सोडला.

प्राचीन काळीं **असीरिया** व **बाबिलन** ह्या दोन्ही बादशाह्या आणि **मिडिया पालेस्टाइन्** आणि **फिनिशिया** हीं तिन्हीं राज्यें अशीं फारच प्रसिद्ध होतीं, तीं **फारस** देशचे सार्वभौम राज्यांत मिळालीं. ह्याविषयीं ह्या काळचे इतिहासांत वर्णन केलेंच आहे. त्या **फारस** देशचे राज्याचा पुढील इतिहास तिसरे काळांत सांगूं.

## कार्थेज शहराविषयीं.

प्राचीन काळीं **कार्थेज** शहरचे एक मोठें लोकसत्तात्मक राज्य होतें, व तेथील लोक सौदागिरी करून लढायाही करीत होते. दुर्दैवयोगेंकरून त्या लोकांचा इतिहास आह्मास कोठें मिळाला नाहीं, ह्मणून **रोमन** लोक जे त्याचे जानदुषमन् त्यांणीं लिहिलेल्या वृत्तांतावर भरंवसा ठेवणें प्राप्त आहे. ह्या शहराचा पाया क्रिस्ताचे पूर्वीं ८०० वर्षें **टायर** शहरांतून कोणी लोक **आफ्रिका**-खंडास जात होते त्यांणीं घातला. त्याचा वृत्तांत पुढें लिहितों, **टायर** शहरचे लोकांत आपसामध्यें कांहीं बखेडे झाल्यामुळें ते लोक तेथून काढून दिले होते ते **आफ्रिका**खंडाचे हद्दीवर येऊन त्यांणीं तेथें एक चांगली जागा पाहून त्या ठिकाणीं वसाहत केली. ती जागा असें थोर शहर वसवावयास इतकी योग्य होती कीं, तीस ऊर्जितदशेस आणणें हें केवळ त्यांतील राहाणारे लोकांचे उद्योगाचेच स्वाधीन होतें. जरी ह्या लोकांचा उत्कर्ष सावकाशीनें झाला तथापि चांगला झाला. ते नौकासाधनानें व्यापार करून **आफ्रिका** खंडांत आपलें आधिपत्य दिवसानुदिवस वाढवूं लागले, व त्यांणीं त्या खंडा-

चे उत्तर किनाऱ्यावरील देश बहुतकरून जिंकून आसपास-चीं बेटेंही आपले ताब्यांत आणिलीं. याशिवाय जीं दुसरीं बेटें त्यांणीं घेतलीं होतीं त्यांत **सारडिनिया** हेंही बेट हस्तगत केलें होतें. बहुतकरून हेंही खरें आहे कीं, त्यांणीं **जिब्राल्टर** नामें आखाताचे पार जाऊन **कनेरी** व **मेडेरा** हीं बेटें घेतलीं आणि आपला व्यापार इंग्रेज लोकांचे विलायतेपर्यंत चालू केला. त्यांणीं **स्पेन** देशांतही कांहीं वसाहत करून शहरें बांधिलीं होतीं त्यांपैकीं अद्यापपर्यंत एक शहर कायम आहे. त्याचें मूळचें नांव **कार्थेजिना**, हेंही चाललें आहे.

**कार्थेचे** लोकसत्तात्मक राज्याचा प्रसार मुख्यत्वेंकरून **मागो** या नांवाचा एक मनुष्य होता त्याचेच कुळाचे प्रतापानें वाढला. ज्या काळीं **साइरस** राजापुढील त्याचा राजवंश **फारस** देशचे बादशाहीचा पाया घालीत होता, त्याच वेळेचे सुमारें **मागोनें** आपले दोन पुत्र व साहा नातू यांस कुमकेस घेऊन **कार्थेचें** राज्य **सिसिली** व **सार्डिनिया** ह्या बेटांत व **आफ्रिका**खंडांत प्रजाप्रभुत्व स्थापिलें, व सुमारें त्याच वेळेस त्या शहरचे लोकांनीं **रोमन** लोकांशीं प्रथमतः व्यापारसंबंधीं ठराव केला. यावरून असें दिसतें कीं, ते लोक संपूर्ण **सार्डिनिया** बेट, व **आफ्रिका**खंड आणि **सिसिली**बेटाचा एक भाग यांचे मालिक होते. सदरहू मुलखांचे बंदोबस्ताकरितां त्यास एक मोठा जाहाजाचा समुदाय व फौज अशी ठेवावी लागे, ती, ते लोक **यूरप** व **आफ्रिका** या खंडांतून उमेदवार आणून भरती करीत असत. आणि त्या लढाऊ जाहाजांचें काम करावयास सरकारी

गुलाम यांचा मोठा समुदाय राहात होता. त्या वेळेस गुलाम हें राजाचें मोठें धन असें. यामुळें दुसरे काळाचे अंतीं ह्मणजे सुमारें ५०० वर्षें क्रिस्ताचे पूर्वीं त्या लोकांचा **भूमध्य**समुद्रांत इतका अधिकार वाढला होता कीं त्यांजवरावर त्यांची जन्मभूमिका ह्मणजे **टायर** शहर यांतील राहाणारे लोकांचाही नव्हता.

## रूमशहराविषयीं.

ह्या शहरचा पाया क्रिस्ताचे पूर्वीं ७५४ वे वर्षी पडला आणि त्याची वस्तीही फार लौकर वाढूं लागली. त्यांत २४५ वर्षेंपर्यंत राजानींच राज्य केलें. नंतर राज्याधिकार लोकांचे स्वाधीन झाला. पुढें त्याचा लौकरच उत्कर्ष होऊन ज्या राज्यांचा इतिहास आह्मी वर सांगितला आहे तीं सर्व त्यांत मिळून त्याची इतकी मोठी बादशाही झाली कीं जगांत तशी दुसरी कोणतीही नव्हती. यास्तव त्या राज्याची मुळची उत्पत्ति व उत्कर्ष यांचा सविस्तर वृत्तांत आह्मी इतिहासाचे पुढील काळांत सांगूं.

## सिसिली बेटाविषयीं.

सुमारें ह्याच काळांत **ग्रीक** लोकांनी **सिसिली** बेटांत मोठमोठाल्या वसाहती केल्या. त्या कोणी मुख्य सरदारानें केल्या असें नाहीं, परंतु त्या देशांतील संपूर्ण सौदागर लोकांनीं व कांहीं **एशियामैनर** देशांतील लोकांनीं केल्या होत्या. याचें कारण हेंच आहे कीं,

त्या देशांत वस्ती वाढून दाटी होऊं लागली तेंव्हां सौदागर लोकांनीं ज्यास्ती लोकांस बरोबर आपले गुमस्ते देऊन त्या फलदायक बेटांत समुद्राचे कांठीं नवी वसाहत करावयास पाठविलें. त्या सर्वांपैकीं **कारिंथ** देशचे लोकांनीं **साइरेक्यूज** नामें शहर वसविलें होतें तें सर्वांहून जबरदस्त झालें. **साइरस** राजाचे वेळेस **सिसिली** बेटांत समुद्राचे कांठीं संपूर्ण **ग्रीक** लोकांनींच वसविलेले गांव होते त्यांपैकीं बहुतेक गांव त्या लोकांचे स्वदेशीय राजांचे नांवाखालीं मोडत होते.

याशिवाय **ग्रीक** लोकांनीं **स्पेन** देशांत समुद्राचे कांठावर **सागन्टम** येथें एक गांव वसविला होता. व तेथें जवळच **कार्थेज** शहरचे लोकांनीं दुसरा एक गांव वसविला होता. त्या देशांत सोन्याच्या खाणी होत्या त्यांपासून त्यांस मोठा द्रव्यलाभ होत असे.

---

# भाग ५.

## क्रिस्ताचे पूर्वी ५६० वर्षांपासून ३३० वर्षेंपर्यंत ह्मणजे दोनशें तीस वर्षांचा वृत्तांत.

### काळ ३.

साइरस राजापासून शिकंदर बादशाहापर्यंत फारस देशचें राज्य—साइरस—कंबाइसीज—डेरायस—ग्रिकलोकांचीं लोकसत्तात्मक राज्यें—हपीयस व हिपार्कस—सार्डिस शहरचें दहन—ग्रीस देशावरील पारशी लोकांची स्वारी—मारेथन नामें जाग्यांतील लढाई—जरकशीज बादशाहाची स्वारी—थरमापिली नामें घाटी—साइलिमिस—प्लाटिया—ग्रीस देशाची सुधारणा—पेरिकल्स—पिलोपोनिजस देशची लढाई—आलशीबाइडिज—सिसिली बेटावरील लोकांची स्वारी—इगासपोटेमस जाग्यांतील लढाई—आथेन्स शहर शत्रूनीं लुटलें—धाकटा साईरस—एजिसिलेअस—आनटालसिडास याचा तहनामा—थीब्स—इपामी नानदास—आणि पिलोपिदास—मेनूटिनियाचें मैदान—ग्रीस देशांतील लोकसत्तात्मक राज्यें नष्ट होण्याचा समय—फिलिप नामें मासिडोनिया देशचा राजा—या सर्वांविषयींचा वृत्तांत या भागांत लिहिलें.

मागील भागाचे अंतीं आह्मीं असें वर्णिलें आहे कीं, **फारस** देशांत **साइरस** या नांवाचे प्रतापी पुरूषानें आपल्या पराक्रमानें एक मोठी बादशाही स्थापून तींत एशियाखंडाचे पश्चिमभागांतील प्राचीन बादशाह्या, ह्मणजे ज्यांस **अशिरियन**, **बाबिलोनियन** आणि **मिडियन**, अशीं नांवें आहेत, त्या, व **प्यालेस्टाइन** व **एशियामैनर** ह्या देशचीं राज्यें, याप्रमाणें मिळविलीं. आतां ज्या काळाचें आह्मी वर्णन करणार त्यांत मुख्यत्वें **फारस** देशचे राज्याशीं **ग्रीस** देशांतील लोकसत्तात्मक राज्यें यांणीं युद्ध केलें, ह्याविषयींच सर्व गोष्टी आहेत. **ग्रीस**

देशचे उत्तरेकडील **मासिडोन** देशाचा **शिकंदर** नामें राजा हा **साइरस** राजाप्रमाणेंच शाहाणा व शूर होता. त्याणें **ग्रीक** लोकांचे मदतीनें **फारस** देशची बादशाही जिंकून तें युद्ध समाप्त केलें, व ह्याच्च काळांत मुळीं **रोमन** लोकांच्या इतर राज्यांशीं व राष्ट्रांशीं लढाया झाल्या. आणि शेवटीं त्याचें राज्य सार्वभौम झालें. याविषयींचा निराळा इतिहास आह्मी पुढील दोन्ही काळांत लिहूं.

याप्रमाणें वर सांगितलेले राज्यांचा स्वतंत्रपणा नष्ट होऊन तीं दिवसानुदिवस मागें पडून त्याचे उदयकाळीं जे देश कोणास माहीत नव्हते व ज्यांतील राहाणारे लोक अज्ञान अवस्थेंत होते त्यांचा उत्कर्ष होऊन ते लोक नवें राज्य संपादण्याविषयीं प्रयत्न करूं लागले.

**साइरस** याणें आपल्या चातुर्यानें आपल्या देशचे कठोर लोक ह्मणजे **पारशी**, यांचे कुमकेनें अशी मोठी बादशाही स्थापित केली कीं तिच्या मर्यादा पूर्वेस **अटकनदी,** व पश्चिमेस **ग्रीस** देशाचा समुद्र, व दक्षिणेस **फारस** देशचें आखात, व उत्तरेस **सिथिया** देशचे डोंगर एथपर्यंत पोहोंचल्या. पुढें त्याणें नवा मुलुख सर करण्याची इच्छा सोडून देऊन आपले बाकीचे आयुष्याचे दिवस आपले बादशाहींतील बखेडे मोडून त्यांचा बंदोबस्त करून जे कोट्यावधी लोक त्याचेच आश्रयाची आशा करून होते त्यांस चांगले रीतीचे कायदे देऊन हुशार करण्याकडे लावावे असा निश्चय केला. परंतु त्याचें वृद्धापकाळांत फारस देशचे उत्तरेस जे बखेडेखोर **सिथियाचे** लोक राहात होते त्यांणीं त्याचे मुलखावर हल्ला केला ह्म-

णून त्यास पुन्हां युद्ध करणें भाग पडलें. परंतु **टिसिअ-सा**प्रमाणें युद्धांत त्याचा पराभव होऊन तो प्राणास मुकला. त्याचे मागून त्याचा पुत्र **कम्बाइसिज** नामें बादशाहा झाला त्याचे सत्तेंत शंभर देश होते तरी त्याची तृप्तता न होऊन त्याणें **मिसर** देश आपले राज्यांत मिळविण्याचा निश्चय केला. आणि पहिल्याच वर्षी पुष्कळ फौज बरोबर घेऊन त्या देशावर स्वारी केली. आणि **पेल्युसिअम** नामक शहरापाशीं त्या देशाचा राजा **फरोज** याशीं लढाई करून त्याचा पराभव करून त्या राजाचे राज्य नष्ट केलें. आणि **मिसर** देश आपले राज्याचा एक सुभा केला. ही गोष्ट क्रिस्ताचे पूर्वी ५२५ वे वर्षी झाली. पुढें त्याणें **आफ्रिका** खंडांतील वाळूचे मैदानांत शिरून **अमोनियम** नामें मोठें सौदागरीचें शहर होतें तें जिंकण्याविषयीं प्रयत्न केला, परंतु त्यांत त्यास यश आलें नाहीं. याशिवाय त्याणें दुसरा बेत **कार्थेज** शहर घेण्याविषयीं केला होता, परंतु त्याचे जाहाजांवर **फिनिशिया** देशचे खलाशी लोक होते त्यांणीं स्वदेशिय लोकांचें वसविलेलें शहर नष्ट करण्यास मदत करणें नाकबूल केलें. सबब तो बेत सिद्धीस गेला नाहीं. इतक्यांत मागें **फारस** देशांत असा बखेडा झाला कीं **मेगी** लोकांनीं **मिडिया** देशचा मनुष्य **फारस** देशचे तखतावर बसविण्याविषयीं मसलत करून **स्मरडिस** नामें एक मनुष्य तोतया उभा केला आणि हा **कंबाइसिज** याचा वडील भाऊ आहे असें मिष करून तो गादीवर बसविला. या संकटामुळें **कंबाइसीस** याणें साडेसात वर्षे राज्य भोगून

शेवटीं प्राणत्याग केला. नंतर त्या तोतया राजानें गादी बळकावून आठ महिने राज्य केलें.

परंतु **पारशी** लोकांस हा परदेशांतील मनुष्य स्वदेशाचा राजा झाला याचें सहन न होऊन सात बडे लोकांनीं कट करून त्यास मारून टाकिलें. नंतर नवा राजा गादीवर बसविण्याविषयीं त्यांणीं आपसांत वादविवाद करून **डेरायस** नामें मनुष्यास राज्याभिषेक केला. त्याणें **साइरस** राजाची **अतोहा** नामें कन्या होती तिशीं लग्न करून आपला अधिकार दृढ केला. ह्या राजाचें राज्य ३६ वर्षें ठरलें. त्या अवकाशांत त्याणें आपले राज्याची हद्द फारच वाढवून मुलखांत नवे नवे उपयोगी कायदे चालू करून त्यांची सुधारणा केली, व सरकारी पैसा खर्च करून कचेऱ्यांकरितां नवीं शहरें बांधिलीं.

**साइरस** राजानें **एशिया** खंडांतील मुलुख काबीज केला होता, व **कंबाईसिज** याणें **मिसर** देश, जिंकिला होता. तसा **डेरायस्** याणें **युरोप** खंडांतील **फिरंगान** यांत जाऊन **थ्रेस** व **मासिडोन** हे मुलुख सर केले. हे देश सांप्रत काळीं **तुर्कस्थानाचे** सुभे आहेत. इतक्यांत **बाबिलन** शहरांत दंगा झाला, परंतु **पारशी** लोकांनीं त्या शहरास एकवीस महिने वेढा घालून तो अगदीं मोडून टाकिला. परंतु इतकेच लढाईनें **डेरायस** राजाची तृप्तता न होऊन त्याणें **सिथिया** देशचे फिरस्ते व अजिंक लोक यांशीं लढाई चालविली, परंतु आपले सासऱ्याप्रमाणें पराभव पावून त्यास परत यावें लागलें.

इकडे पूर्व दिशेस त्याचा जय झाला होता, तो असा कीं, एक **ग्रीस** देशचा राहाणारा मनुष्य त्यापाशीं चाक-

रीस होता त्यानें **अटकनदींतून** जाहजें चालवून त्या नदीचे उत्तरेकडील पाहाडी मुलुख जिंकून आपले मालकाचे राज्यास मिळविला. सुमारें ह्याच वेळेस त्याचे एका सेनापतीनें **आफ्रिका** खंडांत **वार्का** नामक शहरावर हल्ला करून त्याची धुळधाण केली.

याप्रमाणें **डेरायस** राजाचा **डान्युब** व **अटक** ह्या दोनी नद्यांवर व **आफ्रिका** खंडांत याप्रमाणें जय झाला होता. तों इतक्यांत त्यांस **ग्रीस** देशचें एक लाहानसे राष्ट्र, ह्मणजे ज्याचा मुलुख **फारस** देशचे पंधरावे हिशाबरोबरही नव्हता, त्यांशीं लढाई करणें प्राप्त झालें. सर्वांचे मनांत असें होतें कीं, **पारशी** लोक एकेच हल्ल्यांत **मिसर** देशाप्रमाणें **ग्रीस** देशही सर करून आपले राज्याचा सुभा करितील. परंतु त्या देशांतील राहाणाऱ्यांस राष्ट्राचा स्वतंत्रपणा राखण्याविषयीं मोठी आस्था होती. यामुळें त्यांचे मनांत युद्धाची धमक उत्पन्न होऊन त्यांणीं पारशी लोकांचा बहुत वेळ पराभव केला.

आह्मी पूर्वी सांगितलेंच आहे कीं **एशियामैनर** देशांतील **ग्रीक** लोकांचा वसविलेला मुलुख, ज्यांत मुख्यत्वेंकरून विद्या व शाळा यांचा प्रकाश पडत होता, तो **पारशी** लोकांनीं घेतला. याशिवाय **ग्रीस** देशचे उत्तरहद्दीवरील दोन मुलुख, ज्यांस **थ्रेस** व **मासिडोन** असें ह्मणतात तेही **पारशी** लोकांचे स्वाधीन होते. याप्रमाणें जेव्हां **फारस** देशचे राजानें त्या काळीं जगांत जे जे प्रसिद्ध व उत्तम मुलुख होते, ते सर्व जिंकून आपले बादशाहींत मिळविले. तेव्हां **स्वतंत्र ग्रीक** लोकांस असें वाटलें कीं, आपण आतां **फारस**वाल्यांच्या अमलानें चोहोंकडून

घेरलें गेलों; तथापि त्यांणीं असा निश्चय केला कीं, आपला स्वतंत्रपणा लढाई केल्याशिवाय नष्ट होऊं देऊं नये. इकडे **एशियामैनर** देशांतील राहाणारे **ग्रीक** लोक हे-ही **पारशी** लोकांचे हातून सुटण्यास फार उतावळे झाले होते. शेवटीं त्यांपैकीं **मिलेटस** नामें सर्वांहून जोरावर जें शहर तेथील **अरिष्टागोरस** सरदार यानें **फारस** देशचे सुभेदाराचा हुकूम मोडून त्याशीं बदलून त्यावर **ग्रीक** लोकांचा जूट उभा करण्याचा विचार केला; जेव्हां त्याचा तो यत्न सिद्धीस गेला तेव्हां त्या प्रांतांतील सर्व शहरचे लोकांनीं **पारशी** लोकांची मालकी नाकबूल करून लोकसत्तात्मक राज्य स्थापिलें आणि आपणच राज्याची वहिवाट करूं लागले. पुढें त्याप्रमाणेंच त्यांचे जातभाई ह्मणजे **खास ग्रीस** देशचे लोक यांचे मनांतही **फारस** देशचे राजाशीं लढाई करण्याविषयीं हिम्मत उत्पन्न करावी असा हेतू धरून त्यांणीं **अरिष्टागोरस** यांस **ग्रीस** देशास पाठविलें. तेथें **लासीडीमन** देशांत त्याची यद्दा झाली, परंतु **आथेन्स** शहरांत असा योग घडून आला कीं, तो त्याचे कामास हितकारक झाला. **हापियस** नामें **पिजिस्ट्रेटस** याचा पुत्र यास लोकांनीं त्याचे जन्मभूमिकेंतून काढून दिलें होतें ह्मणून तो आपला अधिकार पुनः संपादावा ह्मणून **एशियामैनर** देशांतील **पारशी** लोकांचे सुभेदाराजवळ कुमक मागावयास गेला होता. त्याचा अर्ज नाकबूल करावा ह्मणून **आथेनस** शहरचे लोकांनीं त्या सुभेदाराकडे वकील पाठविले होते, परंतु सुभेदारानें त्यास खासच जबाब दिला कीं जर **आथेनस** शहरचे लोकांस सुरक्षित राहाण्याची इच्छा असेल

तर त्यांणीं **हापियस** यास पुनः राज्याधिकार द्यावा. हा जबाब घेऊन वकील लोक निघाले ते, ज्या वेळेस **अरिष्टागोरस** हा **पारशी** लोकांशीं लढाई करण्याकरितां **एशियामैनर** देशांतील **ग्रीक** लोकांचे तर्फेनें कुमक मागत होता त्याच वेळेस पोहोंचले. तो जबाव पाहातांच **आथेन्स** शहरचे अधिकाऱ्याचे मनांत **पारशी** लोकांविषयीं फारच संताप प्राप्त होऊन त्यांणीं **अरिष्टागोरस** याचा अर्ज कबूल केला. आणि तात्काळ जाहाजांचा समुदाय तयार करून त्याजवर फौज बसवून **एशियामैनर** देशास पाठविली. तीं जाहाजें नेमलेले जाग्यांत पोहोंचल्यावर शिपाई लोकांनीं जमीनीवर उतरून तसेच **सार्डिस** शहरास जाऊन त्यास आग लाऊन दिली. तें शहर त्या देशाची राजधानी होतें. हें पाहून **पारशी** लोक आपली फौज जमा करून त्यास शिक्षा करण्यास आले, परंतु इतक्यांत ते लोक पळून गेले. तथापि **पारशी** लोकांनीं त्यांस समुद्राचे कांठीं गांठून त्यांचा अगदीं पराभव केला. ह्या निःकारणी लढाईनें **ग्रीक** आणि **पारशी** या उभयतांचे मनांत परस्परें द्वेष उत्पन्न होऊन त्यांमध्यें लढाई होऊं लागली, ती फार दिवसपर्यंत चालली होती.

**डेरायस** राजा ह्या तंट्यापासून मोकळा झाल्यावर **एशियामैनर** देशांतील **ग्रीक** लोक त्यांशीं बदलले होते त्यांस शिक्षा करून त्या देशांत आपला अम्मल पुनः बसवावा ह्मणून प्रयत्न करूं लागला. परंतु **ग्रीक** लोकांस असें माहीत होतें कीं, **पारशी** लोक जमीनीवरील लढाईंत आपल्यापेक्षां जबरदस्त आहेत, त्यापक्षीं आपलें जमी-

नीवर कांहीं चालणार नाहीं, ह्मणून त्यांणीं पाण्यांतच लढाई चालविली. यामुळें तो मुलूख हस्तगत करण्यास **पारशी** लोकांस फारच प्रयत्न करावा लागला. साहा वर्षे लढाई चालली तथापि **ग्रीक** लोकांचा जाहांजाचा समुदाय कमी झाला नाहीं, व **मिलेटस** शहर हेंहीं त्या वेळेपर्यंत **पारशी** लोकांचे हातीं लागलें नाहीं. शेवटीं **पारशी** लोकांचे सेनापतींनीं आपले ताब्यांतील समुद्राचे कांठावरील राजे यांपासून जाहाजांचा समुदाय जमा केला, परंतु त्यांत **पारशी** जातीचा नाविक मनुष्य एकही नव्हता, ह्मणून त्यांस यशःप्राप्तीविषयीं अगदीं भरंवसा नव्हता. तथापि पाण्यांतील एक मोठे लढाईमध्यें त्यांचा जय होऊन त्यापासून असें हासिल उत्पन्न झालें कीं, एशिया खंडांतील संपूर्ण **ग्रीक** व त्यांचीं सर्व बेटें अशीं **पारशी** लोकांचे कबज्यांत आलीं. आतां फक्त **आथेन्स** शहरचे लोकांस **सारडिस** शहर जाळल्याबद्दल शिक्षा करणें राहिलें; याकरितां **डरायस** राजानें बहुत फौज जमा करून त्या फौजेचा अधिकार आपला जावई **मार्डोनस** यास दिला. त्याणें **हेलिस्पांट** नामें खाडी उतरून **ग्रीक** लोकांपाशीं (आधीनतेचें चिन्ह) पाणी आणि माती मागायास वकील पाठविले. तेव्हां जे मांडलिक व भित्रे राजे होते त्यांणीं ती गोष्ट मान्य केली. परंतु **स्पार्टा** देशचे व **आथेन्स** शहरचे लोक यांणीं केवळ ती गोष्ट नाकबूल केली इतकेंच नाहीं. परंतु वकील लोकांचाही धिकार केला. तेव्हां **पारशी** लोकांची फौज उत्तरेकडील **थ्रेसचे** व **मासिडोन** देशचे घाटांनीं **ग्रीस** देशांत उतरूं लागली, परंतु त्या मो-

हिमेंत प्रथमवर्षी **पारशी** लोकांस अगदींच यश आलें नाहीं. कारण कीं त्या फौजेचा **थ्रेस** देशचे पाहाडी लोकांनीं अकस्मात् पराभव केला, व इकडे जाहाजांचे समुदायाचीही तुफानानें दाणादाण केली. ही गोष्ट **क्रिस्ताचे** पूर्वी ४९३ वे वर्षी झाली. दुसरे वर्षी **डेरायस** राजानें त्या सरदारास फौजेचा अधिकार न देतां त्या कामावर दुसरे दोन हुशार सरदार नेमून त्यांस अणखी दुसरी फौज देऊन पाठविलें. त्या सरदारांस मसलत सांगणारा **हिपियस** होता, यास्तव त्यांणीं उत्तरेकडील डोंगरांतील रस्ता अदले वर्षी **पारशी** लोकांस वद्धक झाला होता तो सोडून देऊन कर देणारे **ग्रीक** लोक व दुसरे मांडलिक राजे यांपासून **सिलिसिया** देशांत जाहाजें जमा करून त्यांत ती फौज बसवून एकदम **ग्रीस** देशाचे मध्यभागीं नेऊन **अटिका** शहरचे मैदानांत उतरली. त्या फौजेशीं युद्ध करावयास **ग्रीक** लोकांकडून कांहींच तयारी झाली नव्हती व राष्ट्राचे संरक्षणार्थ सर्व लोकांचा जमावही झाला नव्हता ह्मणून **आथेन्सचे** ताब्यांतील लाहानसा मुलूख जो **हिंदुस्थानांतील वर्धवानचे** मुलखाच्याही बराबरीचा नव्हता तो निराश्रित होऊन लढाईचा उपद्रव सोसण्यास सिद्ध झाला. त्या संधीस **आथेन्स** शहरचे लोकांनीं **स्पार्टन** लोकांपाशीं कुमक मागितली. परंतु चंद्रमा पूर्ण व्हावयास ह्मणजे पूर्णिमेस पांच दिवस कमी होते यामुळें **स्पार्टन** लोक युद्धास आले नाहींत. या संकटांत ईश्वरेच्छेकरून आपले जन्मभूमिकेचें रक्षण करण्यास **मिलटाइडीज** नामें एक मनुष्य उभा राहिला, त्याणें **पारशी** लोकांची ११०००० ल-

ढाऊ फौजेची छावणी **मारेथन**चे मैदानांत पडली होती तिजवर **आथेन्स** शहरची फौज नऊ हजार व **प्लाशियन** लोकांची १००० एकून दाहा हजार फौजेनिशीं जाऊन त्या लोकांशीं युद्ध करून त्यांचा अगदीं पराभव केला. हा अकल्पित जय त्यांस प्राप्त झाला येणेंकरून **आथेन्स** शहरचे लोक जयमत्त होऊन त्यांणीं ज्या बेटांतील लोकांनीं **पारशी** लोकांस लढाईत कुमक केली होती त्या लोकांपासून खंडणी घेण्याचा निश्चय केला, आणि जाहाजांचा एक समुदाय तयार करून त्याजवर **मिलेटाइडिज** यास सरदार नेमून तो त्या लोकांपाशीं खंडणी मागावयास पाठविला, परंतु **नाक्सास** येथें त्याचा पराभव होऊन त्यास परत यावें लागलें. परंतु **आथेन्स** शहरचे लोक इतके कृतघ्न होते कीं ज्याणें त्यांस **पारशी** लोकांचे हल्यापासून मुक्त केलें त्याचा उपकार अगदींच न मानून ही स्वारी त्या मनुष्याच्या बेवकुफीनें फसली असें स्थापून त्यास दंड केला. परंतु दंड द्यावयास त्यास अगदीं सामर्थ्य नव्हतें ह्मणून त्यास कैदेंत पाठविलें, तेथें तो मृत्यु पावला. हें एक आठवण राहाण्याजोगें **आथेन्स** शहरांतील लोकांचे कृतघ्नतेचें उदाहरण आहे.

**पारशी** लोकांची **मारेथनचे** मैदानांत अप्रतिष्ठा झाली होती तिचा सूड उगविण्याकरितां ते लोक फारच उतावळे होऊन त्यांणीं तीन वर्षेंपर्यंत नव्या लढाईचें सामान तयार केलें. इतक्यांत **डेरायस** राजाचा अंतकाळ होऊन त्या गादीवर **जरक्सीज** नामें राजा झाला, तो आपले नवे उमेदींत होता, त्यास **ग्रीस** देशचे पलीकडील अमर्याद व कोणास माहीत नाहींत असे मुलुख काबीज

करण्यास तदबीर प्रथमतः **ग्रीस देश** हस्तगत करावा हीच दिसून आली. त्यावरून त्याणें तो देश सर करण्याचा निश्चय केला, आणि इतकी फौज जमविली कीं, तितकी त्या राज्यांत जमलेली कधीं कोणी पाहिली व ऐकिली नव्हती व त्याचे छावणीकरितां **सार्डिस** शहर नेमून देऊन त्यांबरोबर जाण्याकरितां आपण त्या शहरास गेला. त्याणें सर्व अधिकार आपल्या हातीं ठेवला होता. ती फौज समुद्राचे कांठीं जात असतां वाटेनें कितीएक नद्या कोरड्या पडल्या (व कितीएक गांवही उज्याड झाले.) असें ह्मटलें आहे, पुढें **एशियेंतून युरोपांत** जाण्याकरितां त्याणें **हेलिस्पांट्** नामक खाडीवर नावाचे दोन पूल बांधिले होते. त्यावरून ती फौज त्या खाडीचे पार उतरूं लागली ती अहोरात्र सात दिवसांत उतरून **फिरंगानचे** मैदानांत दाखल झाली. त्यावेळेस तिची संख्या वीस लाखांपेक्षां अधिक होती असें ह्मणतात. ह्या अगणित फौजेनिशीं **जरक्सीज** राजा **मासिडोन** व **थेसली** या देशांतून समुद्राचे कांठाजवळून चालत होता. कारण कीं जाहाजांचा समुदायही त्याच सुमारें कांठास लागावयाचा होता. जेव्हां ही फौज **ग्रीस** देशावर पडावयाकरितां उत्तर दिशेकडून तयार होऊन चालली तेव्हां इकडे **ग्रीक** लोक असे घाबरे झाले होते कीं त्यांस लढाई करण्याचा उपाय कांहीं सुचेनासा होऊन मुलखाचें संरक्षण करण्याचा हवाला दैवावर टाकून ते कांहीं वेळपर्यंत स्तब्ध राहिले. परंतु शेवटीं लढाई करावी असें ठरवून **आथेन्स** शहरचे लोकांनीं काय केलें कीं **थेसली** देशचे डोंगरांत **थर्मापिली** नामें एक लहानशी

नळी किंवा वारी आहे तींतूनच खुषकीनें ग्रीस देशास जाण्यास वाट आहे. दुसरी वाट नाहीं असें पाहून ती वाट रोंखून तेथें शत्रूंशीं युद्ध करावयास **लिओनिडास** नामें एक **स्पार्टा** देशाचा योद्धा अधिकार देऊन पाठविला त्याशीं फितुर करावा ह्मणून **पारशी** लोकांनीं फार प्रयत्न केला. परंतु त्या योद्ध्यानें ती गोष्ट नाकबूल केली. यावरून **जरक्सीज** राजानें त्यापाशीं हत्यारें मागण्यास पाठविलें, तेव्हां त्याणें आपले देशाचे चालीप्रमाणें जबाब दिला कीं, "स्वतः ये, आणि घेऊन जा." हें ऐकून त्या राजानें त्यास मारावयास हुकूम दिला. तेव्हां त्याचे फौजेनें **लिओनिडास** याजवर हल्ला केला, परंतु त्याणें आपले देशचे ३०० व **थेस्पिया** देशचे ७०० एकूण हजार योद्ध्यानिशीं त्या वीस लाख फौजेबरोबर तीन दिवस व तीन रात्री लढाई करून **पारशी** लोकांची बारा हजार फौज मारून तो स्वतः व त्याचे सोबती यांचा नाश होई तोंपर्यंत त्यांर्गा वाट दिली नाहीं, परंतु ते सर्व मरतांच रस्ता मोकळा होऊन **पारशी** लोक मैदानांत गेले. ही लढाई क्रिस्ताचे पूर्वीं ४८० वे वर्षीं झाली. ह्या शूरत्वाचे कामाची **ग्रीक** लोकांत फारच वाहावा होऊन त्या दिवसापासून ते **पारसी** लोकांची निर्भर्छना करून आपले शिपाईगिरीविषयीं मोठा अभिमान बाळगूं लागले.

**जरक्शीज** राजा **अटिका** प्रांतांत जाऊन **आथेन्स** शहरावर चालला असतां तेथील लोकांस आपलें शहर आतां वांचणें अशक्य असें दिसून येऊन त्यांर्णी तें सोडून दिलें. शहरांत मनुष्य नाहींसें होतांच **पारशी** लोकांनीं त्यास आग लावून दिली आणि **सार्डिस** शहर त्या

शहरचे लोकांनीं पूर्वी जाळिलें होतें त्याचा सूड उगविला नंतर **पारशी** लोकांचीं जाहाजें **ग्रीक** लोकांचे जाहाजांचे पाठीस लागलीं, तीं **सालमिस** नामें समुद्राचा कोन आहे तेथपर्यंत गेलीं. नंतर **थेमिस्टाक्लिज** नामें **आथेन्स** शहरचा राहणारा **ग्रीक** लोकांचा सरदार मोठा शाहाणा होता त्याचे हुकुमानें लढाई चालू झाली. तिचे अंतीं **पारशी** लोकांचा पराभव झाला. तेव्हां **जरक्सीज** राजास त्रास उत्पन्न होऊन इतके फौजेस खावयास मिळेल किंवा नाहीं याविषयीं त्यास अंदेशा प्राप्त होऊन तो **स्वदेशास** परत गेला. परंतु **ग्रीस** देशांत त्याणें मागेंही कांहीं फौज राखून ठेविली होती, तिशीं दुसरे वर्षीं **ग्रीक** लोकांनीं **प्लाशिया**नामक जाग्यांत लढाई करून त्या लोकांचा अगदीं पराभव केला, व त्याच दिवशीं उभयतांकडील जहाजांची पाण्यांत **माइकेल** येथें लढाई होऊन तींतही **पारशी** लोकांचा अगदीं पराभव झाला. याप्रमाणें सक्त मेहनत करून **ग्रीक** लोकांनीं आपला देश **पारशी** लोकांचे हल्ल्यांपासून मुक्त केला.

ह्या लढाईचे अंतीं **ग्रीक** लोकांस यश प्राप्त झाल्यामुळें त्या देशांतील लोकसत्तात्मक राज्याचे स्थितींत इतका फेर पडला कीं, जो हल्ला त्यांजवर मुळीं **पारशी** लोकांनीं केला होता, त्याचें त्यांणीं निवारण करून त्यांजवर उलट स्वारी करावी इतकी तयारी केली. आणि **एशियाखंडांतील** राहणारे आपले जातभाई यांस त्या लोकांचे हातून सोडवावें ह्मणून त्यांणीं पुढें लढाई चालविली त्यांत प्रथमतः **स्पार्टा** शहरचे लोक पुढारी झाले. परंतु त्यांच सरदारानें मदतगार लोकांशीं दांडगाई व दगाबाजी क-

रून त्यांस नाराजी केलें. तेव्हां **आथेन्स** शहरचे लोक पुढारी झाले आणि त्या दिवसापासून कोणी नाराजी न होतां लढाई नीट चालावी ह्मणून संपूर्ण बेटांतील लोक व **पिलोपोनिजसचे** पलीकडील दुसरीं लोकसत्तात्मक राज्यें होतीं त्यांतील लोक या सर्वांनीं एकजूट करून दर राजानें अमूक जाहाजें **आथेन्सचे** झेंड्यावरोवर, **पारशी** लोक ह्मणजे सर्व राष्ट्रांचे शत्रु यांशीं युद्ध करावयास द्यावीं, असा ठराव केला. (परंतु तो चालला नाहीं) यास्तव कांहीं दिवसांनीं पुढें असें ठरलें कीं, दर राजानें अमूक रुपये नक्त **डिलास** नामक शहरांतील राष्ट्राचे खजिन्यांत नेऊन जमा करावे.

**पारशी** लोक परत गेल्यावर **आथेन्स** शहरचे लोकांनीं आपले जळालेल्या शहरास जाऊन **थेमिट्साक्लिज** नामक सरदाराचे तजविजीनें तें शहर पुन्हा उभें करून त्याचा शहरपन्हा इतका मजबूद व लढाऊ बांधिला कीं शत्रूंनीं त्यास वेढा घातला असतांही धक्का लागूं नये. तथापि पूर्वींचे अनुभवावरून त्या सरदाराचे मनाची अशी खातरी झाली कीं, त्या शहरचे राहाणाऱ्यांस आपलें संरक्षण करून कीर्ति मिळविण्यास केवळ जाहाजांचाच भरंवसा होता, याशिवाय त्याचे मनांत आपले शहरचे लोकांस संपूर्ण **ग्रीस** देशांत श्रेष्ठ करावयाची उमेद होती, यास्तव तो त्या लोकांचा अधिकार पाण्यांत वाढविण्याकरितां उद्योग करूं लागला. याप्रमाणें त्याणें त्या शहरांतील लोकांचे हितार्थ मोठमोठालीं कामें केलीं, तथापि त्या कृतघ्न लोकांनीं अविचारानें त्यास मुलुखांतून काढून दिलें, तेव्हां त्यास **फारस** देशांत **पारशी** लोकांचा आ-

श्रय पाहाणें प्राप्त झालें. तो सरदार कांहीं एक दिवस त्या देशांत राहून त्याचा अंतकाळही तेथेंच झाला. त्याचे मागून अनुक्रमानें मोठे मोठे शाहाणे कारभारी झाले. त्यांणीं माजी कारभारी ह्मणजे **थेमिस्टाक्लिज** याचा बेत पुरा करून कांहीं वर्षांनीं **आथेन्सचें** लोकसत्तात्मक राज्य अशा योग्यतेस आणिलें कीं, तें संपूर्ण **ग्रीस** देशामध्यें श्रेष्ठ झालें. त्या दिवसापासून ४० वर्षेंपर्यंत ह्मणजे **पारशी** लोकांची लढाई समाप्त झाल्यापासून **पिलोपोनिजसची** लढाई सुरू होई तोंपर्यंत **आथेन्स** शहर त्याच स्थितींत राहिलें. त्या चाळीस वर्षांमध्यें संपूर्ण **ग्रीस** देशांत **आथेन्स** शहरचे लोक मोठे बलाढ्य होऊन त्या देशांतील चोंहींकडील राज्यप्रकरणीं कामें काजें तेथेंच होऊं लागलीं, व शहरांतील लोकांचे मनांत राष्ट्राभिमान उत्पन्न होऊन ज्या गोष्टी थोरथोर व ज्या मनुष्यमात्रास थोर पदवीस पोहोंचविणाऱ्या त्या सर्व मोठ्या जोरानें वृद्धिंगत झाल्या. त्यांविषयीं पुढें लिहितों.

ज्योतिषविद्येचा प्रसार मोठ्या आस्थेनें झाला, कळा व विद्या इतक्या पूर्णतेस आल्या कीं त्यांप्रमाणें कोणत्याही देशांत नव्हत्या, कवितेचा अति उत्कर्ष झाला. दरबारांत संभाषण करण्याची रीति घरोघर माहित झाली. चितार कामें व दगडावर किंवा धातूचे पत्र्यांवर खोंदण्याची कळा व गृहशिल्पशास्त्र हीं एकदम पूर्णतेस आलीं.

तथापि, ही एक आश्चर्याची गोष्ट आहे कीं ह्या सर्व गोष्टीपासून राष्ट्राचें हित कांहींच होत नव्हतें. कां कीं त्या लोकसत्तात्मक राज्यांत अशी चाल होती कीं, जर कोणी मनुष्य आपले शहरचे राहाणाऱ्यांपेक्षां श्रेष्ठ निघाला

तर त्यास मुळखांतून काढून देत असत. परंतु **स्पार्टा** शहरची गोष्ट निराळी होती; तेथील लोकांच्या चाली रानवटी होत्या ही एक त्यांचे बुद्धिप्रकाशास मोठी हरकत होती; तथापि त्या देशांतील लोक स्वदेशाकरितां जीव द्यावयास शिकले होते. परंतु **आथेन्स** शहरचे लोक स्वदेशाकरितां जीव रक्षण करावयास शिकले होते.

क्रिस्ताचे पूर्वी ४४९ वे वर्षी **आथेन्स** शहरचे लोकांनीं **पारशी** लोकांचा बहुत वेळ पराभव केल्यामुळे त्या देशचे राजास त्या लोकसत्तात्मक राज्याशीं तहनामा करणें प्राप्त झालें. त्या तहनाम्यांत त्याणें **एशियामैनर** देश सोडून देण्याचें कबूल करून **पारशी** लोकांनीं **इजियन** समुद्रांत जाहाजें चालवूं नयेत असा ठराव केला. याप्रमाणें तीस वर्षांचे लढाईनें **पारशी** लोकांचा गर्व परिहार झाला; परंतु त्या राज्याचा प्रताप पूर्वींच कमी झाला होता; कारण कीं जी हिम्मत **साइरस** राजामध्यें होती ती त्याच्या मागून जे राजे झाले त्याजमध्यें राहिली नाहीं, आणि **एशिया** खंडांतील राजांप्रमाणें ज्या थोर मनुष्यांनीं तें राज्य मिळविलें होतें तें त्यांत नाहींसे झाल्यावर जनानखान्यांतलि स्त्रियांचा अधिकार वाढून राजे हतवीर्य झाले. तेणेंकरून दूर देशांतील अम्मलदार यांचें प्राबल्य वाढून ते सरकारी हुकूम मानीतनासे झाले.

**आथेन्स** शहरांत ज्या काळीं विद्या व कळा यांचा उत्कर्ष झाला होता व त्या लोकसत्तात्मक राज्याचा स्वतंत्रपणा **ग्रीक** देशचे सर्व राजांनीं व **फारस** देशचे राजानेंही कबूल केला होता, त्या काळीं **आथेन्स** शहरचे लोक आपले जुटांतील लोकांविषयीं मनांत तुच्छपणा आणू-

न त्यांवर जुलुम करूं लागले. जो पैसा त्यांचे जुटांतील लोक **पारशी** लोकांचे लढाईकरितां त्यांस स्वसंतोषानें देत होते त्याचा त्या लोकांवर कर बसवून त्यांस आपले रयतेप्रमाणें ते मानूं लागले. तेणेंकरून त्या लोकांचे मनांत स्पर्द्धा उत्पन्न झाली. परंतु **आथेन्स** शहरांत **पेरिकल्स** नामें मुख्य कारभारी झाला होता त्याणें कांहीं वर्षेंपर्यंत त्या लोकांस आपले तेजानें व शाहाणपणानें दबावून ठेविलें होतें तथापि त्याचे अंतकाळाचे समारास **स्पार्टा** शहरचे लोकांनीं त्या नाराजी लोकांस चिथावून ते लोक कलहास प्रवृत्त केले. ही गोष्ट क्रिस्ताचे पूर्वी ४३० वे वर्षी झाली. लढाईचे पूर्वी बहुतकरून सर्व **ग्रीक** राष्ट्रांच्या दोन फळ्या होऊन कांहीं लोक **आथेन्स** शहरचे लोकसत्तात्मक राज्याकडे गेले व कांहीं लोकांनीं **स्पार्टा** शहराचा पक्ष धरिला आणि आपसांत मोठी द्वेषयुक्त लढाई चालू झाली. ती संपूर्ण **ग्रीस** देशची धुळधाणी होई तोंपर्यंत चालली होती. **आथेन्स** शहरचे राजाकडे **ग्रीस** देशांतील पाण्यांत लढणारे सर्व लोक होते व **स्पार्टा** शहराकडे सर्व फौज जमीनिवर लढणारी होती. प्रथम तीन वर्षेंपर्यंत **आथेन्स** शहरचे लोक आपलें रक्षग करून होत, परंतु चवथे वर्षी त्या शहरांत जरीमरी शिरून इतका नाश झाला कीं तितका लढाईंतही झाला नव्हता. कारण कीं, त्या लोकांचा **पेरिकल्स** नामें सरदार हाही त्याच दुखण्यानें मृत्यु पावला. नंतर राज्यकारभार **क्लियन** नामें चांभार याचे हातीं जाऊन लढाई मोठे अविचारानें व क्रूरपणानें होऊं लागली. इकडे **स्पार्टन** लोकांमध्यें

**ब्रसिडास** नांवाचा एक पुरुष उत्पन्न झाला तो त्या चांभारापेक्षां शाहाणा व शूर होता ह्मणून बहुधा असें वाटत होतें कीं लढाईचे अंतीं **स्पार्टन** लोकांचा जय होईल, परंतु इतक्यांत तो बाहादूरी करून लढाईंत नाश पावला. नंतर थोडकेच अवकाशानें लढणारे लोकांमध्यें पंनास वर्षांचा तहनामा झाला, परंतु तो पांच वर्षेंही चालला नाहीं. कारण कीं **आथेन्स** शहरांत **आल्सिबाईडिज** नांवाचा एक मनुष्य उत्पन्न झाला. त्याचा स्वभाव मोठा क्रूर असून त्याची बुद्धि फारच चंचल होती, परंतु त्यास आंगावर घेऊन काम करण्याचें सामर्थ्य नव्हतें. त्या पुरुषानें **आथेन्स** शहरचे राज्यांत आपलें आधिपत्य फारच वाढवून मी लढाईंत मोठा पराक्रम करीन असें त्यास वाटून त्याणें त्या लोकांस तहनामा मोडण्याविषयीं आग्रह केला. आणि त्यांस **सिसिली** बेट सर करण्याचे मनसुब्यांत गुंतवून त्या राज्यांतील सर्व लोकांस त्या दूरदेशच्या निरर्थक स्वारीकरितां पुढें घातलें. परंतु **आथेन्स** लोकांनीं त्यास कांहीं अविचारी कामाबद्दल लौकरच घालवून दिलें. तेव्हां तो तेथून निघून त्यांचे शत्रू **स्पार्टन** लोक यांकडे जाऊन मिळाला आणि त्यांकडून **सारेक्यूज** शहरचे लोकांचे कुमकेस मोठी फौज पाठवून त्याचे योगानें **आथेन्स** शहरचीं लढाऊ जाहाजें व त्यांचीं जमीनीवरील फौज हीं अगदीं नष्ट करून टाकिलीं. ह्या थोर घातापासून **आथेन्स** शहरचे लोक कधींही सांवरले नाहींत तथापि एकच लढाईंत आपले सेनापति, व फौज, व जाहाजें, हीं नष्ट झालीं ह्याचें त्यांस वैषम्य वाटून त्यांस मोठा आवेश आला, आणि त्यांणीं मोठे

खरेनें नवीं जाहाजें तयार करून नवी फौजेची भरती केली व आपले मदतगार लोक यांसही तोंपर्यंत आपले आधीन ठेविले होते. ही गोष्ट **स्पार्टन** लोकांस कळतांच ते **लायकरगस** याचा कायदा एकीकडे ठेवून जाहाजांची तयारी करूं लागले, परंतु त्यांपाशीं खर्च करावयास पैसा कमी होता यास्तव त्यांणीं **फारस** देशाचे राजास अर्ज केला. ही गोष्ट **ग्रीस** देशास मोठी वद्धक झाली. कारण कीं या अर्जीमुळें **फारस** देशचे राजास आपलें हित करण्याची संधि दिसून आली ती अशी कीं **ग्रीक** लोकांस पैसा चारून त्यांमध्यें कलह उत्पन्न करून त्यांचें सामर्थ्य कमी करावें. याप्रमाणें जी गोष्ट **पारशी** लोकांस आपले बाहादुरीनें संपादण्याचें सामर्थ्य नव्हतें, ती त्यांणीं पैसा खर्च करून सहज प्राप्त केली, व ज्या वेळेपासून ग्रीक लोकांनीं **पारसी** लोकांचे पैशास हात लाविला त्या वेळेपासून त्यांचा प्रमाणिकपणा नष्ट होऊन त्यांजबरोबर त्यांचें सामर्थ्यही नाहींसें झालें.

**आलसिबाइडिज** नामें मनुष्यास **आथेन्स** शहरचे लोकांनीं मुलखांतून काढून दिल्यावर तो **स्पार्टन** लोकांकडे मिळाला होता, परंतु त्याणें लौकरच त्या लोकांस सोडून पुनः आपले स्वदेशास आला, आणि कितीएक लढाईंत **स्पार्टन** लोकांचा पराभव केला. तथापि **लाईसांडर** नामें **स्पार्टन** लोकांचे सेनापतीनें त्याचा दोन वेळ पराभव केला, परंतु **आथेन्स** शहरचे लोकांनीं आपली सर्व फौज जमा करून **इजिन्याशि** नामक जाग्यांत त्याचा अगदीं पराभव करून टाकला. नंतर ज्या जाहाजां-

तील सेनापतींनीं हें यशस्वी काम केलें होतें त्यांस शाबा-सकी द्यावयाची अथवा त्यांचा उपकार मानावयाचा तें कांहींच न करितां त्यांस क्रूरपणानें मारून टाकिलें, परंतु ह्या कर्माचें फळ त्यांस लागलेंच प्राप्त झालें. **लाइसांडर** याणें **इगासपोटेमस** जाग्यांत त्यांचे जाहाजांवर छापा घालून सर्व हस्तगत करून घेतलीं. तेणेंकरून **आथेन्सचे** लोकांचा पाण्यांतील वरिष्ठपणा नष्ट होऊन मदतगार लोकही **स्पार्टन** लोकांकडे जाऊन मिळाले व त्या शहरास **स्पार्टन** लोकांनीं वेढा घालून त्यांत अम्मल करून त्याचा शहरपन्हा व बुरूज जमीनदोस्त केलें, व त्यांत अम्मल करण्याकरितां तीस जुलमी अम्मलदार नेमिले. याप्रमाणें **आथेन्स** शहर नष्ट होतांच **पिलोपोनिजसची** लढाई समाप्त झाली. ह्या लढाईमुळें ग्रीक लोकांची नेकी अगदी बुडून त्यांमध्यें जो स्वजातीचा अभिमान होता तो नाहींसा होऊन लोक आपआपले जमातीचा पक्ष धरूं लागले, तेणेंकरून प्रतिस्पर्धा व द्वेष उत्पन्न होऊन राष्ट्राचें सामर्थ्य नष्ट झालें.

ही लढाई समाप्त झाल्यावर चार वर्षांनीं **फारस** देशचे राजाचा **साइरस** नामें धाकटा भाऊ याणें त्या राजास पदच्युत करावें ह्मणून दाहा हजार **ग्रीक** लोक चाकरीस ठेविले होते, परंतु **कुनाक्सा** येथें लढाई झाली तींत त्याचा पराभव होऊन तो नाश पावला. तेव्हां **पारसी** लोकांनीं त्या **ग्रीक** लोकांस हत्यारें ठेवण्यास सांगितलें, परंतु ही गोष्ट न मानून ते **जिनोफन** नामें त्यांचा सरदार होता त्याचे झेंड्याखालीं चालून **फारस** देशाचे मध्यभागांतून लढाऊ फौजेचे मधून व जो मुलुख पाहाडी

असून त्याची त्यांस अगदीं माहितगारी नव्हती अशा मुलखांतून व तशांत शत्रू त्यांस नेहेमीं इजा देत असतां त्यांपासून पराभव न पावतां ते स्वदेशास परत गेले. तेणेंकरून त्याचे शत्रू ह्मणजे **पारसी** लोक यांमध्यें काय सामर्थ्य होतें तें संपूर्ण **ग्रीक** लोकांस माहीत झालें. जर **ग्रीस** देशांतील राजांचे कारभाऱ्यांनीं **पारसी** लोकांपासून पैसा खाल्ला नसता तर ते लोक या संधीस **पारसी** लोकांचें राज्य हस्तगत करिते.

**आथेन्स** शहर गारद झाल्यावर **ग्रीस** देशांत **स्पार्टा** शहरचा अधिकार श्रेष्ठ होऊन त्या लोकांनीं तरवारीचे जोरानें पस्तीस वर्षेंपर्यंत राज्य केलें. नंतर त्यांस अपाय आला. तो असा कीं, **एशिया** खंडांतील राहाणारे **ग्रीक** लोक यांणीं **साइरस** ह्मणजे **फारस** देशचे राजाचा धाकटा भाऊ यास कुमक दिली होती, यास्तव त्यांवर त्या मुलुकांतील **पारसी** लोकांचे सुभेदाराची इतराजी झाली. तेव्हां **स्पार्टा** शहरचे लोकांस आपले जातभावांचे हितार्थ **पारसी** लोकांशीं लढाई करणें प्राप्त झालें. त्याकाळीं **स्पार्टा** शहरांत **एजिसिलेअस** नामें मोठा पराक्रमी राजा झाला होता, त्याणें क्रिस्ताचे पूर्वीं ३९६ वे वर्षीं **ग्रीक** लोकांची फौज बरोबर घेऊन **फारस** देशचे मध्यभागापर्यंत जाऊन तेथील राजाचे मनांत दहशत उत्पन्न केली, व त्यास हरकत न होतां तो पुढें वाढत चालला. यामुळें त्याचे मनांत आपला सामना करावयास **पारसी** लोकांमध्यें सामर्थ्य नाहींसें भासून त्याणें एकदम **फारस** देशचें राज्य नष्ट करण्याचा विचार केला. परंतु **पारसी** लोकांनीं पैसा खर्च करून **ग्रीस** देशांतच

त्यास शत्रू उभे केले. याजमुळें त्यास तो विचार सोडून देऊन आपले घर संभाळण्याकरितां स्वदेशास परत जाणें प्राप्त झालें.

इतक्यांत **आथेन्स** शहरचे लोक **स्पार्टाचे** राजापासून स्वतंत्र होऊन दिवसानुदिवस नेट धरूं लागले होते. तों इकडे **पारसी** लोकांनीं **इजिसिलेअस** नामें **स्पार्टा** शहरचा राजा याचे मसलतीस व्यत्यय आणावा ह्मणून **स्पार्टन्स** व **अथेनियन्स** या दोन्ही लोकांमध्यें लढाई उत्पन्न केली त्या लढाईंत **कारिंथ, थिब्स,** व **अर्गास**, या तिन्ही शहरांतील लोक **अथेनियन्स** लोकांस सामील होते. तथापि **स्पार्टन** लोकांनीं **कारोनिया** येथें **अथेनियन्स** लोकांचा मोड केला, परंतु **कोनन** नामें **आथेन्स** शहरचे सरदारानें आपल्या व **पारसी** लोकांच्या जाहाजांचा समुदाय एकत्र करून **स्पार्टन** लोकांचा समुद्रांत पराभव केला. नंतर **स्पार्टन** लोकांनीं **पारसी** लोकांस **अथेनियन्** लोकांपासून निराळे काढून आपल्याकडे आणावें ह्मणून फार प्रयत्न केला, परंतु तो निष्फळ झाला. शेवटीं त्या लोकांस पुढें लढाई चालविण्याचा त्रास उत्पन्न होऊन त्यांणीं **अन्टालसिडास** नामें त्यांचा सेनापति होता त्याचे मार्फतीनें **फारस** देशचे राजाशीं तहनामा केला. तेणेंकरून **ग्रीक** लोकांमध्यें अपसांत फूट होती ती नाहींशी होऊन स्वस्थता झाली. सदरहू तहनामा **फारस** देशचे राजाचे मर्जीनें झाला, यामुळें ग्रीक लोकांचा गर्व परिहार होऊन त्यांस त्या बादशाहास **एशियामैनर** देशांतील आपले जातभाई यांचा मुलुख सोडून देणें प्राप्त झालें. याप्रमाणें **स्पार्टन** लोकांनीं मोठा तोटा

सोसून **ग्रीस** देशांत आपला वरिष्टपणा कायम राखिला, परंतु पुढें ते मनास वाटेल तसा कारभार करूं लागले यामुळें त्यांचें राज्य नष्ट होण्याचा पंथ तयार होऊं लागला.

क्रिस्ताचे पूर्वी ३८२ वे वर्षी **फिबिडास** नामें **स्पार्टन** लोकांचा सरदार दगाबाजीनें **थीब्ज**चे किल्यांत अम्मल करून त्यांतील राहणाऱ्यांस आपले गुलामाप्रमाणें मानूं लागला. परंतु त्या शहरांत त्या काळीं **पिलोपिडास** आणि **इपामिनान्डास** या नांवाचे दोन शाहाणे मनुष्य होते त्यांची कीर्ति लोकांत वाढली नव्हती व ते जितके शाहाणे व विद्वान तितके शूरही होते. त्यांणीं सक्त मेहनत करून **थीब्ज** शहरचें लोकसत्तात्मक राज्य **स्पार्टन** लोकांचे हातून सोडविलें, आणि **लासिडिमन्** देशाचे मध्यभागीं लढाई चालवावी असा निश्चय केला. त्यानंतर **स्पार्टा** व **थीब्ज** यांतील लोकांमध्यें **लुक्ट्रा** नामक जाग्यांत लढाई झाली. तींत **इपामिनान्डास** यास यश प्राप्त होऊन **स्पार्टा** शहरचा अधिकार नष्ट होण्याचा समय आला. त्या वेळेस त्या गर्विष्ठ लोकांनीं **आथेन्स** शहरचे लोकांपासून कुमक आणून कांहीं काळपर्यंत **इपामिनान्डास** याचा उपाय खुंटविला होता. इकडे **पिलोपिडास** याणें उत्तरदिशेस स्वदेशीय लोकांचें राज्य वाढण्याचा प्रयत्न करून तो सरदार **थेसली** देश **थीब्ज** शहरचे राज्यांत मिळविण्याचे बेतांत होता, परंतु तो एके लढाईंत नाश पावला. (यामुळें तो बेतही त्याबरोबरच गेला). ही गोष्ट क्रिस्ताचे पूर्वी ३६४ वे वर्षी झाली. इकडे **इपामि**-

**मान्डास** याणें **स्पार्टन्** लोकांचे मुलखांवर नवा हल्ला करून **मिसिनिया** देशचे लोकांस **स्पार्टन** लोकांचे दासत्वापासून मोकळें करून क्रिस्ताचे पूर्वी ३६२ वे वर्षी पुनः **स्पार्टन** लोकांशीं **मॅंटिनियाचे** मैदानांत लढाई केली. तींत त्याचा जय झाला परंतु तो लढाईंत प्राणास मुकला. याप्रमाणें या दोन मनुष्यांनीं **स्पार्टन** लोकांचा गर्वपरिहार करून त्यांचा वरिष्ठपणाही नाहींसा करून आपलें **थीब्ज** नामक गांवाचा अधिकार **ग्रीस** देशांत थोर केला. परंतु तो फार दिवस ठरला नाहीं; ते मनुष्य नाहींसे होतांच तोही नष्ट झाला.

ह्या वेळेपासून ह्मणजे इसाचे पूर्वी ३६२ वे वर्षापासून **मासिडोन** शहरांत **शिकंदर** नामें योद्धा राज्याधिकारी होई तोंपर्यंत ह्मणजे क्रिस्ताचे पूर्वी ३३६ वर्षेपर्यंत ह्मणजे २६ वर्षांत **ग्रीस** देशामध्यें जसा अनुक्रमानें **आथेन्स स्पार्टा** आणि **थीब्ज** या शहरांतील वरिष्ठपणा वाढला होता, तसा पुढें कोणतेंही लोकसत्तात्मक राज्याचा वाढला नाहीं. कारण कीं पुढें त्या देशास उतरता पाया आला. हरएक राजाचे मनांत त्याचे जवळचे राज्याविषयीं स्पर्धा उत्पन्न झाली तेणेंकरून राष्ट्राभिमान नाहींसा होऊन **ग्रीस** देश इतका विघडला कीं, त्याचे बंदोबस्ताची आशा अगदीं राहिली नाहीं. ह्या सर्व गोष्टींची वृद्धि व्हावयास दुसरें कारण असें झालें कीं, **ग्रीस** देशांत पूर्वी ग्रीक लोकांनीं **आंफिकशिआनिक कौन्सल** या नांवाची एक सभा सर्वांचा एकोपा राखण्याकरितां स्थापिली होती तींतील लोकांनीं हल्लीं एक नवीन लढाई उपस्थित केली. तिला **होलिउवार** अशी संज्ञा आहे. ती दाहा वर्षेपर्यंत

घालली होती. याचें एक विशेष कारण असें झालें कीं, क्रिस्ताचे पूर्वी २५७ वे वर्षी **फोशिअन** लोकांनीं **डेल्फी** संस्थानच्या जमीनीवर नांगर फिरविला असतां कचेरीवाल्यांनीं त्यांशीं यद्वातद्वा भाषण केलें. यास्तव त्या लोकांनीं एकदम **डेल्फी** संस्थानावर चाल करून त्या देवालयांतून बहुत दवलत लुटून नेली आणि **थीब्ज*** शहरचें लोकसत्तात्मक राज्य व त्याचे जुटांतील अणखी राजे यांशीं लढाई करावयास संपूर्ण **ग्रीस** देशांतून शिपायांची भरती केली होती त्यांचे खर्चास ती दवलत लावून दिली. ती दवलत **ग्रीस** देशांत फैलतांच जे कांहीं सद्गुण **ग्रीक** लोकांमध्यें **पारसी** लोकांपासून पैसा खाल्ल्यावरही शेष राहिले होते, तेही नष्ट झाले.

आतां **ग्रीस** देशांतील लोकसत्तात्मक राज्यांचे विनाशकाळाची संधी येऊन पोहंचली. **मासिडोन** देशांत **फिलिप** नामें एक मोठा पराक्रमी राजपुत्र **इपामिनान्डास** (थीब्ज शहरचें लोकसतात्मक राज्यांतील मुख्य अधिकारी) याचे हाताखालीं राहून हरएक कामांत तरबेज झाला होता तो **मासिडोनचे** गादीवर बसला. त्या वेळेस त्यास नानाप्रकारचीं संकटें प्राप्त झालीं परंतु त्याणें आपल्या पराक्रमानें दोन वर्षांत हरएक संकटापासून मुक्त होऊन आपला अधिकार वाढवावा या हेतूनें तो **ग्रीस** देशचे राज्यकारभारांत शिरला. आणि क्रिस्ताचे पूर्वी ३३८वे वर्षी **चारोनिया** नामें जाग्यांतील लढाई जिंकून त्या सर्व लोकसत्तात्मक राज्यामध्यें श्रेष्ठ झाला. नंतर

---

* **थीब्ज** शहरचे लोकांनीं, डेल्फी संस्थानचे देवळाचें रक्षण करणें याविषयीं पत्कर घेतला होता.

त्याणें आपला वरिष्ठपणा त्या लोकांवर कायम ठेवावा ह्मणून त्या देशांत साम दान दंड आणि भेद या सर्व गोष्टी चालविल्या होत्या. तों इकडे त्याचे सेनापतींनीं त्याचे राज्याचे उत्तरेस **थ्रेस** देशचा पाहाडी मुलुख याजवर हल्ला करून ज्या वसाहती **ग्रीक** लोकांनीं त्या देशांत समुद्राचे कांठावर केल्या होत्या व ज्यामुळें त्या लोकांस बहुत दिवसांपासून अहंपणा होता त्या सर्व त्यांणीं जिंकून आपले मालकाचे राज्यांत मिळविल्या. याप्रमाणें जीं जीं कामें त्या राजानें हातीं धरिलीं त्या सर्वांत त्यास यश प्राप्त होऊन शेवटीं त्याणें **फारस** देशचे राज्यावर स्वारी करण्याचा निश्चय केला. परंतु (हीं गोष्ट त्याचे हातून घडावयाची नव्हती, यास्तव ईश्वरीच्छेकरून) तो क्रिस्ताचे पूर्वी ३३६ सावे वर्षीं मारेकऱ्यांचे हातून नाश पावला. नंतर त्याचे गादीवर त्याचा पुत्र **शिकंदर** नामें राजा झाला. त्याणें बारा वर्षें राज्य करून **एशिया** खंडाचे पश्चिमभागाची स्थिति अशी बदलून टाकिली कीं त्याचे प्रतापानें इतर मांडलिक राजांचा स्वतंत्रपणा नष्ट होऊन तीं राज्यें पुनः कधींही उदयास आलीं नाहींत. त्या प्रतापी राजाचे पराक्रमाचा वृत्तांत पुढें लिहितों.

## शिकंदर बादशाहाविषयीं.

शिकंदर याचा विद्याभ्यास—तो गादीवर बसला—त्याणें पहिल्या वर्षी डान्युब नदीवर लढाई केली—ग्रीस देशांतील लढाई—फारस देशावरील स्वारी—ग्रानिकस येथील लढाई—त्याणें एशियामैनर देश सर केला—इससची लढाई—टायर शहरास वेढा घालून तें लुटलें—मिसर देश त्याचे कबज्यांत आला—शिकंदराबाद नामक शहराचा पाया—आरबेला येथील लढाई—त्याणें फारस देश जिंकला—डेरायस राजाचा मृत्यु—ब्याक्ट्रिया व त्रान्साक्सिआना येथील वर्तमानें—क्लाइटस् याचा वध—हिंदुस्थानावरील स्वारी—पोरस राजाचा पराभव—शिकंदर बादशाहा स्वदेशास परत गेला—शिकंदराचा अंतकाळ—या सर्व गोष्टींविषयीं पुढें लिहितों.

**शिकंदर** यास विद्या शिकविण्याकरितां त्याचा बाप **फिलिप** याणें त्यास **अरिस्टोटल** नामें त्याकाळीं मोठा विद्वान मनुष्य होता त्याचे स्वाधीन केलें. त्या उभयतांविषयीं अशी तारीफ लिहिली आहे कीं, **शिकंदर** हा त्या गुरूस योग्य शिष्य व **अरिस्टोटल** हा त्या शिष्यास योग्य गुरू, याप्रमाणें उभयतां होते. ह्मणून ते एकमेकांस फारच मानीत असत. **शिकंदर** हा **मासिडोन** शहरचे गादीवर आपले विसावे वर्षी बसला.

त्याणें राज्यकारभार हातांत घेतला त्या वेळेस त्यास खजिन्यांतील जमेपेक्षां कर्ज आठपट ज्यास्ती होतें. तशांत त्याजवर चोहींकडून अशीं संकटें कोसळलीं कीं, साधारण मनुष्याची त्यांपासून सुटका होणें कठीण. उत्तर, पूर्व, आणि पश्चिम ह्या तिन्ही दिशांकडील त्याचे बापानें जिंकलेले लोक स्वतंत्र व्हावयास तयार झाले होते व **ग्रीक** लोकांनीं मोठा शाहाणा व मसलतदार अशा **फिलिप** राजाचे गादीवर अल्पवयाचा राजा बसलेला

पाहून आपले मनांत असा विचार आणिला कीं आह्मी आतां स्वतंत्र होऊं परंतु जो मुलगा मुगुटधारी झाला तो अशा प्रसंगांनीं डगमगायाजोगा नव्हता. जीं कामें त्याणें गादीवर बसण्याबरोबर केलीं त्यांवरूनच लोकांची खातरजमा झाली कीं, ह्याचा पराक्रम विलक्षण आहे हा दिग्विजय करील. पुढें त्याप्रमाणेंच त्याणें दुनिया काबीज केली. प्रथमतः त्याणें निवडक फौज बरोबर घेऊन **ग्रीस** देशाचे दक्षिणभागावर स्वारी केली आणि आपले शाहाणपणानें तेथील बदललेले लोकांच्या हिंमती मोडून संपूर्ण **ग्रीक** लोकांचे तर्फेनें **फारस** देशावर स्वारी करण्याकरितां **फिलिपा**चे जागीं मुख्य सेनापती व्हावें ह्मणून **स्पार्टा**चें राज्य खेरीज करून बाकी सर्व लोकसत्तात्मक राज्यांची संमती घेतली. नंतर त्याणें **मासिडोन** देशास परत येऊन थंडीचे दिवसांत लढाईची तयारी करून उन्हाळा लागतांच उत्तर दिशेकडील जे रानवटी लोक नुकतेच त्याचे बापाचे हाताखालीं आले होते त्यांवर स्वारी केली, आणि आपण मोठे कुशलतेनें शत्रूंचे देखत आपले फौजेनिशीं **हिमस** नामें डोंगर ज्यास सांप्रतकाळीं **बल्कान** असें ह्मणतात त्याचे पलीकडे उतरून शत्रूंच्या संमुख गेला. पुढें त्या डोंगराचे पायथ्यापासून **डान्युब** नदीपर्यंत जें मैदान आहे त्यांत दाखल होतांच दंगेवाले सरदार त्या नदींतील एका बेटांत शिरले, तों इतक्यांत **शिकंदरानें** तेथें जाहाजें आणविलीं. आणि त्या बेटांत जाण्याविषयीं यत्न केला परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तथापि आपले बापाचे **गिद्दी** नामें प्राचीन शत्रू नदीचे पलीकडे जमून बसले आहेत असें ऐकतांच तो तखत्यांच्या

सांगडी तयार करून त्यांवरून फौजेसुद्धां ती महानदी रात्रीस उतरून पार गेला. त्या नदीस नावांचा पूल बांधिल्याशिवाय पूर्वी कोणीही उतरला नव्हता. यास्तव **शिकंदराचें** तें अघटित कर्म पाहून त्या लोकांस मोठें आश्चर्य वाटलें. तो मैदानांत दाखल होतांच त्याणें शत्रूंशीं संग्राम करून त्यांचा पराभव केला. आणि लागलाच पुनः तो पहिल्याप्रमाणें तख्त्यांचे सांगडींवरून फौजेनीशीं आलिकडे उतरून आपले छावणीस परत आला. हें शूरत्वाचें व धैर्याचें काम पाहून आसपासचे राहाणाऱ्यांचे मनांत भय प्राप्त होऊन त्या लोकांस **शिकंदरास** शरण जाणें प्राप्त झालें. तो परत येत असतां **इलिरिया** नामें **मासिडोन** देशचे उत्तरेस एक पाहाडी मुलुख आहे, त्याचे घाटींत त्याच मुलुखांतील दोन सरदारांनीं त्यास लढाईचे तयारीनें आडवे येऊन तुला फौजेनीशीं मारून टाकितों ह्मणून धमकी सांगून पाठविली. असें संकट त्यास पूर्वी कधींही प्राप्त झालें नव्हतें. परंतु त्याणें आपले सामर्थ्येंकरून त्यांचा अगदीं पराभव करून आपला **मासिडोनाचा** रस्ता मोकळा केला. जोंपर्यंत त्याचा **ग्रीक** लोकांशीं पत्रद्वारें व्यवहार बंद झाला होता तोंपर्यंत बाहेर अशी खबर पसरली होती कीं, तो फौजेनिशीं मध्येंच मारला गेला. त्यावरून **थीब्ज** शहरचे लोकांनीं सुरूखुरू होऊन लागलेंच त्याचे ताब्यांतून बाहेर पडून त्या शहरांत **शिकंदराचे** तर्फेनें जे लोक बंदोबस्ताकरितां राहिले होते त्यांस ठार मारून टाकिलें. त्या दंग्याची खबर त्यास पोहोंचतांच त्याणें असें मनांत आणलें कीं मला उशीर लागल्यामुळें या सर्व गोष्टी घडल्या आहेत, यास्तव लाग-

लाच तो त्या डोंगरांतून मोठ्या त्वरेनें खालीं उतरून जों **थीब्ज** शहरचे लोक आपले मनांत तो अद्यापपर्यंत **डान्युब** नदीचे कांठावरच गुंतला असेल किंवा डोंगरांत मारला गेला असेल, अशा कल्पना करून आनंदांत आहेत तों इतक्यांत तो **ग्रीस** देशाचे उत्तरभागांतून त्या शहराजवळ दाखल झाला. त्या काळीं तटबंदीचें शहर घ्यावयास वर्षोंगणतीं काळ लागत असे व तें शहर घ्यावयास पूर्वीं **आथेन्स** शहरचे लोकांस तीन वर्षें लागलीं होतीं. यास्तव जेव्हां **शिकंदर** याणें त्या लोकांस हात जोडून आपणाकडे बलाविलें त्या वेळेस आह्मास बहुत दिवसपर्यंत भय नाहीं असा त्यांस भरवसा येऊन त्यांणीं **शिकंदराचा** हुकूम अमान्य केला. परंतु त्यांचा भरंवसा लौकरच नाहींसा होऊन तें शहर पहिलेच हल्यास **शिकंदराचे** हातीं आलें. त्या वेळेस त्याणें त्या शहरांतील लोकांस फारच इजा दिली यास्तव त्याचे अब्रूची हानी झाली. ह्याविषयीं मजकूर लिहितों, त्याणें लहान मोठे मनुष्याची वगळ नकरितां सर्वांस मारण्याविषयीं परवानगी दिली, व शहराचा तट जमीनीस मिळवून जे लोक जिवंत राहिले होते त्या सर्वांस विकून टाकिलें, परंतु जे त्यास पूर्वींच मिळालेले होते ते मात्र त्या संकटांतून वांचले. हें निर्दयपणाचें काम **ग्रीक** लोकांचे हातून घडलें असें ह्मणतात. कारण कीं त्या लोकांच्या मनांत त्या शहराविषयीं मोठा द्वेष होता. तथापि या गोष्टीचा दोष **शिकंदर** याकडेसच असावा. कारण तो सर्व गोष्टींचा ज्ञाता असून त्यास ही गोष्ट करणें योग्य नव्हतें. परंतु त्याचा विचार न करितां त्याणें त्या नाशास परवानगी

दिली सबब तो दोषी खरा, त्यांत संशय नाहीं. त्याची स्वारी फार त्वरेनें चालत असे व त्यास लढाईंत अकल्पित यश प्राप्त होई यामुळें संपूर्ण **ग्रीक** लोकांचे मनांत दहशत पडून त्यांची अशी खातरी झाली होती कीं **शिकंदर** राजाप्रमाणें जगांत पूर्वीं कोणीही पराक्रमी पुरुष उत्पन्न झाला नसेल. त्या **शिकंदर** राजाचे पहिले सालचे लढाईचा वृत्तांत ऐकून **नेपोलियन् बोनापार्ट** नामें सांप्रतकाळीं जो प्रति **शिकंदर फ्रान्स** देशांत झाला त्याचे **इटली** देशांतील पहिल्या लढाईची आठवण होते.

याप्रमाणें **शिकंदरानें** संपूर्ण **ग्रीस** देश आपले ताब्यांत आणून नंतर आपले जन्मांतील मुख्य काम ह्मणजे **फारस** देशचे राज्य नष्ट करण्याबदलची स्वारी ती करावयास तयारी केली. **फारस** देशचे राजापाशीं त्याचे राज्यांतील फौज व सामान खेरीज करून अणखी ५०००० **ग्रीक** लोक चाकरीस ठेविले होते. ते **शिकंदर** राजाचे फौजेप्रमाणेंच शूर होते. परंतु त्यांस वागवावयास **शिकंदरा**प्रमाणें सरदार मात्र नव्हता (इतकीच न्यूनता होती) असें तें राज्य घ्यावयास व पृथ्वीवरील प्रसिद्ध मुलुख सर करावयास **शिकंदर** याणें ३०००० पायदळ व ४५०० स्वार इतकेंच सैन्य नेलें होतें. परंतु ते लोक निवडक होते आणि त्यांस लढाईचे कष्ट सोसावयास सामर्थ्य होतें व त्यांस वागवावयास असा कुशल सेनापति होता कीं त्यासारखा श्रेष्ठ असा कोणीही अद्यापपर्यंत जगांत उत्पन्न झाला नाहीं.

क्रिस्ताचे पूर्वीं ३३४ वे वर्षीं वसंत ऋतूमध्यें **शिकंदर** बादशाहा बेवीस वर्षांचे वयांत असतां आपले फौजेनिशीं

**हेलिस्पांट** नामें जी खाडी **एशिया** व **युरोप** या दोन्ही खंडांचे मध्यभागीं आहे तिचे कांठीं जाऊन पोहोंचला. त्या खाडींत त्याचीं जाहाजें पूर्वींच जाऊन पोहोंचलीं होतीं, त्यांत फौज बसवून आपलेच हातानें जाहाज हाकारून मोठ्या उत्कंठेनें जाहाजें रस्त्यास लावून पार चालला, तो **एशिया** खंडाच्या कांठावर पोहोंचतांच प्रथमतः आपण उडी टाकिली आणि त्या वेळेपासून हें खंड माझेंच आहे अशी त्याणें आपले मनांत कल्पना केली. सर्व फौज उतरल्यावर त्या लोकांस बरोबर घेऊन तो **ग्रानिकस** नामक नदीचे कांठीं गेला. तों त्या नदीचे पलीकडील कांठावर **फारस** देशचे सेनापति त्याचा रस्ता रोखण्याकरितां आपली फौज जमा करून उभे होते. **पारसी** लोकांस **हेलिस्पांट** खाडीचाच रस्ता रोखणें योग्य होतें व त्याप्रमाणें त्यांणीं बहुतकरून केलेंही असतें, परंतु **मेंटार** नामें **ग्रीस** देशचा राहाणारा एक हुशार सेनापति **फारस** देशचे राजाचे पदरीं होता, तो नुकताच नाश पावला होता, यामुळें ती गोष्ट त्यांकडून घडली नाहीं. इकडे **शिकंदराचा पारमीनिओ** नामें मुख्य सेनापति यानें त्यास अशी विनंती केली कीं या नदींतून उतरून जावयास बहुत विघ्नें आहेत. यास्तव पार जाऊं नये. परंतु **शिकंदरानें** त्यास असें सांगितलें कीं, जे आपण **हेलिस्पांट** खाडीसारिखी खाडी उतरून आलों त्या आपणांस आतां जर अशा लहानशा नदीनें हरकत होऊं लागेल तर यापेक्षां हेंच बरें आहे कीं, आपण जोखिमीचीं कामें अगदीं हातांत धरूं नयेत. असें बोलून शत्रूच्या फौजेंतील निवडक स्वार जेथें उभे होते त्यांचे समोर आपण

पाण्यांतून चालत चालत पार गेला. आणि आपले फौजेचे मनांत कांहीं आपले शूरत्वाच्या गोष्टी ठसवून तिचे हातून शत्रूचा पराभव केला. ह्या लढाईंत **पारसी** लोकांचे सेनापती ह्मणजे राज्यांतील मुख्य सरदार व मानकरी हे कामास आले. (ह्मणजे प्राणास मुकले.) परंतु **शिकंदराने** त्यांस उदार मनानें त्यांचे योग्यतेप्रमाणें मूठमाती दिली. उन्हाळा संपतांच त्याणें आपली मुख्य फौज **सार्डिस** शहरास हिवाळ्याचे बराकींत पाठवून दिली, आणि ज्यांचीं लग्नें नुकतीच झालीं होतीं त्या हुद्देदारांस रजा देऊन घरीं पाठविलें आणि मनांत असा विचार केला कीं, अशा उदारत्वाचे कृत्यानें मजकडे बहुत शिपाई लोक चाकरीस राहावयास येतील. त्याणें स्वतः अगदीं आराम न करितां बाकीचे निवडक फौजेची एक टोळी बरोबर घेऊन **एशियामैनर** देशांतील समुद्राचे कांठाकांठानें दूरवर जाऊन जो मुलुख **एशिया** खंडांत **ग्रीक** लोकांनीं वसविलेला होता तो संपूर्ण जिंकून **पारसी** लोकांचें पाण्यांतील लढाईचें सामान कमी केलें. नंतर **एशियामैनर** देशाचे दक्षिण हद्दीवरून जातां जातां जरी जमीनीवर दाट बर्फ पडलें होतें तरी मनांत कांहीं हरकत न आणितां **मौंट टारस** नामक डोंगराचे रानांतून जाऊन संपूर्ण **फ्रिजिया** देशांत अम्मल बसविला. ह्या थंडीचे दिवसांत यद्यपि कोणतेंही शूरत्वाचें मोठेंसें काम झालें नाहीं, तथापि त्या युद्धांत शूरत्व बळ व युक्ति हीं प्रसंगानुरूप झालींच होतीं, यावरून तो मोठा योद्धा होता असें दिसतें. पुनः उन्हाळा जवळ येतांच जे शिपाई लोक रजा घेऊन घरीं गेले होते ते **मासिडोनिया** देशांतून

नवीन फौजेची मोठी भरती घेऊन आले. त्या वेळेस **शिकंदर** डोंगराचे रस्त्यानें **गार्डिम** येथें गेला होता. तेथून त्याणें **पार्मिनिओ** नांवाच्या सरदारास **सार्डिस** शहरांतून ती फौज बरोबर घेऊन यावयास हुकूम पाठविला.

फौज पुनः एकत्र होतांच **शिकंदरानें क्यापाडोसिया** व **पाफ्लेगोनिया** हे दोन्ही मुलुख जिंकून दुसरे वर्षीची लढाई चालू केली. नंतर तो **मौंट टारसचे** घांटांतून खालीं उतरून समुद्रकिनाऱ्यावरील **सिलिसिया** नामक प्रांतांत गेला. तेथें एके दिवशीं त्यास फारच उष्मा होऊं लागला ह्मणून त्याणें **सिड्नस** नामक नदीचे पाण्यांत स्नान केलें, परंतु तें त्यास बद्धक होऊन तो असा बेअराम झाला कीं, कांहीं काळपर्यंत तो जगण्याच्या पंथांत नव्हता. (परंतु ईश्वरकृपेंकरून तो त्या दुखण्याचे हातून पार पडला.) नंतर त्यास अशी आनंदाची खबर समजली कीं, ज्या सेनापतीस त्याणें आपले पाठीमागें बंदोबस्ताकरितां ठेविलें होतें, त्यांणीं सर्व शत्रूंचा पराभव करून त्याच वर्षी सप्तेंबर महिन्यांत संपूर्ण **एशियामैनर** देश आपल्या कबज्यांत आणिला. इकडे फारस देशांत असें वर्तमान झालें कीं **मेमनन्** नामें **ग्रीस** देशचा नामांकित योद्धा **फारस** देशचे राजाचे पदरीं होता व तो त्या देशचे सर्व सरदारांहून होषयार होता, तोही ह्याच वेळेस मृत्यु पावला. इतक्यांत **डेरायस** राजा बहुत फौज घेऊन आपले मतें शत्रूस (ढेकणाप्रमाणें) चिरडून टाकावें ह्मणून वाळूचे रानांतून पार निघून मैदानांत आला. त्याणें तीस हजार **ग्रीक** लोक आपल्या स्वदेशीय लो-

कांशीं युद्ध करण्याकरितां हंगामी नौकर भरले होते, तेच त्याचे सर्व फौजेंत लढाऊ शिपाई होते. ते **सिलिसियाचे** मैदानांत उतरले आणि **डेरायस** राजानें मोठ्या कुशलतेनें शत्रूचे पाठीमागें जाऊन जो देश **शिकंदरानें एशियामिनरांत** सर केला होता त्याचे व **शिकंदराच्या** फौजेचे दरमियान डेरा केला. यामुळें असें वाटूं लागलें कीं **शिकंदराचा** पराभव खचीत होईल. परंतु **इसस्** नामें एक लाहानसें मैदान, त्याचे एका बाजूस समुद्र व दुसरे बाजूस अवघड खडक, याप्रमाणें होतें. तेथें उभयतांच्या फौजांचा सामना झाला. त्यांत **डेरायस** याकडे १४५००० फौज व **शिकंदरा**कडे तिचा तिसरा हिसा ह्मणजे अदमासें ४९००० याप्रमाणें होती, आणि लढाई चालू झाली तींत फार वेळपर्यंत जय कोणासही आला नाहीं. परंतु शेवटीं **शिकंदरानें** आपले खास अर्दलीचे ह्मणजे जिलेब्रींतील स्वार बरोबर घेऊन जाऊन मोठ्या मेहेनतीनें जयाचे पारडें आपल्याकडे फिरविलें. ह्या लढाईंत **पारसी** लोकांची फौज सुमारें ११०००० नाश पावली, बाकी जे लोक राहिले त्यांची दाणादाण होऊन शेवटीं ते पळून गेले, **डेरायस** राजा तर प्रथमच पळून गेला होता, त्याची आई, राणी वगैरे सर्व कुटुंब प्रारब्धानें **शिकंदराचे** हातीं लागलें. त्या थोर लढाईंत **शिकंदरास** यश प्राप्त झाल्यामुळें जे मांडलिक राजे तावत्कालपर्यंत त्यास प्रशस्त मनानें राजसन्मान देत नव्हते ते देऊं लागले, व जे राजे स्वतंत्र होते त्यांचे मनांत दहशत बसली, येणेंकरून **शिकंदरास** पुढें मुलखाचा जय करण्याचा मार्ग सुलभ झाला. नंतर **पार्मिनिओ** नामक सरदारानें **शिकंदरा**-

चे हुकमानें **दमास्कस** शहरास जाऊन तेथें **फारस** देशचे राजाचा जामदारखाना व दरबाराचे स्थान हीं दोन्हीं हस्तगत केलीं तितक्यांत राजानें पाठलाग करणारे लोकांस टाळा देऊन **फारस** देशचे राजधानी जवळ केली.

इकडे **शिकंदर इसस** नामक जाग्यांतून **भूमध्यसमुद्राचे** कांठानें **फिनिशिया** देश ह्मणजे **मिसर** देशचे विद्येचें आगार, त्या देशास गेला. त्या देशांत **टायर** शहर खेरीज करून त्याशीं लढावयास अणखी कोणीहि उभा राहिला नाहीं. त्या शहरास **समुद्राची राणी** अशी संज्ञा होती व तें **फिनिशियापासून** जवळच एका बेटावर वसलेलें होतें, व ते जगांत पहिले प्रतीचे व्यापाराचें शहर असून त्यांत अपरिमित दौलत होती, व त्यांतील राहाणारे लोकही तसेच मालमस्त होते. **शिकंदरास** त्या शहरांत जाऊन बलिदान करावयाचें होतें ह्मणून त्याणें आंत जावयास परवानगी मागीतली, परंतु ती न मिळाली यामुळें त्याणें त्यास वेढा घालावयाचा निश्चय केला. त्या शहरास वेढा घालणें ही केवळ **शिकंदराचेंच** जन्मवृत्तांतांत विशेष गोष्ट आहे असें नाहीं, परंतु प्राचीनकाळचे इतिहासांतही ती एक मोठी आठवण राहावयाजोगी गोष्ट आहे. तें शहर जात्यांच मजबूत असून त्याशिवाय त्याचा शहरपन्हा मोठ्या कुशळतेनें बांधिलेला होता, व त्याचें रक्षणही लोकांनीं मोठ्या दृढपणानें केलें होतें. यास्तव **शिकंदरास** त्या लढाईंत इतकीं संकटें प्राप्त झालीं कीं, तितकीं पूर्वीं कोणतेही शहरचे वेढ्यांत झालीं नव्हतीं. परंतु तीं इतक्याच

कामास पडलीं कीं तींहींकरून त्याचा बुद्धिप्रकाश हो-ऊन त्यापासून बहुत तजविजी निघाल्या, आणि त्याणें पाच महिन्यानंतर हल्ला करून तें शहर हस्तगत केलें. त्या शहरचें अधिपत्य समुद्रांत नाहींसें होतांच त्याचें महत्वही नष्ट झालें. ह्या लढाईंत **शिकंदरास** यश प्राप्त झाल्यामुळें त्याचा मोठा लौकिक झाला. परंतु त्या का-ळचे चालीप्रमाणें त्याणें त्यांतील राहाणारे लोकांवर जुलूम जबरी केली ह्मणून त्याचे नांवास बट्टा लागला.

**टायर** शहर गारद झाल्यामुळें **फारस** देशचे राज्यांचा पाण्यांतील अधिकार नष्ट झाला. हें वर्तमान त्या **दारा** राजास कळल्यावर थोडकेच दिवसांनीं त्याणें **शि-कंदरा**कडे वकील पाठविला, आणि असें बोलणें लाविलें कीं, कुटुंबांतील माणसांचे मोकळिकेबद्दल अमुक पैसा व विवाहार्थ आपली एक मुलगी याप्रमाणें देतों तें घेऊन त्यांस सोडून द्यावें. आणि **एशिया** पैकीं **युफ्रेटिज** नदी-पलीकडील मुलुख देतों तो घेऊन तहनामा करावा. परंतु हें बोलणें **शिकंदरानें** नाकबूल करून असा जबाब पाठ-विला कीं, संपूर्ण **एशिया** खंडांतील मुलूख व त्यांतील दवलत सर्व माझीच आहे असें मी समजतों, तेव्हां मी त्याचा एक अंश घेऊन कसा संतुष्ट होईन, (होणार नाहीं.)

**टायर** शहरांतून **शिकंदर** निघाला तो **पालेस्टाइन** देशावर गेला. परंतु त्यांतील लोकांनीं युद्ध न करितां आपोआप त्याचें प्रभुत्व मान्य केलें. नंतर तेथून कुच करून **मिसर** देशास चालला. वाटेनें **गोजा** नामें शहर लागलें त्यांत **बेटिस** नामें **पारसी** लोकांचा ठाणेदार

होता त्याणें त्याचा रस्ता रोंखिला ह्मणून **शिकंदरानें** त्या शहरास वेढा घातला. परंतु त्या सरदारानें दोन महिनें पर्यंत मोठें जोरानें लढाई केली. **शिकंदर** यास लढाईंत दोन वार लागल्यामुळें फारच क्रोध येऊन त्याणें तें शहर नष्ट करण्याचा निश्चय केला आणि आपले सर्व फौजेनिशीं एकदम हल्ला करून आंत प्रवेश केला. नंतर मोठमोठालीं अनुचित् कर्मं करून **बेटिस** यास मारून टाकलें. नंतर तेथून निघाला तो सात दिवसांत **ऐल्युसिअम** शहरास गेला. **मिसर** देशांत दोनशें वर्षेंपर्यंत **पारशी** लोकांचा अम्मल राहिला होता. आणि त्यांतील लोक स्वतंत्र होण्यास फारच उत्कंठित झाले होते. त्यामुळें त्यांणीं **शिकंदराशीं** लढाई न करितां स्वसंतोषानें त्यास राजी झाले. मग तो तेथून कूच करून ज्या ठिकाणीं **नाईल** नदी समुद्रास मिळते तेथें गेला. आणि ती जागा पाहून त्यास असें वाटलें कीं, या ठिकाणीं व्यापार चालू झाला तर मोठा फायदा होईल. त्यावरून त्याणें तेथें एक शहर बांधावयास तत्काळ हुकूम दिला. तें शहर बांधावयास **डिमारेटस** नामें कुशळ कारखानदार होता, ज्यास त्याणें **इफेससचे** देवळाचा जीर्णोद्धार करितांना पाहिलें होतें, त्यास बोलावून आणून खर्चाकरितां बहुत पैसा त्याचे हवालीं केला. त्याणें त्या जाग्यावर असें मजबूत व मोठें शहर बांधिलें कीं, **टायर** शहर गारद झाल्यामुळें त्यांतील व्यापार तुटला होता तो सर्व ह्यांतच होऊं लागला, आणि पुढें शेकडों वर्षेंपर्यंत तें शहर **शिकंदराचें** वेळचें शहर अशी कीर्ति चालली होती. तें शहर हल्लीं पडित झालें आहे परंतु जर **सुवेज** नामक

गी भूमींतून व्यापाराचा माल येण्याकरितां रस्ता चालू झाला तर थोडकेच दिवसांनीं तें शहर आपले पूर्व स्थितीवर येईल. असा संभव आहे.

**शिकंदर मिसर** देशांत होता त्या वेळेस तो वाळूचे मैदानांतून पूर्वेस **अमन्** नामक देवतेचें दर्शन घ्यावयास गेला होता. त्या देवालयाची जागा मात्र हिरवीगार गुलजार होती. परंतु तिचे सभोंवतें केवळ वाळूचेंच मैदान असून त्यांत झाडझुड वगैरे कांहीं दृष्टीस पडत नव्हतें. पुढें **शिकंदराचे** मनांत तेथून निघून **नाइल** नदीचे पाण्याचा झोत वरून पडतो तेथपर्यंत जावयाचें होतें, परंतु **डेरायस** राजा दुसरी लढाई करण्याकरितां आपले राज्याचे हरएक भागांतील फौज जमा करीत आहे असें समजलें, यास्तव तो बेत **शिकंदरानें** एकीकडे ठेवून जें काम उत्पन्न झालें होतें त्याचें निवारण करण्याकरितां तो **टायर** शहरास परत गेला.

तेथें जेवणावळी व बलिदानें करून तो आपले सर्व फौजेनिशीं **बाबिलन** शहरास जाऊन तेथून **भूमध्यस**मुद्राचे कांठानें **युफ्रेटीज** नदीवर जाऊन त्या नदीस नावांचा पूल बांधून त्याजवरून फौजेनिशीं पार उतरून **मिसापोटेमिया** ह्मणजे जो मुलुख **युफ्रेटीज** व **टाइग्रीज** या नद्यांचे मध्यभागीं आहे त्यास विनहरकत जाऊन पोहोंचला. त्या दुआबांतून पलीकडे जावयास पांच महिने लागले हे फार लागले. याविषयीं त्याचे नेहेमीचे स्वारीचे शीघ्रतेचा विचार मनांत आणिला तर इतका वेळ लागूं नये असें सिद्ध होईल. परंतु

त्या प्रवासाचा मूळ वृत्तांत गैर विल्हेस लागला यामुळे विलंबाचें कारण समजण्यांत येत नाहीं.

इतक्यांत **डेरायास** राजा बहुत फौज घेऊन **टाईग्रीज** नदीचे पलीकडे **आर्बेला** नामें गांव आहे त्याचे समीप येऊन पोहोंचला. नंतर त्याणें तेथें लढाईचें सामान ठेवून पुढें वीस कोस वाढून एका मोठे मैदानांत तळ दिला त्याचे पश्चिमेस **टाइग्रीज** नदी व पूर्वेस **लाइकस** नदी व उत्तरेस डोंगर याप्रमाणें होतें. अशा मैदानांत त्या राजानें **एशिया** खंडाचे बादशाहीबद्दल शेवटची लढाई करण्याची तजवीज केली. इकडे **शिकंदर** बिनहरकत **टाइग्रीज** नदी उतरून पांच दिवसांत **डेरायस** राजाचे सन्मुख येऊन पोहोंचला. **पारसी** लोकांचा तळ इतके दूरपर्यंत पसरला होता कीं तितकी नजरही पोंहचणार नाहीं. एका इतिहासकर्त्यानें त्यांची संख्या दाहा लाख ह्मणून वर्णिली आहे. परंतु **एशिया** खंडांतील राजांचे फौजेमध्यें अर्धे बुणगें व अर्धे लोक लढाऊ असे असतात यास्तव अर्धी संख्या कमी समजावी. **शिकंदराचे** फौजेचा सुमार केला असतां केवळ ४७००० लोक लढाऊ होते, परंतु त्यांत बुणगें नव्हतें. **पारसी** लोकांचे फौजेंत देशोदेशचीं मनुष्यें होतीं, यामुळें त्यांत **एशिया** खंडांतील सर्व शूरत्व भरलें होतें. परंतु त्यांत इतकीच कोताई होती कीं त्या फौजेचे हातून काम घ्यावयास सरदार योग्य नव्हता. प्रथमतः **शिकंदरान** लढाई सुरू करून शत्रूचे फौजेचे मध्यभागीं ह्मणजे ज्या जाग्यांत राजाचें निशाण झळकत होतें त्या जाग्यावर हल्ला केला आणि मोठ्या बाहादूरीनें तेथील लोकांचा पराभव करून **डेरायस** रा-

र्मेस धरावें असा बेत केला, तों इतक्यांत **पार्मिनिओ** नांवें त्याचा सेनापति डावे बाजूस लढत होता त्यास शत्रूचे लोकांनीं दाबिलें ह्मणून त्याणें **शिकंदरास** कुमकेकरितां बोलावूं पाठविलें. तेव्हां **शिकंदरानें** तत्काळ घोड्यावर बसून आपले यशस्वी स्वारांनिशीं त्याचे कुमकेस जाऊन जयाचें पारडें आपणाकडे फिरविलें. परंतु इतक्यांत **डेरायस** राजा लढाईचे मैदानांतून पळून गेला, संपूर्ण **एशिया** खंडांत अशी चाल आहे कीं राजा मारला गेला अथवा पळून गेला तर त्याचे फौजेचा निःसंशय पराभव होतो, तसेंच, राजधानी शत्रूचे हातीं गेली तर संपूर्ण राज्य जातें. त्याप्रमाणेंच **डेरायस** राजा पळून जातांच त्याचे फौजेची दाणादाण होऊन शेवटीं संपूर्ण लोक इकडेतिकडे पळून गेले. ह्या लढाईंत **पारसी** लोकांकडील फौजेंतील मनुष्यें सुमारें ३०००० पडलीं व तितकेच लोक धरले गेले असें ह्मणतात. **शिकंदरानें** लौकरच **डेरायस** राजाचा पाठलाग केला परंतु **शिकंदर पार्मिनिओ** याचे कुमकेस गेला त्याच वेळेस तो राजा पळून गेला होता ह्मणून तो **शिकंदराचे** हातीं लागला नाहीं. यद्यपि त्या रणभूमीपासून **आर्बेला** हा गांव वीस कोस लांब होता, तथापि त्या लढाईस **आर्बेला** याची लढाई असें ह्मणतात. त्या लढाईचे अंतीं **एशिया** खंडांतील राजांचें ऐश्वर्य नष्ट झालें.

लढाई झाल्यावर **शिकंदर** त्या मैदानांतून निघून **बाबिलन** शहरास गेला. जलप्रलय झाल्यावर प्रथमतः त्याच शहरची वसाहत झाली होती आणि तें बहुत दिवसपर्यंत **एशिया** खंडांतील मुख्य शहर होतें. परंतु ह्या

लढाईचे वेळेस तें अगदीं मोडकळीस आलें होतें. त्या शहरांत **शिकंदरानें** ज्या इमारती पडित होऊन राहिल्या होत्या त्या सर्व पाहून त्यांपैकीं **वेलस** नामें देवतेचें जें देवालय जगांत सर्वांहून प्राचीन होतें त्याचा जीर्णोद्धार करावयास हुकूम दिला. नंतर तेथून निघून **स्युजा** नामें **फारस** देशचे राजाचें रमणीय स्थान व ज्यांत त्या देशचे राजांची जास्ती दौलत ठेविली होती तेथें गेला आणि तो सर्व खजीना हस्तगत करून नवा मुलुख सर करण्याचे खर्चाकरितां पाठवून दिला. नंतर तेथून कूच करून **परसिपोलिस** नामें शहर ज्यास **फारस** देशचे राजांनीं पूर्वेकडील राज्यांतील आणलेला सर्व पैसा खर्च करून विभूषित केलें होतें, तेथें गेला. आणि कांहीं दिवस **फारस** देशचे बादशाही तख्तावर बसून त्या शहरांतील चमत्कारिक कामें पाहून नंतर तें शहर आपले फौजेकडून लुटवून दोनशें वर्षांपूर्वीं **पारसी** लोकांनीं **आथेन्स** शहर जाळिलें होतें त्याचा सूड उगविण्याबद्दल तें शहर जाळून टाकिलें. हें काम सामान्य विजयी राजासही अयोग्य आहे मग विद्वान **शिकंदर** यास तर अयोग्य हें सांगावयास नको. ह्मणून त्यास या गोष्टीची क्षमा करावयाजोगीही नाहीं. त्या शहरांत **शिकंदराचें** चवथे वर्षाचें युद्ध समाप्त झालें. नंतर तो **डेरायस** राजाचे शोधार्थ निघाला. तो राजा **आर्वेलाची** लढाई झाल्यापासून चार महिनेपर्यंत मनांत, दैवयोगानें कांहीं अनुकूळ गोष्टी घडून येऊन मी **शिकंदर** याचा नाश करून त्यापासून निर्भय होईन असा हेतु धरून **एक्वेटाना** शह-